कृषीवल

रायगड, शनिवार, दि. १५ नोव्हेंबर २०२५

किंमत ४ ₹

## हेटवणे वाडीतील चिमुकली सापडली



**पेण :** तालक्यातील हेटवणेवाडी येथील किशोरी किरण महालकर ही चार वर्षांची चिमुरडी १२ नोव्हेंबर रोजी गावाच्या बाहेरून बेपत्ता झाली होती. गेली तीन दिवस हिला शोधण्यासाठी पोलीस यंत्रण व गुरुनाथ साठीलकर यांचे हेल्प फाऊंडेशन अथक प्रयत्न करत होते. दोन दिवसात जवळपास तीन डोंगर शोधून काढले. मात्र किशोरीचा काही पत्ता लागत नव्हता. स्वत: पोलीस अधीक्षक आंचल दलाल पान २ वर

## ज्येष्ठ अभिनेत्री कामिनी कौशल यांचे निधन



**मुंबई :** हिंदी सिनेसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेत्री कामिनी कौशल यांचे वयाच्या ९८ वर्षी निधन झाले आहे. त्यांच्या निधनाने भारतीय चित्रपटसृष्टीतील एका युगाचा अंत झाला आहे. पत्रकार विक्की लालवानी यांनी त्यांच्या इंस्टाग्राम अकाउंटवर ही बातमी निश्चित केली आहे. त्यांच्या कुटुंबातील एका जवळच्या सूत्राने सांगितले की, कामिनी कौशल यांचे कुटुंब अत्यंत खासगी जीवन जगणारे आहे आणि त्यांना प्रायव्हसीची गरज आहे. कामिनी कौशल यांचा जन्म २४ फेब्रुवारी १९२७ रोजी झाला होता आणि त्यांनी १९४६ मध्ये पान २ वर

# अखेर शेतकऱ्यांसमोर प्रशासन नमले

### उच्चस्तरिय अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेण्याचे लेखी आश्वासन



| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

**सीमांकनासाठी आलेल्या धेरंड शहापूर येथील सीनारमास कंपनीने पोहोच रस्त्यासाठी अचानक भरावाचे काम सुरु केल्यामुळे त्यांच्याविरोधात शेतकऱ्यांनी आक्रमक भूमिका घेतली. एमआयडीच्या अधिकाऱ्यांसह महसूल अधिकाऱ्यांना शुक्रवारी (दि.१४) शेतकऱ्यांनी धारेवर धरत भरावाला विरोध दर्शविला. वरिष्ठ अधिकाऱ्यांसह अन्य मागण्या पूर्ण करा, तरच पुढील कार्यवाही करा, या भूमिकेशी शेतकरी ठाम राहिले. अखेर प्रशासनाला शेतकऱ्यांसमोर नमते घ्यावे लागले. एमआयडीसीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत मुख्यालयात शुक्रवारी (दि.२१) बैठक आयोजित करून प्रश्न मार्गी लावण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतरच शेतकऱ्यांनी लढा मागे घेतला.**

धेरंड-शहापूर परिसरात सीनारमास प्रकल्प येत आहे. सुमारे ३८७ हेक्टर जागेमध्ये हा प्रकल्प उभा राहणार आहे. या प्रकल्पापर्यंत जाण्यासाठी सुमारे तीस हेक्टर जमीन संपादीत केली जाणार आहे. सर्व्हे नं. २६४, २६५ मधील औद्योगिक क्षेत्राच्या पोहोच रस्त्याच्या कामाबाबत सीमांकन करण्यासाठी एमआयडीसीचे अधिकारी पोलीस बंदोबस्तामध्ये शहापूर परिसरात दाखल झाले होते. सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास अधिकारी आले. पोलिसांच्या कडकोट बंदोबस्तामध्ये सीमांकन करण्याची तयारी असताना शेतकऱ्यांनी एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांना घेराव घालत जाब विचारला. प्रकल्पाला आणि विकासाला विरोध नाही. परंतु मागील सहा महिन्यांपासून वरिष्ठ अधिकाऱ्यासमवेत बैठक घेण्याची विनंती केली जात आहे, त्याची दखल घेण्यात यावी, अशी मागणी स्थानिकांनी केली. पान २ वर

### शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्यांवर दृष्टीक्षेप

**भुसंपादन अधिनियम २०१३ च्या कायद्याप्रमाणे १ कोटी ९२ लाख ३७ हजार ८०३ रुपये प्रति एकरी मोबदला देण्यात यावा. महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियमातील तरतूदीप्रमाणे संपादीत क्षेत्रास १५ टक्के विकसीत भूखंड मिळावा.**

**शेतकऱ्यांच्या मुलांना योग्य प्रशिक्षण देऊन त्यांना वारसा हक्काने प्रकल्पामध्ये नोकरीत सामावून घ्यावे.**

**पुनर्वसन कायद्याप्रमाणे फायदे मिळाले पाहिजे.**

**शेतघरे, शेततळी, गुरेढोरांचे गोठे, फळ व सावली देणारी झाडे आहेत. या जागेत मासेमारी करीत आहेत. त्या माध्यमातून स्थानिक शेतकरीपुरक उत्पन्न घेत आहेत. या बाबींचा विचार मूल्यांकन करताना करण्यात यावा. भूमीहीन होणाऱ्या बाधित शेतकऱ्यांना शेतकरी दाखला देण्यात यावा.**

### शेतकऱ्यांच्या मागण्यांचा विचार व्हावा

**औद्योगिक क्षेत्रासाठी भूसंपादन होत असताना त्याची प्रक्रिया लोकविरोधी आहे. त्यामध्ये कायद्याबरोबरच इतर कोणत्याही पध्दतीने शेतकऱ्यांचे हित जोपासले जात नाही. भूसंपादनाचा निवाडा जाहीर झाल्याचे शासन सांगत आहे. प्रत्यक्षात निवाडे शेतकऱ्यांपर्यंत आले नाहीत. निवाड्यामध्ये ९६ लाख रुपये प्रति एकरी जाहीर केली आहे. परंतु तो निवाडा मान्य नाही. एक कोटी ९२ लाख ही मागणी रास्त आहे. पूनर्वसन करताना कुठे व कसे करणार याची माहिती नाही. घरे, शेततळी, गोठे, झाडे, उध्वस्त होणार आहेत. त्यांच्या नुकसान भरपाईबाबत शासन आणि एमआयडीसीचे अधिकारी बोलायला तयार नाहीत. पुनर्वसन करताना पाच किलोमीटरच्या पट्ट्यात झाले पाहिजे, ही आग्रही मागणी आहे. शेतकऱ्यांना मुलांना येणाऱ्या प्रकल्पात नोकरी पाहिजे. तसेच त्याची हमी व दाखले मिळाले पाहिजेत. एमआयडीसी कायद्यांतर्गत विकसित भूखंड १५ टक्के मिळाला पाहिजे. मागण्या पूर्ण होईपर्यंत एमआयडीसीने कोणतीही कार्यवाही करू नये. विकासाला विरोध नाही. परंतु येथील शेतकरी, ग्रामस्थांचा विचार करणे गरजेचे आहे.**

**- ॲड. मानसी म्हात्रे,**
राज्य महिला आघाडी प्रमुख, शेकाप.

# आमदारांना सत्तेचा माज?

## परवानगी न घेता, थेट रस्त्यात उभारला मंडप



| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

कोणताही कार्यक्रम राबवित असताना त्याची महसूल विभागासह पोलीस प्रशासनाकडून रितसर परवानगी घेणे आवश्यक आहे. सर्वांसाठीच हा नियम समान आहे. जेणेकरुन कार्यक्रमाची सुरक्षितता तसेच वाहतूक कोंडी होऊ नये. याशिवाय कोणताही अनुचित प्रकार घडू नये. परंतु शिंदे गटाचे आमदार दळवी यांनी कायदेशीर मार्ग न निवडता रस्त्याच्या भूमीपूजनाच्या वेळी बेलकडे फाटा येथे रस्त्यात मंडप उभारुन भूमीपूजनाचा कार्यक्रम घेतला. कार्यक्रमासाठी उभारण्यात आलेल्या मंडपाची कोणतीही परवानगी आ. दळवी यांच्या कार्यकर्त्यांनी घेतली नसल्याची माहिती समोर येत आहे.

आमदारच नियम धाब्यावर बसवून परवानगी न घेता कार्यक्रम करीत असतील, तर कायदा फक्त सर्वसामान्यांसाठीच आहे का, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित करण्यात येत आहे. त्यामुळे आता महसूल विभाग तसेच पोलीस प्रशासन यावर काय कारवाई करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

अलिबाग - रोहा मार्गावरील ८४ किलो मीटरच्या रस्त्याचे काम अपूर्ण अवस्थेत आहे. सुडकोलीपासून नवघर, वढाव, सहाण पाल्हे, नवेदर बेली येथील पुलांची अवस्था बिकट झाली आहे. त्यामुळे यामार्गावरील अवजड वाहनांना प्रवेशबंद केला आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून या मार्गावरील प्रवाशांची वणवण होत आहे. रामराजमार्गे रोहा एसटी बंद असल्याने या मार्गावरील प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत. या पुलांच्या नूतनीकरणाबरोबरच दुरुस्तीकडे दुर्लक्ष करून विद्यमान आमदार भूमीपूजनावर भर देत आहेत. प्रत्यक्षात मात्र असलेल्या समस्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याची पान २ वर

# मुंबईत शिवसेना-भाजपमध्ये राडा

### अनिल परबांचा रुद्रावतार, शिवसैनिकांची घोषणाबाजी

| मुंबई | प्रतिनिधी |

ठाकरेंची शिवसेना आणि भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये मुंबईतील ताज लँड हॉटेलबाहेर शुक्रवारी (दि.१४) राडा झाला. ठाकरेंच्या शिवसेनेच्या भारतीय कामगार सेनेच्या कामगारांना फसवून भाजप प्रणित संघटनेत घेत असल्याचा आरोप ठाकरेंच्या सेनेकडून करण्यात आला. त्यामुळे त्या ठिकाणी शिवसेनेचे नेते अनिल परब दाखल झाल्यानंतर शिवसैनिकांनी गोंधळ घातल्याचे दिसून आले.

अखिल भारतीय कर्मचारी संघ ही भाजप प्रणित संघटना आहे. तर भारतीय कामगार सेना ही शिवसेनेची संघटना आहे. या दोन्ही संघटनांमध्ये राडा झाला. ताज लँड हॉटेलमध्ये भाजपच्या प्रतिनिधींना जाब विचारण्यासाठी स्वतः अनिल परब त्या ठिकाणी गेले. हॉटेलमध्ये जाण्यासाठी अनिल परबांना पोलिसांनी अटकाव केला. त्यानंतर अनिल परबांचा रुद्रावतार पाहायला मिळाला. कोणत्याही परिस्थितीत माझ्या कार्यकर्त्यांना अडवू शकत नाही, असं म्हणत त्यांनी पोलिसांना जाब विचारला.

भाजपच्या नेत्यांशी चर्चा करण्यासाठी फक्त अनिल परब आणि इतर काही लोकांनीच पान २ वर

आर्थिक गैरव्यवहाराप्रकरणी

## नवाब मलिकांना तडाखा

| मुंबई | वृत्तसंस्था |

कुख्यात गुंड दाऊद इब्राहिम याच्या मुंबईतील मालमत्तांशी संबंधित आर्थिक गैरव्यवहाराप्रकरणी माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते (अजित पवार गट) नवाब मलिक यांना दोषमुक्त करण्यास विशेष न्यायालयाने नकार दिला. मलिक यांच्याविरुद्ध खटला चालवण्यासाठी पुरेसे पुरावे असल्याचे निरीक्षण नोंदवून न्यायालयाने मलिक यांचा दोषमुक्तीचा अर्ज फेटाळला.

सक्तवसुली संचालनालयाचा खटला हा अंदाज आणि तर्कांवर आधारित असल्याचा दावा करून मलिक यांनी दोषमुक्तीच्या मागणीसाठी विशेष न्यायालयात अर्ज केला होता. खासदार आणि आमदारांविरुद्ध दाखल खटल्यांच्या सुनावणीसाठी स्थापन विशेष न्यायालयाचे न्यायाधीश सत्यनारायण नावंदर यांनी मलिक यांचा अर्ज फेटाळूनत्यांना दिलासा पान २ वर

## वेधक

### सीएसएमटीबाहेर संशयित बॅग

**मुंबई :** सीएसएमटी स्थानकाच्या बाहेर एक बॅग सापडली आहे. या बॅगेची पोलिसांनी तपासणी सुरू केली आहे. स्थानकाच्या बाहेरील कठड्याजवळ लाल रंगाची बॅग दिसली. बराच वेळ ही बॅग तिथेच होती. यामुळे अनेकांना त्या बॅगेवर संशय आला. बऱ्याच वेळेपासून सीएसएमटी स्थानकाबाहेर एक लाल रंगाची बॅग दिसत होती. या बॅगेवर अनेकांनी संशय व्यक्त केला. पोलिसांनी या बॅगेची तपासणी सुरु केली आहे. सीएसएमटी स्थानकाबाहेरील गर्दी पोलिसांनी बाजूला केली आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस जवळील बस डेपो येथे एक संदिग्ध बॅग मिळाल्याने घबराटीचे वातावरण पसरले होते. बॉम्ब शोधनाशक पथक घटनास्थळी आले आहेत.

### बिहारमध्ये एनडीएचं द्विशतक

**बिहार :** बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपाप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीने दणदणीत विजय मिळवला आहे. मागील निवडणुकीच्या तुलनेत यावेळी सत्ताधारी आघाडीने चांगली काम गिरी करत २४३ पैकी २०० हून अधिक जागा जिंकत मोठी मुसंडी मारली आहे. दुसरीकडे, तेजस्वी यादव यांच्या नेतृत्वाखालील महाआघाडीचा दारूण पराभव झाला आहे. विरोधकांना ४० ही संख्यादेखील गाठता आलेली नाही. बिहार विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने ११० उमेदवार उतरवले होते. त्यापैकी ९१ उमेदवार आघाडीवर आहेत. याचा अर्थ भाजपाला ८२.७२ टक्के यश मिळालं आहे. निवडणूक रणनीतीकार, देशातील अनेक पक्षांना पान २ वर

### जळगावमधील केमिकल कंपनीला आग

**जळगाव :** शहरातील औद्योगिक वसाहतीत एका केमिकल कंपनीला शुक्रवारी सकाळी ११ वाजेच्या सुमारास अचानक मोठी आग लागली. परिसरातील नगर परिषदांच्या बंबांद्वारे आग विझविण्याचे काम करण्यात आले. आगीत जीवितहानी झाली नसली, तरी वित्तहानी मोठ्या प्रमाणात झाल्याची माहिती जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी दिली. औद्योगिक वसाहतीत चौफुलीजवळ एन सेक्टरमध्ये आर्यव्रत केमिकल कंपनी आहे. शुक्रवारी सकाळी ११ वाजेच्या सुमारास कंपनीतील कामगार नेहमीप्रमाणे कामात व्यस्त असताना, अचानक भीषण आग लागली. आगीच्या घटनेनंतर घटनास्थळी जळगाव महानगरपालिकेसह पान २ वर

# नवी मुंबई विमानतळ प्रवासीसेवेसाठी सज्ज

### २५ डिसेंबरला पहिल्या व्यावसायिक विमानाचे उड्डाण

| नवी मुंबई | प्रतिनिधी |

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन झाल्यानंतर २५ डिसेंबरला विमानतळाहून प्रत्यक्षात पहिले व्यावसायिक विमान उडणार आहे. सलग तीन महिने डोमेस्टिक प्रवासीसेवा सुरू राहणार आहे. यात गोवा, कोलकाता, दिल्ली, अहमदाबाद, केरळ अशा महत्त्वाच्या राज्यांमध्ये सेवा दिली जाणार असल्याचे समजते. त्यानंतर टप्प्याटप्प्याने आंतरराष्ट्रीय प्रवासी वाहतूक सुरू होणार आहे.



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन ८ ऑक्टोबरला करण्यात आले; परंतु त्यानंतर विमानतळाहून प्रवासी सेवा सुरू झाली नव्हती. विमानतळावर सुरक्षाविषयक यंत्रणा बसवण्यासाठी आणि सुरक्षा दलाला तैनात करण्यासाठी ४५ दिवसांकरिता विमानतळ केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलाकडे वर्ग करण्यात आले. त्यानंतर सर्व सुरक्षाविषयक खबरदारी घेतल्यानंतर विमानतळ सुरू करण्यात येत आहे. परंतु विमानतळ टर्मिनल इमारतीमध्ये अंतर्गत सजावट आणि सुविधाविषयक कामे अंतिम टप्प्यात असल्याने आंतरराष्ट्रीय प्रवासी सेवा लगेच सुरू होणार नाही, असे एनएमआयएएलकडून याआधीच स्पष्ट करण्यात आले होते.

विमानतळाहून तात्काळ डोमेस्टिक सेवा सुरू करण्यासाठी विमानतळ व्यवस्थापन आग्रही होते. सध्या एनएमआयएएल विमानतळ चालवणाऱ्या कंपनीसोबत एअर इंडिगो, अकासा एअर आणि एअर इंडिया एक्स्प्रेस या कंपन्यांनी प्रवासी सेवा सुरू करण्याबाबत करार केला आहे. त्यानुसार एनएमआयएएलने या कंपन्यांना त्यांच्या संकेतस्थळावर २५ डिसेंबरपासून प्रवासी सेवा सुरू करण्याच्या अनुषंगाने पत्र दिल्याचे समजते आहे. जगभरात ख्रिसमस सण मोठ्या उत्साहात पान २ वर

# उरणमध्ये भाजपाने स्थानिकांना डावलले

### भूमिपुत्रांचा आमदार बालदींवर आरोप

| पनवेल | प्रतिनिधी |

एकीकडे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्यात यावे, या करता स्थानिक भूमीपुत्र आंदोलन करत आहेत. मात्र त्याचवेळी आगरी कोळी समाजाच्या मतदारांचे प्राबल्य असलेल्या उरण तालुक्यात अमराठी उमेदवार दिल्याने भाजपला स्थानिक समाजातील उमेदवार भेटला नाही का, असा सवाल उपस्थित करत करण्यात आला आहे.

उरण नगरपालिकेतील एकूण १० प्रभागांतून २१ नगरसेवक आणि १ नगराध्यक्षा असे २२ प्रतिनिधी निवडून देण्यात येणार आहेत. नगराध्यक्ष हे पद महिलांसाठी राखीव झाल्याने नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असलेल्या पुरुष उमेदवारांमध्ये काही प्रमाणात नाराजी आहे. अशातच थेट नगराध्यक्षपदासाठी महिला उमेदवार म्हणून उरण भाजपा शहर अध्यक्ष कौशिक शहा यांच्या पत्नी शोभा कोळी-शहा यांना उमेदवारी घोषित करण्यात आल्यामुळे स्थानिक भूमिपुत्रांमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे. आमदारकीच्या निवडणुकीत महेश बालदी यांना उमेदवारी देणाऱ्या भाजपने नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत स्थानिक भूमिपुत्राला उमेदवारी देणे अपेक्षित होते. मात्र पक्षाने स्थानिकांना डिवचण्याचे काम केले असल्याची भावना स्थानिकांकडून व्यक्त केली जात आहे. याशिवाय भाजप महायुतीतून निवडणुक लढवणार नसले तरी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या फोटोचा वापर भाजपा तर्फे करण्यात आल्याने शिवसेनेने नाराजी व्यक्त केली आहे. स्थानिक नेत्यांना पान २ वर

**काँग्रेस पक्ष महाविकास आघाडीतून निवडणुकीला सामोरा जात आहे. नगराध्यक्ष म्हणून आम चा भावना घाणेकर यांना पाठिंबा आहे. एकीकडे उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला मतदान केल्यास खान मुंबईचा महापौर होईल, अशी भीती दाखवायची आणि दुसरीकडे जाणूनबुजून भूमिपुत्रांना डिवचण्याचे काम भाजपा करत असल्याचे चित्र उरणमध्ये पहायला मिळत आहे.**

**- गुफरान तुंगेकर,**
**शहर अध्यक्ष काँग्रेस.**

**स्थानिक भूमिपुत्रांना खिजवण्यासाठीच आ. बालदी यांनी नगराध्यक्ष पदाचा उमेदवार दिला आहे, अशी भावना स्थानिकांमध्ये असून बालदींच्या दावणीला स्थानिकांना बांधण्याचे काम आगरी-कोळी समाजातील काही लोक करत असल्याची भावना स्थानिकांमध्ये निर्माण झाल्याचा फायदा नक्कीच महाविकास आघाडीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार भावना घाणेकर यांच्या पथ्थ्यावर पडेल.**

**- सत्यवान भगत. तालुका अध्यक्ष महाराष्ट्र नवनिर्माण सेना.**

चौथ्यांदा मतदान केंद्रात गेल्यास

# उमेदवाराची केंद्राबाहेर हकालपट्टी होणार

| रायगड | प्रतिनिधी |

नगरपरिषद निवडणुकीत मतदान केंद्रांवरील उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींची अवाजवी ये-जा आटोक्यात आणण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने शिस्तबद्धतेचा प्रयत्न सुरू केला आहे. आयोगाच्या नव्या नियमांनुसार, उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी केवळ तीन मतदारांच्या मतदानाचे निरीक्षण करू शकतील. त्यानंतर ते मतदान केंद्रात थांबू शकणार नाहीत. ठराविक मर्यादा ओलांडल्यास पोलिसांकडून त्यांना केंद्राबाहेर हटविण्यात येईल.

या निर्णयामुळे मतदान केंद्रात दिवसभर बसून राहणाऱ्या प्रतिनिधींच्या उपस्थितीचा आणि त्यातून निर्माण होणाऱ्या गर्दीचा प्रश्नही मोठ्या प्रमाणात सुटण्याची शक्यता आहे. राज्य निवडणूक आयोगाने नगरपालिका आणि इतर सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी आचारसंहिता लागू केली आहे. त्या अनुषंगाने यंदा काही नवे नियम घालून दिले असून, मतदान केंद्रातील ये-जा आणि निरीक्षण प्रक्रियेसंदर्भात हे निर्बंध लागू करण्यात आले आहेत.याशिवाय निवडणूक काळात मतदारांना विविध प्रकाराची प्रलोभने दिली जातात. यावर निर्बंध ठेवण्यासाठीही कठोर पावले उचलण्यात आली आहेत. जिल्ह्यातील नगपरिषद क्षेत्रात आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होणार नाही, ही खबरदारी घेवून नियमांचे उल्लंघन करणाऱ्याविरोधात कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. नामांकन दाखल करण्याची प्रक्रिया १० नोव्हेंबरपासून सुरू झाली आहे. नामांकन अर्ज हा पहिल्यांदा ऑनलाइन सादर करावा पान २ वर

### मंत्र्यांच्या दौऱ्यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना कळवावे लागणार

आचारसंहिता लागू असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यक्षेत्रात मंत्र्यांसह अन्य पदाधिकाऱ्यांना दौरा करण्यासाठी दोन दिवस आधी जिल्हाधिकाऱ्यांना कळवावे लागणार आहे. ही जबाबदारी संबंधित मंत्र्यांच्या खासगी सचिवावर असताना, दौरा का आवश्यक आहे, याचे स्पष्टीकरण द्यावे लागणार आहे. त्यामुळे उमेदवारांचीही आतापासूनच धावपळ होत आहे. त्यादृष्टीने जिल्हा प्रशासनही सध्या सतर्क असून नजर ठेवून आहेत.

केंद्रीय सहकार मंत्रालयाचे संचालक पंकज श्रीवास्तव यांची बँकेस भेट | बँकेच्या प्रगतीचे केले कौतुक

# पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते होणार आरडीसीसीचा गौरव

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

केंद्रीय सहकार मंत्रालयाचे संचालक पंकज श्रीवास्तव यांनी केंद्र सरकारच्या अभिनव उपक्रमाअंतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या देशातील बँकांमधील रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस गुरुवारी भेट दिली आणि बँकेच्या प्रगतीचा आणि विविध योजनांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेत बँकेचे कौतुक केले. रायगड भेटीआधी त्यांनी तामिळनाडू राज्याचा दौरा केला होता. विशेष म्हणजे २६ जानेवारी २०२६ रोजी प्रजासत्ताकदिनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते बँकेचा गौरव करण्यात येणार असल्याचे




देखील त्यांनी आवर्जून सांगितले. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या इतिहासातील महाराष्ट्राला रायगड बँकेच्या रूपाने मिळणारा हा मान देशातील पहिली ऐतिहासिक आणि महत्वपूर्ण घटना ठरणार आहे.

या भेटी दरम्यान नाबार्डचे जिल्हा व्यवस्थापक प्रदीप आपसुंदे, पुणे जिल्हा उपनिबंधक प्रकाश जगताप, रायगड जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था प्रमोद जगताप, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक, विभागीय अधिकारी संदेश पाटील, कर्ज वसुली प्रमुख डी.एम.जाधव, खालापूर विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे चेअरमन निलेश घोसाळकर, तसेच विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी, सभासद आणि बँकेचे अधिकारी उपस्थित होते.

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने नाबार्ड आणि केंद्र शासनाच्या विविध पायलट योजना यशस्वीपणे राबवून देशातील अग्रेसर बँक ठरली आहे, तसेच जिल्हा सहकारी बँक, जिल्हा उपनिबंधक आणि नाबार्ड हे सुसंगतपणे, पान २ वर

### केंद्रीय सहकार संचालक म्हणजे कोण?

केंद्रीय सहकार संचालक हे केंद्र सरकारच्या सहकार मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी असतात. ते थेट केंद्र सरकारच्या सहकार मंत्रालयाला, म्हणजेच सहकार सचिव आणि अखेरीस केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांना रिपोर्ट करतात. देशातील सहकारी संस्था आणि सहकारी बँकांसंबंधित योजना, धोरणे आणि प्रकल्प यांच्या अंमलबजावणीची देखरेख आणि मार्गदर्शन करतात.

पान १ वरून

## प्रशासन नमले

यावेळी झालेल्या प्राथमिक चर्चेनंतर सीमांकन करण्यात आले. मात्र त्यानंतर अधिकाऱ्यांनी पोहच रस्त्यावर भराव करण्यास सुरुवात केली. प्रशासनाच्या या दुटप्पी भूमिकेबाबत शेतकरी आक्रमक झाले. सीमांकनाव्यतिरिक्त काहीही करू नये, असे सांगूनही अधिकारी पोलीस बळाचा वापर करीत मनमानी कारभार करीत होते. अखेर संतप्त शेतकऱ्यांनी भरावाला तीव्र विरोध केला. धेरंड-शहापूर येथील शेतकऱ्यांनी आक्रमक भूमिका घेत प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. अखेर शेतकऱ्यांच्या तीव्र भूमिकेविरोधात प्रशासनाला नमते घ्यावे लागले. भरावाचे काम थांबवून शेतकऱ्यांच्या मागणीनुसार वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेण्याचे अधिकाऱ्यांनी मान्य केले. धेरंड-शहापूर औद्योगिक क्षेत्राच्या पोहोच रस्त्यासाठी भूसंपादन व सीमांकन करण्यासाठी शेतकऱ्यांनी केलेल्या मागण्यांबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत मुख्यालयात शुक्रवारी (दि.२१) सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास बैठक आयोजित करण्यात आली आहे. याबाबतचे लेखी पत्र कोकण विभागाचे अधीक्षक अभियंता सचिन राक्षे, पनवेल येथील प्रादेशिक अधिकारी भानुदास यादव अलिबागचे कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसीलदार प्रताप राठोड यांच्या संयुक्त सहीने देण्यात आले. त्यानंतर शेतकऱ्यांनी शांतता घेत आपला लढा मागे घेतला. यावेळी शेकाप महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, शेकाप जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य अनिल पाटील, धाकटे शहापूर, पेझारी, धेरंड,मोठे शहापूर परिसरातील शेतकरी, ग्रामस्थ व महिला मोठया संख्येने उपस्थित होते.

## नवी मुंबई विमानतळ प्रवासीसेवेसाठी सज्ज

साजरा केला जातो. यानिमित्ताने सुट्ट्यांच्या हंगामात विमानसेवांमध्ये मागणी वाढते. ही बाब लक्षात घेत नवी मुंबई विमानतळाहून ख्रिसमससारख्या सणाच्या काळात मुंबई, नवी मुंबईकरांना पहिल्यांदा नवी मुंबईच्या जमिनीहून उडण्याचा अनुभव घेता येणार आहे. दिवसभरात १२ उड्डाणे होणार असल्याचे समजते आहे. गोवा, कोलकाता, दिल्ली, अहमदाबाद, केरळ अशा महत्त्वाच्या राज्यांमध्ये सेवा दिली जाणार असल्याचे समजते.

## उमेदवाराची केंद्राबाहेर हकालपट्टी होणार

लागणार आहे. त्यानंतर त्यांच्या प्रती काढून निवडणूक निर्यण अधिकाऱ्यांकडे हा अर्ज सादर करावा लागणार आहे. ही प्रक्रिया १७ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजतापर्यंत चालणार आहे. मात्र अद्यापही नामांकन दाखल करण्याची प्रक्रिया संथ गतीने सुरू आहे. उद्या शनिवारी सुट्टी असूनही नामांकन स्वीकारले जाणार आहेत.मात्र रविवारी नामांकन स्वीकारण्यात येणार नाही. त्यानंतर नामांकन अर्जाची छाननी करून २१ नोव्हेंबर रोजी नामांकन मागे घेण्याची मुदत आहे. याच दिवशी लढतीचे चित्र स्पष्ट होणार आहे. तसेच नामांकन मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी प्रभागातील लढत कोणात होईल, हे स्पष्ट होईल. २५ नोव्हेंबर रोजी निवडणूक चिन्हांचे वाटप केले जाणार आहे. मतदान २, तर मतमोजणी ३ डिसेंबर रोजी होणार आहे. त्यामुळे उमेदवारांना अधिकृत प्रचारासाठी केवळ पाच दिवस मिळणार आहेत.

## ज्येष्ठ अभिनेत्री कामिनी कौशल यांचे निधन

नीचा नगर या चित्रपटाद्वारे बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. याच चित्रपटाने पहिल्या कान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार जिंकला होता आणि पाल्मे डी ओर पुरस्कार जिंकणारा एकमेव भारतीय चित्रपट राहिला. कामिनी कौशल यांनी स्वातंत्र्यापूर्वी, म्हणजेच १९४६ मध्ये आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली. नीचा नगर या चित्रपटातून त्यांनी अभिनय क्षेत्रात पाऊल ठेवले. अशा प्रकारे कान्स फिल्म फेस्टिव्हलशी जोडली जाणारी पहिली भारतीय अभिनेत्री म्हणूनही त्यांचे नाव इतिहासात नोंदवले गेले.कामिनी कौशल यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक उत्कृष्ट चित्रपटांमध्ये काम केले. यात दो भाई (१९४७), नदिया के पार (१९४८), जिद्दी (१९४८), शबनम (१९४९), पारस (१९४९), आदर्श (१९४९), आरजू (१९५०), झांझर (१९५३), आबरू (१९५६), बड़ी सरकार (१९५७), जेलर (१९५८), नाइट क्लब (१९५८),गोदान (१९६३) या चित्रपटांचा समावेश आहे.

## आमदारांना सत्तेचा माज?

प्रतिक्रिया उमटत आहे. महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ अंतर्गत अलिबाग बायपास रोड ते अलिबाग रोहा जंक्शनपासून बेलकडे ते गुरूडपाडा, नागाव हटाळे ते रेवदंडा पुल, साळावपासून तळेखारपर्यंतच्या रस्त्याचे भूमीपूजन शुक्रवारी करण्यात आले. या रस्त्याच्या लगत अनेक गावे, वाडया तसेच घरे, शेतजमीन येतात. त्यांचा विचार न करता, स्थानिकांना विश्वासात न घेता भूमीपूजन करण्यात आले. त्यामुळे एकाच रस्त्याचे आमदार कितीवेळा भूमीपूजन करणार, असा टोलाही नागरिकांनी यावेळी लगावला.

अलिबाग-रोहा मार्गावरील रस्त्याचे भूमीपूजन यापूर्वी चार वेळा करण्यात आले. तत्कालीन भाजपचे नेते तथा शिंदे गटातील विद्यमान कार्यकर्ते दिलीप भोईर आणि दळवी यांच्यात रस्त्याच्या कामावरून श्रेयवादही झाला होता. परंतु आजही रस्ता खड्डेमय असून नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. धुळीच्या त्रासाने प्रवासी वैतागले आहेत.

दरम्यान, मंडप उभारणाऱ्यांकडून कोणतीही आवश्यक परवानगी घेतली नसल्याचा आरोप नागरिकांनी केला असून प्रशासनाच्या निष्क्रीय भूमिकेबद्दलही नाराजी व्यक्त केली आहे. या प्रकरणी अधिकाऱ्यांनी तातडीने दखल घेऊन कारवाई करण्याची मागणी होत आहे.

## नवाब मलिकांना तडाखा

देण्यास नकार दिला.दाऊद याची बहीण हसीना पारकर, सलीम पटेल आणि आरोपी सरदार खान यांच्याशी संगनमत करून बेकायदेशीरपणे हडप केलेल्या मालमत्तेच्या आर्थिक गैरव्यवहारामध्ये मलिक यांचा सहभाग स्पष्ट दिसून येत आहे. ही मालमत्ता आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंधक कायद्यांतर्गत (पीएमएलए) जप्त करण्यात आली असून सर्व आरोपींविरुद्ध आरोप निश्चित करण्यासाठी पुरेसे पुरावे असल्याचे न्यायालयाने आदेशात म्हटले आहे.

ईडीच्या आरोपानुसार, हसीना पारकर, सलीम पटेल, मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपी सरदार खान आणि नवाब मलिक यांनी कुर्ला येथील गोवावाला कंपाउंडमधील मुनीरा प्लंबर या महिलेची तीन एकर जमीन कट रचून बेकायदेशीरपणे हडपली.

या महिलेने १९९९ मध्ये सलीम पटेल याच्या नावाने पॉवर ऑफ एटर्नी काढली होती. पटेल याने त्याचा दुरुपयोग करून पारकर हिच्या आदेशानुसार गोवावाला कंपाऊंडमधील जमीन मलिक यांच्या सॉलिडस इन्व्हेस्टमेंट्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला विकली. मलिक यांनी ही जागा भाडेतत्वावर देऊन त्यातून आलेल्या पैशांमधून वांद्रे, कुर्ला येथे सदनिका आणि उस्मानाबादमध्ये शेतजमीन खरेदी केली. या आर्थिक गैरव्यवहाराप्रकरणी फेब्रुवारी २०२२ मध्ये ईडीने मलिक यांना अटक केली होती. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने मलिक यांना जामीन मंजूर केला होता.

## बिहारमध्ये एनडीएचं द्विशतक

आजवर निवडणुकांमध्ये विजय मिळवून देण्यात सहाय्य करणारे प्रशांत किशोर यांनी यावेळी स्वतःचा पक्ष निवडणुकीत उतरवला होता. मात्र, त्यांना या निवडणुकीत यश मिळालं नाही. त्यांनी २३८ जागा लढवल्या होत्या. मात्र, त्यांच्या पक्षाला एकही जागा जिंकता आली नाही. या निवडणुकीत राष्ट्रीय जनता दलाचा पराभव झाला आहे. राजदला केवळ २५ जागांवर आघाडी मिळाली आहे. मात्र, मतांच्या बाबतीत हा बिहारमधील सर्वात मोठा पक्ष आहे. सायंकाळी सहा वाजेपर्यंत राजदला १ कोटी १० लाख ६३ हजार मतं मिळाली आहेत. संयुक्त जनता दलाला ९२ लाख ८४ हजार, भाजपाला ९७ लाख ५५ हजार, काँग्रेसला ४२ लाख ३५ हजार, लोकजनशक्ती पार्टीला (रामविलास पासवान) २४ लाख ३९ हजार मतं मिळाली आहेत.

## जळगावमधील केमिकल कंपनीला आग

जैन इरिगेशन तसेच वरणगाव, भुसावळ, जामनेर, नशिराबाद नगर परिषदांचे अग्नीशमन बंब दाखल झाले. संबंधित जवानांनी आग विझविण्यास तातडीने सुरूवात केली. दरम्यान, जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्यासह जळगाव शहराचे आमदार सुरेश भोळे यांनीही घटनास्थळी भेट देऊन आगीचे कारण तसेच झालेल्या आर्थिक नुकसानीची माहिती घेतली.भीषण आगीत कोणतीही जीवितहानी झाली नसल्याचे समोर आले आहे. मात्र, केमिकल कंपनीतील तयार व कच्चा माल तसेच इतर महत्त्वाचे साहित्य पूर्णपणे जळून खाक झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाल्याची शक्यता व्यक्त होत आहे. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, शॉर्टसर्किटची शक्यता व्यक्त केली जात आहे. औद्योगिक वसाहत पोलिसांनीही घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन परिसरातील बंदोबस्त वाढवला. त्याच प्रमाणे अग्नीशमन दलाच्या जवानांना आग विझविण्यासाठी हातभार लावला.

## मुंबईत शिवसेना-भाजपमध्ये राडा

जावं असं पोलिसांनी सांगितलं. त्याला अनिल परबांनी विरोध केला. माझ्यासोबत किमान २५ लोक मी आतमध्ये घेऊन जाणार. सत्तेत आहेत म्हणून त्यांना इतका माज आलाय का, असं म्हणत अनिल परबांनी संताप व्यक्त केला.भाजपकडून हॉटेलमध्ये चुकीच्या पद्धतीने कामगार संघटना स्थापन करण्यात आली आहे, त्यामध्ये शिवसेनेच्या कामगार संघटनेच्या कामगारांच्या फसवून सह्या घेण्यात आल्याचा आरोप अनिल परब यांनी केला.

## उरणमध्ये भाजपाने स्थानिकांना डावलले

विचारात न घेता आ. महेश बालदी नेत्यांच्या फोटोचा वापर करत असल्याचा निषेध शिवसेनेचे स्थानिक नेते अतुल भगत यांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे शिवसेना नगराध्यक्ष पदासाठी स्वतंत्र उमेदवार देणार असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नगरसेवक पदासाठी स्वतंत्रपणे १६ उमेदवार देणार असल्याची माहिती भगत यांनी दिली. तसेच ही निवडणूक भाजपाविरोधात नसल्याचा उल्लेख करत आ. बादली यांच्या एकाधिकारशाही विरोधात ही निवडणूक लढत असल्याची माहिती भगत यांनी दिली आहे.

भाजपाने कोणाला उमेदवारी द्यावी हा त्या पक्षाचा विषय आहे. मात्र जर सहकारी पक्षांना सोबत घ्यायचं नसेल तर आमच्या पक्षाच्या नेत्यांचे फोटो वापरू नयेत, असे आमचं मत आहे. तसेच येत्या काही दिवसात उमेदवार जाहीर करणार असून सहकारी पक्ष असलेल्या शिवसेनेशी युतीबाबत चर्चा सुरु आहे, असे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ( अजित पवार गट ) तालुका अध्यक्ष परीक्षित ठाकूर यांनी सांगितले.

स्थानिक भूमीपुत्रांना डावलून आमदार महेश बालदी एक प्रकारे स्थानिकांच्या मताला आपण किंमत देत नसल्याचे दाखवत आहेत. त्यांनी हे यापूर्वी देखील दाखवून दिले आहे. आणि ते आतादेखील तसे सिद्ध करत आहेत, असे शिवसेना उबाठाचे नेते गणेश शिंदे यांनी सांगितले. या विषयी बोलण्यासाठी भाजपा उरण शहर अध्यक्ष कौशिक शहा यांच्याशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधला असता ते बोलण्यासाठी उपलब्ध होऊ शकले नाहीत.

## पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते होणार आरडीसीसीचा गौरव

एकत्रित आणि तितकेच प्रभावीपणे काम करत असल्याने असा अनुभव देखील दुर्मिळ असल्याचे त्यांनी विशेष नमूद केले. बँकेने शासनाच्या योजना प्रभावीपणे राबवून ग्रामीण अर्थव्यवस्थेला सक्षम बनविण्यासाठी मोठी भूमिका बजावली आहे, असे त्यांनी विशेषत्वाने अधोरेखित केले. तसेच बँकेला आवश्यक त्या तांत्रिक आणि आर्थिक सहाय्याचे आश्वासन त्यांनी केंद्र शासनाच्या वतीने दिले.

या भेटीच्या निमित्ताने खालापूर विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे चेअरमन निलेश घोसाळकर यांनी देखील उपस्थित उच्चपदस्थ अधिकाऱ्यांसोबत संवाद साधला तर नाबार्डचे प्रदीप आपसुंदे यांनी नाबार्डच्या प्रकल्पांबाबत माहिती दिली. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक यांनी उपस्थितांचे स्वागत करीत कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यावेळी संस्था संगणकीकरणामध्ये बँकेचे अधिकारी योगेश पाटील आणि नेहा पाटील यांनी उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल त्यांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

पंकज श्रीवास्तव यांनी स्पष्ट केले की, केंद्र शासनाचे उद्दिष्ट सहकारी संस्था सक्षम बनविणे हे असून, ग्रामीण भागात स्वयंरोजगार, उद्योगविकास आणि वित्तीय साक्षरता वाढविण्यासाठी विविध कार्यक्रम सुरू आहेत. रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि स्थानिक सहकारी संस्था यांनी मिळून या उपक्रमांना गती दिल्यामुळे रायगड जिल्हा महाराष्ट्रातील एक आदर्श सहकार मॉडेल बनू शकला आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी श्रीवास्तव यांनी सर्व पदाधिकारी, अधिकारी आणि सभासदांचे सहकार्याबद्दल आभार मानले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बँकेचे विभागीय अधिकारी संदेश पाटील यांनी केले.

## हेटवणे वाडीतील चिमुकली सापडली

यादेखील या शोध मोहिमेमध्ये सामील झाल्या होत्या. अखेर शुक्रवारी सकाळी शोधमोहीम सुरु असतानाच तिसऱ्या डोंगराच्या वरच्या बाजूला ही चिमुरडी पोलिसांना आढळून आली. उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन टोम्पे व पेण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप बागुल आणि त्यांच्या टीमला अखेर यश आले. जवळपास दोनशे लोक गेली तीन दिवस किशोरीला शोधत होते. तिच्यावर प्राथमिक उपचार उपजिल्हा रुग्णालय पेण येथे करण्यात आले आहेत. पुढील तपास पेण पोलीस ठाणे पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्या नेतृत्वाखाली करत आहेत.

## मोटारसायकलला टेम्पोची जोरदार धडक

**रसायनी :** रसायनी पोलीस ठाणे हद्दीत वानिवली गावच्या हद्दीतील रॉयल कार्बन ब्लॅक कंपनी समोरील रोडवर फिर्यादी जीवन शंकर पाटील (वय ४९, रा. खाणावळे ता. पनवेल) हे त्यांचे ताब्यातील मोटारसायकल वरून डबल शिट घेवून वाशिवली ते तळवली असे खारपाडा-सावरोली रोडने स्वतः चालवित घेवून जात असताना वानिवली गावच्या हद्दीतील रॉयल कार्बन ब्लॅक कंपनी समोरील रोडवर आल्यावेळी रॉयल कार्बन ब्लॅक कंपनीतून येणाऱ्या टेम्पो (क्र. डीडी १ डब्लू ९४१८) वरील आरोपी चालक याने त्याच्या ताब्यातील परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन रोडवर आणून फिर्यादी जीवन शंकर पाटील यांच्या मोटारसायकलला ठोकर मारुन अपघात करुन त्याचे तसेच त्यांचे मागे बसलेल्या साक्षीदार यांच्या दुखापतीस कारणीभूत होऊन पळून गेला. याबाबत रसायनी पोलीस ठाण्यात टेम्पो चालकावर बीएनएस कलम २८१, १२५(ठ), १३४, १८४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली तपासिक अधिकारी एस. आर. म्हात्रे अधिक तपास करीत आहेत.


### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


### प्रेस नोट

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांची सार्वत्रिक निवडणुक २०२५ च्या अनुषंगाने जिल्हास्तरावर व तालुकास्तरीय निवडणुका कामकाजाच्या अनुषंगाने कार्यालयामार्फत झेरॉक्स मशीन/झेरॉक्स प्रती/बाईडींग करणे व इतर अनुषंगिक बाबीचा पुरवठा करणेकामी ई-निविदा सूचना वर्तमानपत्रामध्ये, तसेच https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या. उक्त निविदा भरण्यासाठी दिनांक २४/१०/२०२५ सकाळी ११.०० वाजता पासून ते दिनांक ०७/११/२०२५ सायंकाळी ०५.०० पर्यंत मुदत देण्यात आली होती.

तथापि, उक्त ई-निविदा सूचनेच्या अनुषंगाने तीन पेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्या असल्याने सदर ई-निविदा सूचनेस दिनांक ०७/११/२०२५ ते १३/११/२०२५ अशी मुदतवाढ देण्यात आली होती. सदर कालावधीमध्ये देखील कोणतीही नवीन निविदा प्राप्त झालेली नसल्याने, उक्त निविदेसाठी दुसऱ्या आठवड्याची मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदर फेर निविदा प्रक्रियेस दिनांक १३/११/२०२५ ते १९/११/२०२५ या कालावधीसाठी दुसरी तसेच अंतिम मुदतवाढ देण्यात येत आहे. उक्त निविदा प्रक्रियेसंबंधी सर्व माहिती https://mahatenders.gov.in तसेच www. raigad.gov.in या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

स्थळ :- अलिबाग
दिनांक :- /११/२०२५

सही/-
(किशन ना. जावळे)
जिल्हाधिकारी रायगड

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडून आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात खालील नमुद पत्त्यावरही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे - किकवी, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| बाळाराम पांडुरंग हाडप | १४१ | ३/ब | ०-१३-०८ | १-४४ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता : मु.पो.कशेळे, कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्यासमोर, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

सही/-
ॲड. भुपेश तानाजी पेमारे
दिनांक १५-११-२०२५
मो.नं.९१५८२७७७२८

### रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग केंद्र कार्यालय अलिबाग

प्रिव्हेन्शन ऑफ मनी लॉंड्रींग ॲक्ट २००२ व रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार बँकांना सर्व खातेदारांचे वेळोवेळी के.वाय.सी. अपडेट करुन घेण्याचे आहे.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या परिपत्रक क्र.आरबीआय/डीबीआर/२०१५- १६/१८ मास्टर डायरेक्शन/डीबीआर/ए.एम.एल/बी.सी.नं.८१/१४-०१-००१/२०२५-१६, दिनांक २५-०२-२०१६ नुसार बँकेतील सर्व खातेदारांनी सुचित करण्यांत येत आहे की, बँकेच्या खातेदारांनी के.वाय.सी. (आधार कार्ड, पॅन कार्ड, इलेक्शन कार्ड, पासपोर्ट, नरेगा जॉब कार्ड, ड्रायव्हींग लायसन्स) मुळ डॉक्युमेंट्स् व अद्यावत फोटोसह डॉक्युमेंटची स्व:साक्षांकीत प्रत घेऊन संबंधित शाखेत (खाते असलेल्या शाखेत) उपस्थित राहून के.वाय.सी. अपडेशन करण्यासंदर्भात साक्षांकित प्रत जमा करुन आम्हाला सहकार्य करावे.

सर्व खातेदारांनी वेळेवर के.वाय.सी. कागदपत्रांची अपडेशन केले गेले नाही तर प्रिव्हेन्शन ऑफ मनी लॉंड्रींग ॲक्ट २००२ व रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे आपल्या खात्यावर व्यवहार करण्यास प्रतिबंध करण्यांत येईल याची नोंद घ्यावी.

सही/-
मुख्य कार्यकारी अधिकारी






### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडून कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्तीबरोबर लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांनबरोबर आपला खरेदीव्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे - मालेगावतर्फे कोतलखलाटी, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.चौ.मी. | रुपये | पैसे |
| १) शांताराम गोविंद मोडक<br>२) अशोक गुणाजी पाटील | १० | २ | ०-३७-०० | ० | ३० |
| | ४ | २ | ०-२१-२० | १ | ९५ |
| | ४ | १ | ०-१८-२० | १ | ७० |
| | ३ | १ | ०-४४-५० | ४ | १५ |

पैकी हे.आर.पॉ.०.१६.०० इतके क्षेत्र

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता : ए विंग, फ्लॅट नं.४, पहिला मजला, गणेश अपार्टमेंट, कर्जत नगरपालिका कार्यालयाशेजारी, ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१

सही/-
ॲड. जयेश संभाजी म्हसे
दिनांक १५-११-२०२५
मो.नं.९०२८९८२२७७
ई मेल :- adv.jayeshmhase@gmail.com

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे बोपेले, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | चौरस मिटर | रुपये | पैसे |
| निता दत्तात्रेय गायकवाड<br>शिरीष दत्तात्रेय गायकवाड | १७/४ | ६ | २२६.०० | २२ | ६० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- शॉप नं. २, तळमजला, साईकृपा सोसायटी, नेरळ बस स्टॅण्डजवळ, नेरळ पूर्व, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०१०१

सही/-
ॲड. नितीन अर्जुन क्षिरसागर
दिनांक :- १५/११/२०२५
मो. नं. ९३७२९६४६६५

### जाहीर नोटीस

माझे आशील यांनी दिलेल्या माहिती वरून व सांगितले वरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालील प्रमाणे:-
मौजे देहरंग, ता.पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत.

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र एकक आर.चौ.मी. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| देहरंग | १/ड/१ | ६.००.०० | ६.९५ |

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत, त्यातील झाड झाडोरा, वहिवाटीचे हक्क, कुंपण, वगैरे सह अशी मिळकत सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक श्री.मनोज मनसुखलाल तुरकिया, रा. आदर्श बिल्डींग, फ्लॅट नं. ५, स्वामी विवेकानंद रोड, सांताक्रुझ (पश्चिम), मुंबई ४०००५४ यांचे मालकी हक्काची व कब्जे वहीवाटीची व निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे मालक यांनी माझे आशिल यांस दिला आहे. माझे आशिल यांनी श्री. मनोज मनसुखलाल तुरकिया यांचे सदरहू मिळकती वरील मालकी हक्काची तपासणी करण्याच्या सुचना दिल्या आहेत. याउपरही सदर मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, कब्जा, वहीवाटीचं हक्क, कुळ वहिवाट वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात, नोटरी सत्यप्रती व कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांजकडे नोटीस प्रसिध्द झाल्या पासून १४ दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजण्यात येईल. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख १४.११.२०२५

(ॲड. एस. वाय. बारटके)
मु.पो.ता.अलिबाग, जि. रायगड

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने कळविणेत येते की, खाली नमुद केलेली शेतजमिन मिळकत ही या खाली दिलेल्या जमिन मालक यांचे नावावर ७/१२ उतारा सदरी महसुल दप्तरी नांवे असनु त्या त्यांचे खुद्द ताबा कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे त्या शेतजमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-
**मौजे तारेघर, ता. रोहा, जि. रायगड येथिल ....**

| मालकाचं नांव | गट नं. | एकुण क्षेत्र हे.आर | आकार रु. पै. | प्रकार |
|---|---|---|---|---|
| श्रीमती आशा अशोक मातेरे व इतर ३ | ५९/२ | जिरायत ००-१३-३०<br>पो.ख. ००-०२-००<br>एकुण ००-१५-३०<br>यापैकी दिलीप यशवंत मातेरे यांच्या हिश्याचे क्षेत्र वगळून | ३.३५ | खालसा |

वरील मिळकतीसंबंधात आमचे अशिल यांनी जमिन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहाण, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिन चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, ताबा, कब्जा, वहिवाट वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, वाद, तंटा चालु असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन (७) सात दिवसांत लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध आहे असे समजुन आवश्यक कागदपत्रे सादर करुन खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

दि.१४/११/२०२५

सही/-
ॲड. पी.जी.दाभाडे
रा. फ्लॅट नं.४०२, बी-वींग, चौथा मजला, साईनगरी सोसायटी, छत्रपती शिवाजी नगर, डॉ. वागळे हॉस्पिटल जवळ, ता. रोहा, जि. रायगड पिन नं. ४०२१०९
मोबा नं. ९२७२७१३९५६

# ठेकेदार आर्थिक संकटात

## ।। बाहेरच्या ठेकेदारांमुळे आली बेकारी ।। केलेल्या कामाची बिले अडकली

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



कर्जत येथील ठेकेदार आर्थिक संकटात आहे असून बहुसंख्य ठेकेदारांची केलेल्या कामाची बिले अडकली आहेत.त्यात कर्जत तालुक्यात बाहेरचे ठेकेदार येऊन कामे करतात आणि स्थानिक ठेकेदार यांना कामे मिळत नाहीत. त्यामुळे स्थानिक ठेकेदार यांच्यावर आर्थिक कुऱ्हाड कोसळली आहे. दरम्यान ठेकेदारी वर्गात मोठ्या प्रमाणावर बेकारीची स्थिती निर्माण झाली आहे.

कर्जततालुकाठेकेदारसंघटनेची बैठक संघटनेचे अध्यक्ष राहुल डाळिंबकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. कर्जत तालुक्यातील अनेक ठेकेदारांना काम मिळत नसल्याने त्यांच्या हाताला रोजगार नाही. वर्षानुवर्षे ठेकेदारी हाच व्यवसाय असणारे अनेक ठेकेदार छोटी-मोठी कामे करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते. परंतु, मागील काही वर्षात बाहेरील ठेकेदारांनी कर्जत तालुक्यात मोठ्या प्रमाणात घुसखोरी केली. राजकीय शक्तींना हाताशी धरून ते बहुतांश कामे मॅनेज करुन परस्पर लाटत असल्याने स्थानिक ठेकेदार कामापासून वंचित राहात आहेत. याबाबत ठाम निर्णय घेण्याबाबत अध्यक्ष राहुल डाळिंबकर यांनी सल्ला दिला.

स्थानिक ठेकेदार २-५ लाख रुपयांच्या कामासाठी विनवणी करावी लागत आहे. मात्र, बाहेरील ठेकेदार ६०-७० कोटी रुपयांची कामे मिळवतो, यामुळे स्थानिक ठेकेदार बेकार झाले आहेत. बाहेरील ठेकेदार कामे मिळवताना नियमबाह्य आर्थिक देवाण-घेवाण होत असल्याने त्यांच्याकडून कामाचा दर्जा राखला जात नाही. त्यामुळे यावर्षी केलेले रस्त्याचे काम पुढच्या वर्षीपर्यंत टिकत नसल्याने नागरिकांना खड्ड्यातून प्रवास करावा लागतो. याबाबत नागरिकांनी कितीही आवाज उठवला तरी सदरचे ठेकेदार बाहेरील असल्याने त्यांना काही फरक पडत नाही.

याउलट, स्थानिक ठेकेदार काम करीत असताना आपल्या परिसरातील रस्ता चांगला व्हावा याकरिता कामाचा दर्जा राखण्यावर भर देतो. चार पैसे कमी मिळाले तरी चालतील, परंतु बदनामी नको आणि स्थानिक लोकांची गैरसोय होऊ नये म्हणून काळजी घेतो. असे असतानादेखील बाहेरील ठेकेदार यांना झुकते माप देतात. सद्यः स्थितीत कर्जत तालुक्यात बाहेरील ठेकेदारांनी शेकडो कोटींची कामे परस्पर घेऊन ती निकृष्ट दर्जाची कामे चालू आहेत. कर्जत तालुका ठेकेदार संघटनेने याविरोधात संताप व्यक्त केला असून, बाहेरील ठेकेदारांना कोणत्याही परिस्थितीत येथे काम करू न देण्याचा निर्धार केला आहे.

स्थानिक ठेकेदारांनी आपसातील मतभेद आणि राजकीय मतं बाजूला ठेवून एकत्र आला नाहीत, तर शहरांत गावात जसे रस्ते परप्रांतीयांनी व्यापले आहेत तसेच हे बाहेरील ठेकेदार एक दिवस आपल्याला या व्यवसायातून बाहेर फेकतील हे नक्की लक्षात असू द्या, असे स्पष्ट मत संघटनेचे सचिव उदय पाटील यांनी व्यक्त केले.

## ॲड. मंगेश नेनेंची बिनविरोध निवड

**खरोशी :** कास्प संस्थेच्या गव्हर्निंग कौन्सिलच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत ॲड. मंगेश नेने यांची सदस्य म्हणून बिनविरोध निवड झाली आहे. सामाजिक कार्यातील त्यांच्या दीर्घ अनुभवामुळे आणि संस्थेच्या उपक्रमांमध्ये दिलेल्या सक्रिय योगदानामुळे ही निवड अपेक्षित मानली जात आहे. त्यांच्या निवडीमुळे संस्थेच्या कार्यात नवीन ऊर्जा आणि दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. या निवडणुकीत माजी पोलीस महासंचालक जयंत उमराणीकर यांची गव्हर्निंग कौन्सिलच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली. तसेच, भाग्यश्री डेंगळे यांची उपाध्यक्षपदी आणि निवेदिता दासगुप्ता यांची सदस्य म्हणून निवड झाली आहे.



## पाच लाखांची फसवणूक, गुन्हा दाखल

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

स्टीलसाठी दिलेले पाच लाख १४ हजार ४०० रुपये परत न करता फसवणूक केल्याप्रकरणी अनोळखी इसमाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात दि. ११ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

पनवेल येथील संतोष शंकर अस्वले यांचा बिल्डिंग मटेरियल सप्लायरचा व्यवसाय आहे. त्यांना ९ टन टाटा स्टीलची ऑर्डर मिळाली. डीलरकडे टाटा स्टील उपलब्ध नसल्याने त्यांनी गुगलवर व्यक्ती आणि एजन्सी सर्च केली असता मोबाईल नंबर मिळाला. संपर्क केला असता यावेळी समोरील इसमाने पाच लाख १४ हजार ४०० रुपयांचे बिल पाठवले. आणि त्यानंतर संतोष यांनी आरटीजीएसद्वारे पेमेंट केले. दुसऱ्या दिवशी समोरील इसमाने लहान ऑर्डरसाठी डिलिव्हरी होऊ शकत नाही, १५ ते १८ टन ऑर्डर केल्यास डिलिव्हरी केली जाईल अन्यथा ऑर्डर ब्लॉक करून पैसे परत केले जातील, असे सांगितले. त्यावेळेस संतोष यांनी पैसे परत करण्यास सांगितले. त्यावेळी २४ तासात पैसे येतील असे सांगितले. त्यानंतर संतोष यांनी बँकेत जाऊन चौकशी केली असता समोरील इसमाचे नाव विनोद कुमार व मेरठ येथील बँक असल्याचे समजले. त्यांनी आरटीजीएस केलेले पाच लाख १४ हजार ४०० रुपये परत आले नाहीत. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला.

## प्रवाशाचा फोन रेल्वेतून पडला

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

प्रवासादरम्यान खूप गर्दी असल्याने अचानक रेल्वेतून पडलेला मोबाइल फोन रेल्वे पोलिसांनी शोधून प्रवाशाला परत केला. खारघर येथील १९ वर्षीय विद्यार्थी रेल्वेने प्रवास करत असताना खांदेश्वर ते मानसरोवर स्थानकादरम्यान त्याचा फोन रुळावर पडला. त्यानंतर त्याने तातडीने याची तक्रार रेल्वे पोलिसांकडे केली. त्याची तातडीने दखल घेत खांदेश्वर स्थानकावर उपस्थित रेल्वे पोलिसांनी त्याचा फोन शोधून त्याला परत केला. दरम्यान, या विद्यार्थ्यांने रेल्वे पोलिसांचे आभार मानले आहेत.

## उपसरपंचपदी रोहिणी विरले बिनविरोध

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



नेरळ दहिवली ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी रोहिणी निलेश विरले यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. गुरुवार, दि. १३ नोव्हेंबर रोजी रोजी उपसरपंचपदाची निवडणूक पार पडली. त्यावेळी रोहिणी विरले यांचा एकमेव अर्ज आल्याने सरपंच मेघा मिसाळ आणि ग्रामसेवक यांनी रोहिणी विरले यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले.

दहिवली तर्फे वरेडी ग्रामपंचायतीत मेघा अमर मिसाळ या थेट सरपंच म्हणून काम पाहत असून, उपसरपंच सोनम गायकवाड काम पाहात होत्या. त्यांचा कार्यकाळ संपल्यानंतर त्यांनी राजीनामा दिला होता. त्या रिक्त जागेवर निवडणूक घेण्यात आली. त्यावेळी उपसरपंच म्हणून रोहिणी निलेश यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

यावेळी सरपंच मेघा मिसाळ, कर्जत पंचायत समितीचे माजी सभापती अमर मिसाळ, माजी उपसरपंच नरेश कालेकर, माजी उपसरपंच सोनम गायकवाड, सदस्य स्वाती विरले, माजी उपसरपंच यशवंत भवारे, विष्णू वाघमारे, अंकिता विरले, निलेश विरले, रवी मिसाळ, सुनील विरले, माजी उपसरपंच कैलास विरले, आत्माराम विरले, नारायण विरले, सचिन कडू, मनीष विरले, विनोद माळी, आत्माराम घोडविंदे, संजय कराळे, संतोष धुळे, अरुण माळी, अमोल गायकवाड, मयूर विरले, प्रदीप मिसाळ आदी उपस्थित होते.

## ‘उलगुलान म्हणजे अन्यायाविरोधातील जाज्वल्य ज्वालाग्राही घोष’

**। पेण । प्रतिनिधी ।**



क्रांतिकारी बिरसा मुंडा हे केवळ आदिवासींचे प्रेरणास्थान नव्हते, तर समाजपरिवर्तनाची तळमळ बाळगणाऱ्या प्रत्येक नागरिकाच्या मनात जागा करून देणारे तेजस्वी नेतृत्व होते. त्यांची ‘उलगुलान’ चळवळ म्हणजे केवळ बंड नव्हे तर, अन्याय, शोषण आणि दडपशाहीविरोधातील जाज्वल्य ज्वालाग्राही घोष होता. स्वाभिमान, सामूहिक ऐक्य आणि प्रतिकारशीलतेचा धगधगणारा भूगर्जन प्रत्यक्षात आणणारे बिरसा मुंडा हेभारताच्यास्वातंत्र्यलढ्यातील पहिल्या अस्मितावादी आवाजांपैकी एक होते, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वैशाली पाटील यांनी केले.

त्या बिरसा मुंडा जयंतीनिमित्त शासकीय आदिवासी प्रकल्प कार्यालय संचलित आदिवासी मुलींच्या वसतिगृहात आयोजित कार्यक्रमात आपल्या सत्काराला उत्तर देताना बोलत होत्या.

आजच्या आधुनिक काळातही आपल्या मनातील अंधाराविरुद्ध, अन्यायाविरुद्ध, भेदभावाविरुद्ध आणि अधिकारांसाठी जागृती करुन उभे राहण्याची गरज आहे. बिरसा मुंडांचे आदर्श आपल्याला एकत्र येऊन समाज सक्षमीकरणाचा मार्ग दाखवतात, असेही डॉ. पाटील यांनी यावेळी नमूद केले.

या कार्यक्रमात सहायक प्रकल्प अधिकारी सुप्रिया पाटील यांच्यासह महाविद्यालयीन आदिवासी विद्यार्थिनी, सामाजिक कार्य महाविद्यालयातील विद्यार्थिनी आणि संस्थेतील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना मानसी पाटील यांनी केली आणि हा उपक्रम शासनाच्या बिरसा मुंडा सप्ताहाचा एक भाग असल्याची माहिती दिली.

याप्रसंगी आदिवासी कार्यकर्ते नीरा वीर आणि महेश पवार यांचा सहायक प्रकल्प अधिकारी सुप्रिया पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी सुप्रिया पाटील यांनी शासनाच्या धोरणांची माहिती दिली; तर महेश पवार यांनी आपले सामाजिक उपक्रम मांडत तरुणांना प्रेरणा दिली.

## आघाडीच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यात महाविकास आघाडीच्या जनसंपर्क कार्यालयाचे माजी आ. मनोहर भोईर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. उरण शहरातील गणपती मंदिराशेजारी मध्यवर्ती कार्यालय उभारण्यात आले आहे. महाविकास आघाडीच्या सर्व प्रमुख नेत्यांच्या आणि कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत हा उद्घाटन सोहळा पार पडला.

याप्रसंगी भावना घाणेकर, मनोहरभोईर यांनी आणि महाविकास आघाडीच्या घटक पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी उरण शहराच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या मूलभूत समस्या सोडवण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली. त्यांनी शहर विकासाचा आपला व्हिजन उपस्थितांसमोर मांडले. सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवून पारदर्शक कारभार देण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

यावेळी काँग्रेस नेते मिलिंद पाडगावकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रदेश कार्यकारिणी सदस्य आनंद भिंगार्डे, गणेश शिंदे, रेहमान सय्यद, शहबाज पटेल, जैद मुल्ला, शेकाप तालुका चिटणीस रवि घरत, समाधान म्हात्रे, सुनील तांडेल, प्रदीप तांडेल, गणेश नलावडे (नाना), सचिन पाटील, मंगेश कांबळे, प्रकाश म्हात्रे, संतोष म्हात्रे, चेतन म्हात्रे, बाबा मुकरी, जगजीवन भोईर, गुफरान तुंगेकर आदी उपस्थित होते.

## कर्जत : एक उमेदवारी अर्ज दाखल



**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत न.पा. निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी दि.१० ते १७ नोव्हेंबर अशी कालमर्यादा आहे. नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी पहिल्या तीन दिवसांत एकही नामनिर्देशनपत्र दाखल झाले नव्हते. मात्र, आज चौथ्या दिवशी एक अर्ज दाखल करण्यात आला, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार म्हणून प्रभाग क्र. दोनमधून संकेत जनार्दन भासे यांनी शुक्रवारी अर्ज दाखल केला आहे.

## मतदानाबाबत विद्यार्थ्यांकडून जनजागृती

### विद्या विकास शाळेची शहरातून रॅली

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत शहरात नगरपरिषदेच्या निवडणुकीच्या निमित्ताने दोन डिसेंबर रोजी मतदान पार पडणार आहे.त्या निमित्ताने कर्जत शहरातील विद्या विकास शाळेच्या विद्यार्थ्यांनी रॅली काढून आणि पथनाट्य सादर करून कर्जत शहरातील नागरिकांना आवाहन केले.

कर्जत नगरपरिषदेची सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम राबविला जात आहे.त्या माध्यमातून राज्य निवडणूक आयोगाने या निवडणुकीसाठी आदर्श आचारसंहिता जारी केली आहे. निवडणुकीत अधिक प्रमाणात मतदान व्हावे यासाठी नवनवीन योजना राज्य निवडणूक आयोगाने हाती घेतल्या आहेत. त्यासाठी शासकीय अधिकारी तसेच निवडणूक यंत्रणा यांच्याकडून वेगवेगळे उपक्रम राबविले जात आहेत. मतदानाचा टक्का वाढवणे हे राज्य निवडणूक आयोगाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यामुळे शहरातील सामाजिक संस्था यांच्याकडून जनजागृती मोहीम राबविण्याची सूचना निवडणूक यंत्रणा यांच्याकडून करण्यात आली आहे. कर्जत नगरपरिषद निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. धनंजय जाधव आणि सहायक निवडणूक निर्णय अधिकारी मुख्याधिकारी तानाजी चव्हाण यांनी आवाहन केल्यानंतर कर्जत शहरातील महिला मंडळाच्या विद्या विकास शाळेच्या विद्यार्थ्यांनी शहरात रॅली काढून मतदान टक्का वाढावा यासाठी प्रयत्न केला.

कर्जत शहरातील विद्या विकास शाळेच्या विद्यार्थ्यांनी शाळेच्या कार्याध्यक्ष मीना प्रभावळकर, शाळेच्या मुख्याध्यापिका स्नेहा गाढे, श्रद्धा मुंढेकर, मेघा पिंगळे, प्रेमा पितळे, स्मिता गणवे, आरती कोकरे, अर्चना भुसाळ, सुमिता अहिरराव या शिक्षक वर्गाने विद्यार्थी यांच्यासोबत रॅलीमध्ये सहभाग घेतला. नगरपरिषद कार्यालयाच्या बाजूला असलेली विद्या विकास शाळेच्या विद्यार्थ्यांनी रॅलीची सुरुवात केली आणि पुढे ही रॅली हनुमान मंदिर पाटील आळी अशी स्टेशन रस्त्याने मुख्य बाजारपेठेत आली. बाजारपेठेतून पोस्ट कार्यालय येथून कपालेश्वर मंदिर येथे पोहोचली. तेथे लोकमान्य टिळक चौकात या विद्यार्थ्यांनी दोन डिसेंबर रोजी होणाऱ्या निवडणुकीसाठी सर्वाधिक मतदारांनी मतदान करावे, असे आवाहन केले. तेथे पथनाट्य सादर केली त्यावेळी हजर असलेल्या शहरातील नागरिकांनी या मतदार जनजागृती मोहिमेचे कौतुक केले.

# निवडक

## मच्छीचे पाणी रस्त्यावर

**श्रीवर्धन :** श्रीवर्धन शहरातील जीवनाबंदर परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात मच्छिमारी बोटी मच्छी घेऊन येत असतात. सदरची मच्छी आणल्यानंतर ती बाहेरगावी पाठवण्यासाठी मच्छी वाहून नेणाऱ्या वाहनांचा उपयोग केला जातो. यामध्ये पिकअप, ट्रक, टेम्पो यांचा समावेश असतो. परंतु, या वाहनांमधून मच्छीचे पाणी रस्त्यावर सांडत असल्यामुळे दुचाकीस्वार घसरून अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. कारण, मच्छी वाहून नेणाऱ्या गाड्यांमधील पाणी हे अत्यंत बुळगबुळीत असते. त्यावरून गाड्यांचे टायर लवकर सरकतात. श्रीवर्धन शहरातून अशाप्रकारे मच्छी वाहून नेणाऱ्या वाहनांची वर्दळ दिवस-रात्र सुरू असते. अनेक वेळा या वाहनांमधून पाणी सांडत असते. त्यामुळे रस्त्यावरदेखील मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी पसरलेली पाहायला मिळते. मच्छीचे पाणी रस्त्यावर सांडू नये यासाठी गाड्यांना टाक्या बसविलेल्या असतात. परंतु, त्यामध्ये पाणी न सोडता हे पाणी रस्त्यावर सोडण्याचे प्रताप सदरचे गाडी चालक करत असल्याने शहरामध्ये विनाकारण दुर्गंधी पसरत आहे. तरी श्रीवर्धन पोलिसांनी मच्छीचे पाणी सांडवत जाणाऱ्या वाहनांवरती गुन्हे दाखल करून कारवाई करावी, अशी मागणी शहरातील नागरिकांमधून करण्यात येत आहे.

## पनवेल वाहतूक पोलिसांची तत्परता

**पनवेल :** पनवेल शहर वाहतूक शाखेच्या तत्परतेमुळे हरवलेली बॅग व मौल्यवान वस्तू परत मिळाल्याची घटना पनवेलमध्ये घडली आहे. पनवेल शहर वाहतूक विभागात पनवेल रेल्वे स्टेशन (पश्चिम) परिसरात भाईंदर येथील रिंकू प्रजापति करंजाडे येथे त्यांच्या नातेवाईकाकडे आल्या होत्या. दरम्यान, त्यांची बॅग व त्यातील मौल्यवान वस्तू रिक्षामध्ये गहाळ झाल्या होत्या. रेल्वे स्टेशन परिसरात रिक्षा चालकाचा शोध घेतला व विचारपूस केली; परंतु तो मिळून आला नाही. याबाबत त्यांनी पनवेल शहर वाहतूक विभागात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तपासात तत्परता दाखवत रिक्षाचालकाला शोधून काढत हरवलेली बॅग व मौल्यवान वस्तू त्यांच्या ताब्यात दिल्या. या कारवाईमुळे पनवेल शहर वाहतूक पोलिसांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक (पनवेल शहर वाहतूक) औदुंबर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शेरखाने, पो. हवा. युवराज येळे, पो. हवा. आमीर मुलाणी आदींनी शोधकार्यात मदत केली.

## राकेश जाधव भाजपच्या वाटेवर

**पनवेल :** पनवेल शहरातील काँग्रेस चे युवा नेते राकेश जाधव हे भाजप पक्षाच्या वाटेवर असल्याचे दिसून येत असून, त्यांनी यासंदर्भात नुकतीच भाजप आमदार विक्रांत बाळासाहेब पाटील यांची भेट घेऊन पुढील वाटचालीसंदर्भात चर्चा केली आहे. प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशानुसार, मागील महिन्यात ठाणे येथील झालेल्या आढावा बैठकीमध्ये फादर काँग्रेस, महिला काँग्रेस, युवक काँग्रेस, एन,एस,यु, आय काँग्रेस आणि सेल विभागाच्या नियुक्ती न केल्यामुळे प्रभाग क्रमांक १९ चे इच्छुक उमेदवार युवक क्रीडा काँग्रेस अध्यक्ष राकेश जाधव यांनी ऐन महानगपालिका निवडणूकीपूर्वी आपला पदाचा आणि पक्ष सदस्यवताचा राजीनामा जिल्हा अध्यक्ष सुदाम पाटील पनवेल शहर काँग्रेस अध्यक्ष लतीफ शेख यांच्याकडे सोपविला आहे. राकेश जाधव यांनी राजीनामा दिल्यामुळे काँग्रेस पक्षाला प्रचंड मोठा धक्का बसला आहे.



## विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे धडे

**उरण :** कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात अमली पदार्थ जागृती व सायबर गुन्हे या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन केले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमात उरण पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेश खांदवे यांनी अमली पदार्थविरोधी कायदे व विद्यार्थ्यांनी घ्यावयाची काळजी, तसेच सायबर फ्रॉड कसे होतात हे सांगून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत विद्यार्थ्यांची भूमिका याविषयी मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थी म्हणून जीवन जगताना कशा पद्धतीने वाटचाल करावी याविषयी दिशा दाखवली व मोलाचा सल्ला दिला. कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ प्रा. व्ही.एस. इंदुलकर हे होते त्यांनी विद्यार्थ्यांनी शिस्त पालन करून अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे, असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी केले. तर, उपस्थितांचे आभार सह कार्यक्रम अधिकारी प्रा. विनिता तांडेल यांनी व्यक्त केले. कार्यक्रमात महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## शिक्षणासमवेत भाजीपाल्याचे धडे | तलवली शाळेच्या शिक्षकांचे मोलाचे योगदान

# विद्यार्थ्यांनी फुलविला भाजीचा मळा

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

मराठी शाळा आता डिजिटल होत चालल्या असून, विद्यार्थ्यांना घडविण्याचे मोलाचे योगदान शिक्षक वर्ग करीत आहे. शालेय शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांचे वडील हे शेतकरी असल्यामुळे शिक्षणासमवेत घरच्या घरी भाजीचा मळा कसा पिकवायचा याचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळत आहे. या उद्देशाने या शाळेमध्ये वृक्षांचे महत्त्व, आपल्या सभोवताली असलेल्या जागेमध्ये भेंडी, वांगी, दुधी, मिरची, पालक, टोमॅटो, कोथिंबीर, मेंथी, मुळा, काकडी तसेच कडधान्ये पिकविण्याचे प्रशिक्षण मुख्याध्यापक मस्तान बोरगे, उपशिक्षक सुरेश मांडे हे मुलांना देत आहे.



सकाळी, सायंकाळी प्रत्येक वेळी हातपाय धुण्यासाठी पाण्याचा वापर होतो. मात्र, हेच पाणी एका ठिकाणी जमा करुन यापासून भाजीचे पीक घेतले जाऊ शकते. त्याचबरोबर आपल्या दैनंदिन जीवनात आपल्या आहारात वापरु शकतो, या विचारांतून विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासमवेत भाजीपाला कसा लागवड करायचे याचे प्रात्यक्षिक करून दाखविले जात आहे. विद्यार्थ्यांना रोज जेवण शाळेत मिळत असते. मात्र, आपल्या रोजच्या जेवणात पालेभाज्यांचा समावेश असावा या विचारांतून येथे भाजीपाला लागवड केली आहे.

आपल्या अल्पशा जागेमध्ये रासायनिक खताचा वापर न करता सेंद्रीय खताचा वापर करून ही पिके घेतली तर मानवाला कोणतेही अपायकारक होऊ शकत नाही. मात्र, जास्त उत्पन्न आणि कमी वेळामध्ये घेतल्यामुळे यांच्यापासून विविध आजार निर्माण होत आहेत. विद्यार्थ्यांना शिक्षणासमवेत सेंद्रिय खताच्या माध्यमातून भाजीपाला लागवड करण्याचे मार्गदर्शन करीत आहे. शालेय पोषण आहारामध्ये या भाज्यांचा समावेश असून, दैनंदिन जीवनात भाजीपाल्यांचा प्रश्न मार्गी लावण्यास मदत झाली आहे.

> **शैक्षणिक अभ्यासाच्या माध्यमातून खत कसे तयार करायचे यांचे मार्गदर्शन दिले जात आहे. या शाळेच्या सभोवताली अनेक वृक्ष असून, यांचा पडलेला पाला कुजून खताची निर्मिती केली जात आहे. शिवाय, विद्यार्थ्यांसाठी स्वच्छतेसाठी ठेवण्यात आलेले पाणी कालव्याच्या माध्यमातून लागवड केलेल्या भाजीपाल्यापर्यंत पोहोचत असून, याचाही सदुपयोग होत आहे.**
>
> **- मस्तान बोरगे, मुख्याध्यापक, राजिप शाळा तलवली**

## कापूर कंपनीच्या सांडपाण्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान

**। खोपोली । प्रतिनिधी ।**



केमिकल्सयुक्त कापूर उत्पादन करणाऱ्या मंगलम ऑरगॅनिक्स कंपनीच्या मागच्या बाजूला सूर्यकांत गायकवाड यांची शेती आहे. शेतामध्ये अनेक वर्षांपासून प्रदूषित सांडपाणी राजरोसपणे सोडल्यामुळे शेतात काळ्या पाण्याचे डबके साठल्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे.

अनेक वर्षांपासून कंपनी व्यवस्थापन अरेरावी करीत आहे. याविरोधात भीमशक्ती संघटनेचे बैठा सत्याग्रह आंदोलन संस्थापक सरचिटणीस गोपाळ तंतरपाळे यांनी तहसील कार्यालयासमोर गुरूवार, दि.६ नोव्हेंबर रोजी केले होते. तहसीलदार अभय चव्हाण यांनी आंदोलनाची दखल घेऊन प्रदूषण मंडळ आणि कृषी विभागाला नुकसानीची पाहणी करण्यासाठी पत्र दिले होते. प्रदूषण मंडळाचे क्षेत्र अधिकारी शिवानंद बसवडे यांनी १२ नोव्हेंबर रोजी शेतीची पाहणी करून शेतामधील केमिकलसयुक्त काळे पाणी तपासणीसाठी घेऊन गेले आहे.

गेल्या २५ वर्षांपासून कंपनीचे प्रदूषित सांडपाणी माझ्या शेतात सोडल्यामुळे शेती नापीक झाली आहे. प्रदूषण मंडळाकडे अनेक वर्षांपासून पत्रव्यवहार करूनही दखल घेतली जात नसून, कंपनी मालक हा पाणी कंपनीतील नसून गावच्या नाल्याचे असल्याचे सांगून जबाबदारी टाळत आहे. परंतु, माझ्या शेतीची नुकसान करणाऱ्या मंगलम कंपनीवर कारवाई केली नाहीतर शेताच आत्मदहन करणार असल्याचा इशारा बाधित शेतकरी सूर्यकांत गायकवाड यांनी दिला आहे. तर, शेतकरी सूर्यकांत गायकवाड यांच्या शेताची पाहणी करून पाणी तपासणीसाठी घेतले आहे. कंपनीची पाहणी करून अहवाल वरिष्ठांकडे पाठवणार असल्याची माहिती प्रदूषण मंडळाचे क्षेत्र अधिकारी शिवानंद बसवडे दिली आहे.

## कत्तल क्रमांक दोन

गेल्या वर्षी याच सुमारास महाराष्ट्रात जे घडले त्याची पुनरावृत्ती बिहारमध्ये झाली आहे. बिहार विधानसभा निवडणुकांमध्ये भाजप आणि नीतीशकुमार यांच्या आघाडीने काँग्रेस व लालूंच्या महागठबंधन आघाडीची अक्षरशः कत्तल केली आहे. महाराष्ट्रात विरोधकांना ५० जागाही मिळाल्या नव्हत्या व त्यांचे भलेभले नेते पराभूत झाले होते. बिहारमध्येही भाजप आघाडीला महाराष्ट्राप्रमाणेच तीन चतुर्थांश यश मिळाले असून २४३ पैकी तब्बल १९० जागा मिळाल्या आहेत. मात्र महाराष्ट्र व बिहारमध्ये एक मोठा फरक आहे. इथे भाजपने एकट्याच्या जिवावर सत्ता स्थापन करता येईल इतक्या जागा जवळपास मिळवल्या होत्या. बिहारमध्ये मात्र त्यांचाच मित्रपक्षनीतीशकुमार यांच्या संयुक्त जनता दलाने त्यांची वाट रोखून धरली आहे. किंबहुना, या निवडणुकीतले सर्वात नेत्रदीपक यश हे नीतीशकुमार यांचेच आहे. गेल्या वेळी म्हणजे २०२० मध्ये नीतीश यांना अवघ्या ४३ जागा मिळाल्या होत्या. २०१५ च्या मानाने तेव्हा त्यांच्या २८ जागा कमी झाल्या होत्या. तरीही राजकीय तडजोड म्हणून भाजपने त्यांना मुख्यमंत्री केले होते. मधल्या काळात नीतीश यांची बुध्दी भ्रष्ट झाल्यासारखे ते वागू लागले होते. त्यामुळे यावेळी त्यांचा पक्ष संपून जाईल व भाजपचाच मुख्यमंत्री होईल असे सर्वांना वाटत होते. भाजपने व मोदींनी नीतीश यांना आपला नेतेपदाचा चेहरा म्हणून जाहीर करण्याचे टाळले होते. पण नीतीश यांच्या जागा यावेळी दुपटीहून अधिक झाल्या असून ते ८० च्या घरात पोचले आहेत. गेल्या वेळी भाजपला ७४ जागा मिळाल्या होत्या. त्यांच्याही सुमारे १५ जागा वाढल्या आहेत. पण त्यांच्यापेक्षा नीतीश यांचा स्ट्राईक रेट किंवा जिंकण्याचे प्रमाण हे कित्येक पटीने अधिक आहे. साहजिकच भाजपला नीतीश यांनाच पुन्हा मुख्यमंत्री करावे लागेल अशी लक्षणे आहेत. भाजपकडे स्वतःचा दुसरा मोठा चेहरा नाही हेही त्याचे कारण आहेच. शिवाय, नीतीश यांच्या पाठिंब्यावरच केंद्रातील मोदी सरकार अवलंबून आहे हेही ध्यानात ठेवायला हवे. या दोन्ही पक्षांनी प्रत्येकी १०१ जागा लढवल्या होत्या. म्हणजेच या दोहोंचे केवळ वीस-वीस उमेदवारच पराभूत झाले आहेत. हा सर्वच प्रकार अभूतपूर्व व विरोधकांसाठी धक्कादायक आहे.

### हा विजय 'बाई'च्या 'भाई'चा

इंदिरा गांधी यांच्या १९७१मधील विक्रमी विजयानंतर हा विजय बाईचा, गाईचा (तेव्हा गायवासरू हे काँग्रेसचे चिन्ह होते) की शाईचा (मतदानपत्रिकेत भ्रष्टाचाराचा) असा सवाल विरोधकांनी केला होता. त्या धर्तीवर भाजपचे अलिकडचे विजय म्हणजे बाईच्या भाईचे आहेत असे म्हणायला हवे. बिहारमधील विजयाने त्यावर जबरदस्त शिक्कामोर्तब केले आहे. तीन वर्षांपूर्वी मध्य प्रदेशात याची सुरुवात झाली. तिथे विधानसभेला लाडली बहीण योजनेने भाजपने विक्रमी यश मिळवले. हमखास जिंकू असे वाटणाऱ्या या राज्यात काँग्रेस भुईसपाट झाली. महाराष्ट्रात लाडकी बहीण योजनेने याचीच पुनरावृत्ती केली. आता बिहारमध्ये तेच घडले आहे. ऐन निवडणुकीच्या तोंडावर नीतीश यांनी महिलांना प्रत्येक एक-दोन नव्हे तर एकदम दहा हजार रुपये दिले. महिलांनी उद्योग चालू करण्यासाठी हा पहिला हप्ता आहे असे सांगितले गेले. उद्या त्यांनी कोणीही उद्योग चालू केला नाही तर पुढचा हप्ता मिळणार नाही. पण कागदोपत्री उद्योग दाखवला तर आणखीही पैसे मिळतील. बिहारसारख्या अत्यंत कंगाल व दरिद्री राज्यात प्रत्येक कुटुंबामध्ये एकदम दहा हजार रुपये येणे ही प्रचंड मोठी रक्कम होय. नीतीश व भाजप यांनी हे दहा हजार रुपये देऊन लोकांची मते विकत घेण्याची तरतूद करून टाकली. याच्या जोडीने महिला, दलित, तरुण यांच्यावर पैशांचा वर्षाव करण्यात आला. गावागावातील दलित व आदिवासी विकासमित्रांना टॅब खरेदी करण्यासाठी २५ हजार रुपये देण्यात आले. अंगणवाडी सेविका तसेच शिक्षणसेवकांना नवे स्मार्टफोन्स देण्यात आले. नव्याने वकील झालेल्यांना तीन वर्षे दरमहा ५००० रुपये देण्याची घोषणा केली. थोडक्यात लोकांना पैसे वाटण्यासाठी वाटेल ती निमित्ते शोधण्यात आली. यापुढे टिकाव धरणे हे काँग्रेस व तेजस्वी यादवांचा राष्ट्रीय जनता दल यांच्यापुढे अशक्यप्राय आव्हान होते. त्यांनी व्होटचोरीचा मुद्दा घेऊन यात्रा काढली. तिला जनतेने मोठा प्रतिसाद दिला. निवडणुकीच्या आधी मतदारयाद्यांमधून लाखो नावे कटाप केली गेली. याची न्यायालयीन लढाई त्यांनी लढली. पण अंतिमतः मतदारांना पैशांपुढे या सर्वांची आठवण राहिली नाही.

### नीतीश यांचा अडथळा

हिंदी प्रदेशातील बिहार हे एकमेव राज्य असे आहे की, जिथे भाजपला स्वबळावर सत्ता मिळवता आलेली नाही. यंदा भाजपने जोरदार मुसंडी मारली असली तरीही स्वबळापासून तो खूप दूर आहे. शिवाय, जनता दल नावाच्या स्थानिक पक्षाचा त्याला निःपात करता आलेला नाही. महाराष्ट्रात शिवसेना फोडून खलास करायचा भाजपचा इरादा होता. त्यातही त्याला अर्धवट यश मिळाले. मधल्या मध्ये एकनाथ शिंदे यांचा गट प्रबळ होऊन बसला. शिंदे यांना २०२३ पूर्वीपर्यंत कोणताच स्वतंत्र पाया नव्हता व आजही त्यांची स्वतंत्र अशी विचारसरणी नाही. नीतीश यांचे तसे नाही. जयप्रकाश नारायण यांच्या चळवळीतून पुढे आलेले ते समाजवादी नेते आहेत. त्यामुळेच खुद्द त्यांच्या कुर्मी जातीची संख्या अत्यल्प असूनही आता ते तब्बल दहाव्यांदा शपथ घेण्याच्या उंबरठ्यावर आहेत. उद्या गरज पडेल तेव्हा नीतीश व शिंदे यांना नामोहरम करण्यासाठी भाजप कोणत्याही थराला जाईल यात शंका नाही. त्यावेळी त्यांचे पक्ष बहुदा संपून जातील. पण तूर्तास तरी भाजपला हे अडथळे दूर करता आलेले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. चिराग पासवान यांचा लोकजनशक्ती पक्ष गेल्या वेळी स्वतंत्र लढला होता. यावेळी त्याला भाजपने आघाडीतूनच २९ जागा दिल्या व त्यातल्या २२ त्याने जिंकल्या. पण हीदेखील नीतीश यांनी दिलेल्या पैशांची ताकद आहे. खुद्द रामविलास पासवान हयात होते तेव्हाही त्यांना विधानसभेत इतके यश मिळाले नव्हते. आणि चिराग हे त्यांच्या पासंगालाही पुरणार नाहीत असे नेते आहेत. जीतनराम मांझी यांनी सहा जागा लढवून चार जिंकल्या तोही नीतीश यांच्या रेवड्यांचाच विजय आहे. याउलट दुसऱ्या बाजूला काँग्रेस व राष्ट्रीय जनता दलाची हार होत असताना डाव्या पक्षांपैकी सीपीएम माले गटाने चार जागा जिंकल्या. म्हणजेच ज्यांचा पाया मजबूत आहे ते या वावटळीतही टिकून राहिले. यावरून तेजस्वी व राहुल यांना काही धडे घ्यायला हवेत व त्यांना नव्याने सुरुवात करावी लागेल. प्रशांत किशोर यांच्या जनसुराज्य पक्षाचीही मोठी हवा यावेळी करण्यात आली होती. त्यांनी बेकारी, शिक्षण असे मुद्दे मांडल्याने त्यांची तारीफ झाली. पण शेवटी त्यांचाही दारुण पराभव झाला. नीतीश यांची महिलांमधील लोकप्रियता, त्यांचे चांगले प्रशासन वगैरे गुणांचा आता सर्वांना साक्षात्कार होऊ लागला आहे. पण याच नीतीश यांच्या पक्षाच्या जागा ११०, ७१ आणि ४३ अशा घटत गेल्या होत्या हे लक्षात ठेवायला हवे.

विचार

# आक्षेप हवेत विरुन जाऊ नयेत...

***एव्हाना देशातील बारा राज्यांमध्ये 'सर'ची तपासणी सुरु झाली आहे. ममता बॅनर्जी, स्टॅलिन आणि अन्य नेतेमंडळी यानिमित्ताने व्यक्तहोत असून ताज्या आरोपांचे क्षेपणास्त्र डागत आहेत. महाराष्ट्रामध्ये ठाकरे बंधूंनी एकत्र येत आयोगाविरोधात रणशिंग फुंकले. मात्र नियमित राजकीय आरोपाआरोपी आणि प्रचारातील कुरघोड्यांमध्ये या संदर्भातील चर्चा मागे पडून एक महत्वाचा विषय तडीस न जाता हवेत विरुन जाण्याची शक्यता आहे.***



डॉ. सुकृत खांडेकर

अखेर बिहारच्या बहुचर्चित विधानसभा निवडणुकीचे मतदान पार पडले. आरोपांची राळ, अनपेक्षित विधाने, दुषणे आणि राजकीय कुरघोडीने ही निवडणूकही गाजवली. मात्र या निवडणुकीच्या निमित्ताने झालेली मतदान प्रक्रियेची आणि निवडणूक आयोगाच्या कामातील त्रुटींची चर्चा अधिक महत्वाची ठरली. मतचोरीच्या आणि 'सर' या मतदार पाहणी कार्यक्रमाच्या निमित्ताने झालेले अनेक आरोप सामान्य मतदाराला कोड्यात पाडून गेले. या विषयाला सर्वप्रथम हात घातला तो राहूल गांधी यांनी. त्यांनी मोठ्या खुबीने आणि तपशिलात जाऊन कशा प्रकारे मतचोरी केली जाते आणि त्यात सत्ताधाऱ्यांची भूमिकाही कशी संशयाच्या भोवऱ्यात आहे, हे दाखवून दिले. त्यानंतर त्यांनी बिहारमध्ये मोठी यात्रा काढली आणि या मुद्दयावर जनमन जागवण्याचा प्रयत्न केला. त्याला तेजस्वी यादव आणि महाविकास आघाडीचाही उत्तम पाठिंबा लाभला. त्यातून बिहारचे राजकारण आणि एकूणच निवडणूक ढवळून निघाली. अर्थात उपस्थित केल्या गेलेल्या मुद्दयांना बगल देण्यात आयोग आणि सत्ताधारीही काहीसे यशस्वी ठरले, पण या निमित्ताने देशभरात सर्वत्र निवडणूक आयोगाच्या कामातील त्रुटी चव्हाट्यावर आल्या आणि मतदार मोठ्या प्रमाणात सजग झाला. आता तर या विषयावर पश्चिम बंगाल, तामिळनाडू, महाराष्ट्र आदी राज्यांमध्ये चर्चेचे आणि वादांचे तरंग उमटू लागले आहेत. महाराष्ट्रात मात्र राजकीय वातावरण भरकटू लागले असून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घोषित झाल्यानंतर नेहमीचे आरोप प्रत्यारोप जोर धरत आहेत. किंबहुना, या मुद्दयांमुळे चांगल्या प्रकारे मांडण्यात आलेला निवडणूक आयोगाच्या कार्यपध्दतीचा विषय मागे पडत आहे.

वस्तुतः मतचोरी किंवा सदोष मतदार यादीचा विषय तपशिलात समजून घेता अनेक पदर समोर येतात. विधानसभेच्या गेल्या निवडणुकीमध्ये भाजपावर मतचोरीचा आरोप करत लोकसभेतील विरोधी नेते राहूल गांधींप्रमाणे आमदार आदित्य ठाकरे यांनीही अलिकडे मोठ्या पडद्यावर सादरीकरण करून मुंबईत एका कार्यक्रमात उदहरणे देऊन काही पुरावे मांडले. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'आदित्य ठाकरे यांनी महाराष्ट्राचा पप्पू बनू नये' अशी प्रतिक्रिया दिली. राहूल गांधी स्टेजवर येरझारे मारत असतात, तसे आदित्य यांनी करण्याची गरज नाही. मी त्यांनी पप्पू म्हणत नाही, पण त्यांनीही पप्पू बनू नये, असे ते म्हणाले. गेल्या चार पाच वर्षांपासून महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका प्रलंबित आहेत. सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिल्यामुळेच जानेवारी २०२६ पूर्वी महापालिका, नगर परिषदा, जिल्हा परिषदा, आदींच्या निवडणुका घेणे सरकारला क्रमप्राप्त आहे. निवडणुकांचा हंगाम जसा जवळ येऊ लागला आहे तसे राजकीय आरोप प्रत्यारोपांना राज्यात उधाण येऊ लागले आहे. केवळ विरोधी पक्षातीलच नव्हे तर सत्ताधारी पक्षातील नेते, लोकप्रतिनिधीही असभ्य भाषेत बेलगाम वक्तव्ये करत आहेत. विशेष म्हणजे एकमेकांचा बाप आणि अवलाद काढणारी भाषा वापरणाऱ्यांना त्यांच्या पक्षाचे नेतेही समज देत नाहीत किंवा ते चुकीचे बोलले अशी जाहीर कबुली देत नाहीत. कहर म्हणजे पक्षाचे बडे नेतेच दुसऱ्यावर टीका करताना भान ठेवत नसतील तर परस्परांचे वस्त्रहरण करणाऱ्या बेताल प्रवक्त्यांना व पक्षाच्या दुय्यम फळीतील नेत्यांना आवरणार तरी कोण? आणि अशा वेळी ऐरणीवर आलेला आयोगाच्या कार्यपध्दतीचा विषय मागे पडत आहे.

भाजपाचे राष्ट्रीय पातळीवरील शक्तिमान नेते केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे पक्ष संघटनेत चाणक्य समजले जातात. त्यांच्या शब्दाशिवाय पक्षात पान हालत नाही. पक्षातील सर्व प्रमुख नेमणुका आणि निर्णय त्यांच्या संमतीनंतरच होत असतात. शत-प्रतिशत भाजपा ही पक्षाची घोषणा आहेच आणि तोच पक्षाचा सर्व राज्यांमध्ये आणि राष्ट्रीय पातळीवर अजेंडा आहे. त्यामुळे एका बाजुने विरोधी पक्षाला संपवणे तर दुसरीकडे मित्रपक्षांचे महत्व कमी करणे किंवा त्यांना दुर्बल करणे ही पक्षाची रणनिती आहे. पक्ष विस्तारासाठी प्रभावी नेत्यांना अन्य राजकीय पक्षातून आपल्या पक्षात आणणे आणि उपयोग करून घेणे गेले दहा-अकरा वर्षे योजनाबध्द रितीने सुरु आहे. अमित शहा यांनी मुंबईत येऊन पक्षाच्या नवीन कार्यालयाचे भूमिपूजन केले. महाराष्ट्र हौसिंग फायनान्स महामंडळाचा मुंबईच्या चौपाटीवर मोक्याच्या ठिकाणी असलेला भूखंड भाजपाने मिळवला त्यावर पक्षाचे नवीन भव्य असे कार्यालय उभारण्यात येणार आहे. तोच धागा पकडून उबाठा सेनेचे प्रमुख उध्दव ठाकरे यांनी अमित शहांवर अनाकोंडा म्हणून टीका केली. ते म्हणाले, 'मुंबईत अनाकोंडाचे आगमन झाले, त्याला मुंबई गिळायची आहे, अनाकोंडा हा अजगरापेक्षा मोठा असतो, त्याच्या तोंडात कितीही कोंबले तरी तो गिळत गिळत पुढे जातो, त्याला मुंबई गिळायची आहे, पण तुझं पोट फाडून बाहेर नाही आलो तर नावाचा नाही.' उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लगेचच उद्धव यांच्या टीकेला उत्तर देताना उद्धव यांचा उल्लेख भस्म्या झालेला अनाकोंडा असा केला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, ते मुंबई महापालिकेच्या तिजोरीला विळखा घालून बसले आहेत. या अनाकोंडाने मुंबईची तिजोरी गिळली, मुंबईतील रूग्णांची खिचडी गिळली, मुंबईचे भूखंड गिळले, तरी त्याचे पोट भरत नाही. भाजपाचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी उद्धव ठाकरेंना अजगर म्हटले तर दुसरे मंत्री आशिष शेलार यांनी उद्धव यांच्यावर 'आयत्या बिळावर नागोबा' अशा शब्दांमध्ये टीका केली. बावनकुळे हे माजी प्रदेशाध्यक्ष तर शेलार हे मुंबई भाजपचे माजी अध्यक्ष आहेत. दरम्यान, शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि हमीभाव मिळावा यासाठी माजी मंत्री आणि प्रहार संघटनेचे प्रमुख बच्चू कडू यांनी नागपूर येथे महाएल्गार आंदोलन उभारले. संमृध्दी महामार्गासह दोन राष्ट्रीय महामार्ग बंद पाडले, रेल्वे रोकोची धमकी दिली. न्यायालयाने त्यांना रस्ते मोकळे करण्याचे आदेश दिले. 'शेतकऱ्यांनो, आत्महत्या करण्यापेक्षा आमदाराला कापा', असे विधान बच्चू कडू यांनी केले होते. नंतर शेतकरी नेते रविकांत तुपकर म्हणाले, आमदाराऐवजी दोन- चार मंत्र्यांना कापा पण मागे हटू नका. नेपाळमधे जसे मंत्र्याना तुडवून तुडवून मारले, तसे करा. मी तर बच्चुभाऊंना सांगेन, नागपूरनंतर आंदोलनाचा चौथा टप्पा मुंबईत ठेवा. हरामखोरांना मुंबई-महाराष्ट्रातून निघून जावे लागले पाहिजे. अशा प्रकारचे वाकताडन जोर धरु लागले, त्यावरच चर्चा रंगू लागली आणि निवडणूक आयोगाच्या कार्यपध्दतीची चर्चा जणू थांबली. वस्तुतः देशातील अनेक राज्यांमध्ये या विषयावर वातावरण चांगलेच तापू लागले होते, मात्र बिहार निवडणुकीबरोबरच हा विषयही मागे पडणार, अशी शक्यता दिसू लागली.

मात्र तेव्हाच एक नोव्हेंबर रोजी महाराष्ट्रात विरोधी पक्षाने निवडणूक आयोगाच्या विरोधात मुंबईत मोर्चा काढण्याची घोषणा केली. या निमित्ताने एक किस्सा बराच गाजला आणि एका आमदारांचे मनोगत पुन्हा निवडणूक आयोगाची लाज काढणारे ठरले. आयोगाच्या कार्यपध्दतीवर टिका होत असताना राष्ट्रवादी काँग्रेसचे माजलगावचे आमदार कार्यकर्त्यांच्या बैठकीत बोलताना म्हणाले, 'विधानसभेच्या निवडणुकीत माझ्या कार्यकर्त्यांनी मतदान कसे मिळवले, हे समजून घेण्याजोगे आहे. मतदानाच्या आधी शेवटच्या दोन दिवसांमध्ये कुणाला चपटी द्यावी लागते, कुणाला कोंबडं कापावं लागतं, कुणासाठी बकरं कापावं लागतं, कुणाला लक्ष्मीदर्शन घडवावं लागतं, यात तुम्ही सारे एक्सपर्ट आहात.' अशा आरोपांमुळे पक्षीय राजकारण किती खालच्या पातळीवर गेले, याची चर्चा होईलच, पण निवडणूक आयोगाच्या मर्यादा समोर आल्या. एव्हाना देशातील बारा राज्यांमध्ये 'सर'ची तपासणी सुरु झाली आहे. ममता बॅनर्जी, स्टॅलिन आणि अन्य नेतेमंडळीही यानिमित्ताने व्यक्त व्हायला लागली असून ताज्या आरोपांचे क्षेपणास्त्र डागत आहेत. महाराष्ट्रामध्ये ठाकरे बंधूंनी एकत्र येत आयोगाविरोधात रणशिंग फुंकले आहे. मात्र नियमित राजकीय आरोपाआरोपी आणि प्रचारातील कुरघोड्यांमध्ये या संदर्भातील चर्चा मागे पडू नये. अन्यथा, आणखी एक महत्वाचा विषय तडीस न जाता हवेत विरुन जाईल. **

# टार्गेट राजधानी; आधी मुंबई, आता दिल्ली!



राकेश लोहार

दहशतवाद हा आधुनिक जगासमोर उभा ठाकलेला सर्वात गंभीर आणि गुंतागुंतीचा धोका आहे. सीमापार कटकारस्थान, आर्थिक जाळे, डिजिटल माध्यमांद्वारे प्रचार, तसेच कट्टर विचारसरणी या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणून दहशतवाद समाज, राष्ट्र आणि मानवतेसाठी घातक ठरत आहे. त्यामुळे जगभर फोफावलेला दहशतवाद कायमचा ठेचून काढल्याशिवाय गत्यंतर नाही. मुंबईवर झालेल्या २६/११च्या अत्यंत भीषण दहशतवादी हल्ल्याला १७ वर्षे पूर्ण होत आहेत. एकीकडे १७ वर्षांत भारताने दहशतवादविरोधी आपल्या संरक्षण यंत्रणेत कितपत सुधारणा केली आहे, यावर चर्चा होत असताना, दुसरीकडे दहशतवाद्यांनी देशाच्या राजधानीत ९/११ घडवून आणला आहे. ९ नोव्हेंबर रोजी दिल्लीतील लाल किल्ल्याच्या परिसरात एका कारमध्ये स्फोट घडवून १२ निष्पाप लोकांचा बळी गेला असून, तीसहून अधिक लोक या स्फोटात गंभीर जखमी झाले आहेत. त्यामुळे १७ वर्षांपर्वू जसा दहशतवादाचा प्रश्न गंभीर हाता, तसाच तो आजही आहे. भारताने यापासून बोध घेत काही सुधारणा केल्याही, पण दहशतवादी हल्ले थांबत नाहीत. दहशतवाद्यांनी २६/११ घडवून आधी देशाची आर्थिक राजधानी मुंबईला हादरवून सोडले, त्यानंतर तब्बल १७ वर्षांनी आता देशाची राजधानी दिल्लीला हादरवले. दहशतवाद्यांच्या 'टार्गेट'वर राजधान्या आहेत का?

पठाणकोट, उरीनंतर सर्जिकल स्ट्राईक केला गेला, पण आजही काश्मीरमध्ये हल्ले सुरुच आहेत. काश्मीरमध्ये पहेलगाममध्ये तर पर्यटकांवर गोळीबार करण्यात आला. त्यामध्ये अनेकजण हकनाक मारले गेले. त्यांचा काय गुन्हा होता? दहशतवाद रोखण्यासाठी कडक पावले उचलणे आवश्यक आहे. कारण, ९/११ नंतर अमेरिका दहशतवादी हल्ले रोखण्यात यशस्वी ठरली, मग आपण का नाही, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. भारताच्या अंतर्गत सुरक्षेला धोक्यात आणणाऱ्या प्रमुख घटकांपैकी दहशतवाद हा एक घटक आहे. दोन दशकांहून अधिकच्या काळात भारतात शेकडो दहशतवादी हल्ले झाले असून, त्यात शेकडो लोकांना आपला प्राण गमवावा लागला आहे. दहशतवादाच्या समस्येचा सामना करण्यात भारताला येत असलेल्या अपयशाची कारणमीमांसा करण्याची आता खरी गरज आहे. आपण कुठे कमी पडतोय, याचा अभ्यास करणे गरजेचे आहे. भारतातील अनेक मोठ्या शहरांमधून दहशतवादी हल्ले, बॉम्बस्फोट मालिका, सातत्यानं होत आहेत. भारत गेल्या दोन दशकांपासून दहशतवादी हिंसाचारात होरपळून निघाला आहे.

भारतात ज्यावेळी एखादा दहशतवादी हल्ला होतो, त्यावेळी केंद्र सरकार आणि राज्य सरकार, केंद्रीय गुप्तचर संघटना आणि राज्याच्या गुप्तचर संघटना, केंद्रीय गृहमंत्रालय आणि राज्यांचं गृहमंत्रालय यांच्यात आरोप-प्रत्यारोपाचं आणि आपली जबाबदारी झटकण्याचं सत्र सुरू होतं. हा वादविवाद चालू असतानच दुसरा दहशतवादी हल्ला होऊन जातो. आधी असले घाणेरडे राजकारण थांबणे गरजेचे आहे.

यामध्ये मुख्य दोष हा दहशतवादी संघटनांपेक्षाही त्यांना चालवणाऱ्या पाकिस्तानी लष्कराचा आहे. त्यामुळे पाकिस्तानी लष्करावर नियंत्रण मिळवलं जात नाही, तोपर्यंत या दहशतवादी संघटनांवर नियंत्रण मिळवणं अवघड आहे. कितीही बंदी घातली तरी या संघटना नवीन नावानं पुढे येतात आणि आपलं काम चालू ठेवतात. मुळात, राजाश्रय आणि आर्थिक पाठबळ मिळत नाही, तोपर्यंत कोणतही दहशतवादी संघटना पूर्णपणे काम करु शकत नाही. पाकिस्तानकडून होणारा सीमापार गोळीबार आणि दहशतवादी हल्ले यांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत चालली आहे. सर्जिकल स्ट्राईकनंतर पाकिस्तान असं धाडस करणार नाही, अशी अपेक्षा होती. परंतु, तसं काहीच घडलं नाही. उलटपक्षी, हल्ले वाढतच चालले आहेत. या हल्ल्यांमध्ये लष्काराचे जवान, सामान्य नागरिक, सुरक्षा अधिकारी मारले जात आहेत. पाकिस्तानच्या हल्ल्याला प्रत्युत्तर दिलं जात आहे हे वास्तव आहे. मात्र, हल्ला होत नाही, तेव्हा आपण या परिस्थितीकडे दुर्लक्ष करतो आणि हल्ला होतो तेव्हा प्रतिहल्ल्याच्या गोष्टी केल्या जातात. अशा गोष्टींमधून आपण काय शिकतोय? दहशतवादाबरोबर एकट्या भारताची नव्हे तर, साऱ्या जगाची लढाई दीर्घकालीन आहे. पण, योग्य दिशा, दृढ इच्छाशक्ती आणि सामूहिक प्रयत्नांनी दहशतवादाचा निर्णायक पराभव नक्की शक्य आहे. दहशतवादाविरोधातील लढा एकट्या सरकारचा नसून, तो संपूर्ण समाजाचा आहे. कारण, नागरिक जागरुक असतील, तर दहशतवादाला समाजात जागाच उरणार नाही. आजचे युग विज्ञान-तंत्रज्ञान, आर्थिक प्रगती आणि जागतिकीकरणाचे आहे, तरही मानवासमोर उभा राहिलेला सर्वात मोठा आणि गुंतागुंतीचा धोका दहशतवादाचा आहे. म्हणूनच, दहशतवादाची कीड समूळ ठेचून काढण्याची हीच वेळ आहे.

लोकसंसद

## बिबट्या मानवी वस्तीकडे का झेपावत आहेत ?



निसर्ग स्वतःचे अस्तित्व टिकविण्यासाठी मनुष्य, प्राणी वनस्पती यामध्ये संतुलन ठेवतो मात्र गेल्या काही वर्षात माणसाने निसर्गाला ओरबाडणेच सुरु केले आहे त्यामुळे काही प्राणी खाद्याच्या शोधात मानवी वस्तीकडे येवू लागले आहेत आणि त्यांच्या पाठोपाठ बिबट्यांनीही मानवी वस्तीची वेस ओलांडली आहे मानवाच्या कोणत्याही क्रियेवर निसर्ग प्रतिक्रिया देतचं असतो ज्यावेळी माणसे निसर्गाच्या संतुलणामध्ये ढवळाढवळ करतात तेव्हा निसर्ग त्यावरील प्रतिक्रिया देतो गेल्या काही वर्षात धरणासाठी, कधी रस्त्यांसाठी कधी घरांच्या सजावटीसाठी माणसांनी जंगलावर कुऱ्हाड चालवली आणि आता निसर्ग त्यावरील आपली प्रतिक्रिया वेगवेगळया माध्यमातुन देत आहे बिबटे मानवी वस्तीकडे येण्यामध्ये केवळ जंगलतोड एकमेव कारण नाही पूर्वापार गावांची वस्ती साधारण मध्यभागी होती त्यानंतर मोकळा भाग मग शेती आणि घनदाट जंगल अशी गावांची रचना होती शेती करण्याचे प्रमाण अधिक असल्याने वर्दळ अधिक असायची अशावेळी जंगलातील प्राण्यांना शेतीपर्यंत किंवा त्यापुढे येणे शक्य नव्हते पण गेल्या काही वर्षात शेती करण्याचे प्रमाण कमी झाल्याने तिथे खुरटी झाडेझुडपे वाढत आहेत मानवी वस्तीची वर्दळ कमी झाल्याने बिबटे अर्थात जंगली प्राणी वस्तीकडे धाव घेत आहेत भटकी कुत्री, कोंबड्या, शेळ्या मेंढ्या, इतकेच नाही तर उंदीर, घुशी खाण्यात बिबट्याला अधिक रस वाटू लागला आहे म्हणजेच जंगल तोडीमुळे माकडे मानवी वस्तीकडे आली त्यापाठोपाठ बिबट्याही आला त्याला कमी श्रमात खाणे मिळू लागल्याने मानवी वस्तीला अधिक पसंती देत असल्याचे दिसून येते आहे बिबट्यांची संख्या वाढत आहे हे असेच सुरु राहिले तर प्रवासात कुठल्याही वळणावर बिबट्या दिसण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यासाठी मानवाने निसर्गाच्या संतुलनाला धक्का लावू नये !

**राजू जाधव, मांगूर जि. बेळगांव**

दिनविशेष

# भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे

आचार्य विनोबा भावे यांची गणना देशातील महान स्वातंत्र्यसैनिक आणि समाजसेवकांमध्ये केली जाते. ते महात्मा गांधींचे अनुयायी होते आणि त्यांच्याप्रमाणे आयुष्यभर सत्य आणि अहिंसेचा मार्ग अवलंबून गरीब आणि निराधारांसाठी लढले. विनोबा एकदा म्हणाले होते की, सर्व क्रांतीचे उगमस्थान आध्यात्मिक असते. माझ्या सर्व कार्याचे एकमेव उद्दिष्ट मनांचे मिलन आहे. आचार्य विनोबा भावे हे थोर गांधीवादी नेते आणि भूदान चळवळीचे प्रवर्तक होते. कोकणातील रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील गागोदे या छोट्या गावात ११ सप्टेंबर १८९५ रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांचे मूळ नाव विनायक नरहर भावे असे होते. त्यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील वाई हे आहे. त्यांचे माध्यमिक व उच्च शिक्षण बडोदा येथे झाले. तिथे त्यांनी संस्कृत, फ्रेंच भाषेचा आणि इतर अनेक ग्रंथांचा अभ्यास केला. वाराणसी येथे हिंदू विश्वविद्यालयात त्यांनी महात्मा गांधींचे भाषण ऐकले आणि त्या भाषणाचा त्यांच्यावर सखोल परिणाम झाला. ७ जून १९१६ रोजी कोरचब आश्रमात त्यांनी गांधीजींची भेट घेतली. या भेटीतच त्यांनी ब्रह्मचार्याची शपथ घेतली आणि जीवनसाधनेस सुरुवात केली. तिथे ते सूतकताई शिकले. १९२१ रोजी जमनालाल बजाज यांनी साबरमती आश्रमाची शाखा वर्ध्यास काढली तिचे संचालक म्हणून ८ एप्रिल १९२१ रोजी त्यांनी जबाबदारी स्वीकारली. भगवत गीतेचे सार त्यांनी अत्यंत सोप्या आणि रसाळ शैलीत गीताई आणि मधुकर या ग्रंथातून मांडले. त्यांचे सर्वात मोठे कार्य म्हणजे भूदान चळवळ. मोठ्या जमीनदारांकडून जमीन घेऊन त्यांनी त्या भूमिहीनांना दिल्या. भूदान आंदोलनासाठी त्यांनी देशभर यात्रा काढली. गरिबांच्या कल्याणासाठी त्यांनी सर्वोदय योजना सुरू केली. १९३०-३२ च्या कायदेभंग चळवळीत कारावास भोगलेले विनोबा भावे महात्माजींच्या १९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहाचे गांधींनी निवडलेले पहिले सत्याग्रही होते. १९५१ ते १९५३ हा भूदान यात्रेचा कालावधी वगळता सारे आयुष्य त्यांनी वर्ध्याच्या पवनार आश्रमात काढले. भारत सरकारने त्यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला. महात्मा गांधी यांचा स्वावलंबनाचा विचार पुढे नेत आचार्य विनोबा भावे यांनी भूदान-गोदान म्हणत म जय जगत मचा नारा दिला. हा नारा पवनार येथील ब्रह्म विद्या मंदिर आश्रमात स्वावलंबनाचा वसा घेतलेल्या भगिनी जपत आहेत. शेतीतून स्वावलंबनाचा नारा देत आहेत. आचार्य विनोबा भावे यांच्या पवनार येथील भगिनींच्या आश्रमातील महिला शेती करतात. रासायनिक नव्हे तर सेंद्रिय पद्धतीने. महिलांनी महिलांसाठी ४० वर्षांपासून अविरत चालविलेला स्वावलंबी शेतीचा हा प्रयोग आहे. आश्रमात ऋषी शेती आणि इतर मोठी शेती अशा दोन भागात शेतीची विभागणी करण्यात आली आहे. ऋषी शेती म्हणजे बैल अथवा कुठल्याही यंत्रसामुग्रीचा वापर न करता स्वतः खणून फळभाज्या, भाजीपाला आणि परसबाग फुलविण्याचा प्रयत्न. तर आश्रमाच्या मोठ्या स्वरूपाच्या शेतीमध्ये गहू, तूर, ज्वारी, हरभरा, हळद, गुरांचा चारा अशी पिके घेतली जातात. आश्रमात गो-शाळा असल्याने त्यापासून मिळणारे शेणखत शेतीला फायदेशीर ठरत आहे. गो-शाळेच्या बाजूने गोबरगॅसची उभारणी केली आहे. गोबर गॅसचा उपयोग स्वयंपाकासाठी महिला करताहेत. कुठल्याही प्रकारचे सरकारी अनुदान न स्वीकारता आपला सांभाळ करीत महिलांनी समाजाला या आश्रमातून स्वावलंबनाचा धडा दिला आहे. देशात सर्वत्र महिलांना स्वयंरोजगारासाठी प्रवृत्त केले जात असताना या आश्रमातील महिलांचे जीवन महिलांसाठी आदर्शवत आहेत. आचार्य विनोबा भावे यांनी महिलांना सन्मान मिळावा, त्या स्वतःच्या पायावर उभ्या राहाव्या यासाठी प्रयत्न चालविले होते. स्त्री-पुरुष समानतेवर जगात चर्चा होत असताना जगाला मजय जगतफ सांगणाऱ्या या आश्रमातून महिलाही कुठे कमी नाहीत हेच दाखवून देत आहेत. समाजाला मानव धर्माचे शिक्षण देणाऱ्या या सत्पुरुषाचे १५ नोव्हेंबर १९८२ रोजी निधन झाले.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**
१५ नोव्हेंबर
१)सय्यदहुसेन अब्दुल वहाब कादरी
१५-११-१९५५

## प्रवाशावर हल्ला

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

सीटवर झोपू नको असे सांगणाऱ्या प्रवाशावर दोन माथेफिरूंनी कात्रीने हल्ला केल्याची घटना मंगला एक्स्प्रेसमध्ये घडली. भोला पाल असे प्रवाशाचे नाव असून तो उत्तर प्रदेशात मजूर म्हणून काम करतो. दरम्यान त्यांनी जनरल डब्यात बसायला जागा मिळावी म्हणून सीटवर झोपलेल्या एका प्रवाशाला उठवले. याचाच राग मनात धरून त्या प्रवासी व त्याच्या मित्राने भोलाला मारहाण करत त्याच्या पोटात कात्री भोसकली. यात भोला जखमी झाला. त्याच्यावर सायन रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## दुचाकीस्वारांना लुटणारी टोळी जेरबंद

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

दुचाकीस्वारांना चाकूचा धाक दाखवून लुटणाऱ्या टोळीला घाटकोपर पोलिसांनी जेरबंद केले. आरोपी रात्रीच्या वेळेस टेम्पोतून फिरून दुचाकीस्वारांना लक्ष्य करायचे आणि त्यांना लुटून पसार व्हायचे. घाटकोपर पश्चिमेकडील होमगार्ड प्रशिक्षण केंद्राजवळ सूरज हा त्यांच्या मित्रांसोबत दुचाकीवरून जात असताना अचानक त्यांच्या पुढे तीनचाकी टेम्पो येऊन थांबला. टेम्पोमधून एक जण खाली उतरला आणि तो मोबाईलची मागणी करू लागला. मोबाईल फोन देण्यास नकार दिल्यावर हुसेनने चाकूचा धाक दाखवत धमकावले आणि दोघांकडून मोबाईल फोन तसेच होंडा डिओ स्कूटर हिसकावून घेतली. या प्रकरणी सूरजने तक्रार दिल्यानंतर घाटकोपर पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज आणि खबरींच्या आधारे आरोपींना अटक केली.

# मदतनिसांचे मानधन थकीत

## ● कुटुंबियांवर उपासमारीची वेळ; आरोग्य विभागाचे दुर्लक्ष

**। पालघर । प्रतिनिधी ।**

पालघर जिल्ह्यातील जिल्हा परिषद आरोग्य उपकेंद्रांमध्ये कार्यरत अर्धवेळ कंत्राटी मदतनीसांना सुमारे पाच महिन्यांपासून मानधन मिळालेले नाही. अतिशय तुटपुंज्या मानधनावर जोखमीचे काम करणाऱ्या मदतनीसांना नियमित मानधन मिळत नसल्यामुळे त्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी जिल्हा परिषद आरोग्य विभागाने पाठपुरावा करून सर्व थकीत मानधन तातडीने देण्याची मागणी मदतनीसांनी केली आहे.




पालघर जिल्ह्यात जिल्हा परिषद आरोग्य विभाग अंतर्गत ४६ आरोग्य केंद्र आणि ३०४ उपकेंद्र कार्यरत आहेत. उपकेंद्रातून पुरवण्यात येणाऱ्या आरोग्य सुविधांमुळे जिल्ह्याच्या अतीदुर्गम ग्रामीण भागातील रुग्णांना मोठा फायदा होतो. मात्र उपकेंद्रांमध्ये कार्यरत वैद्यकीय अधिकारी, परिचारिका आणि मदतनीस यांना आवश्यक सुविधा पुरविण्यात आरोग्य विभागाचे दुर्लक्ष होताना दिसत आहे.

जिल्ह्यातील ३०४ उपकेंद्रांची दैनंदिन साफसफाई आणि प्रसूतीवेळी गरोदर माता व नवजात अर्भकाची काळजी व स्वच्छता करण्याचे काम अंशकालीन मदतनीस करतात. मात्र कंत्राटी नेमणूक असलेल्या मदतनीसांचे जून महिन्यापासूनचे मानधन थकीत असल्याची बाब समोर आली आहे. अंशकालीन मदतनीसांना महिना तीन हजार रुपये इतक्या अतिशय तुटपुंज्या मानधनावर जोखमीचे काम करावे लागते. मात्र तुटपुंजे मानधन देखील नियमित मिळत नसल्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ आली आहे.

तुटपुंजे मानधन वाढवून मिळावे व इतर प्रलंबित प्रश्नांकरिता मदतनीसांनी जुलै महिन्यात कामबंद आंदोलन केले. आंदोलनादरम्यान शासनाकडून मागण्या मान्य करण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले, मात्र त्यानंतर देखील थकीत मानधनाचा प्रश्न अजूनही कायम आहे.

> **जिल्ह्यातील आरोग्य उपकेंद्रात कंत्राटी तत्वावर कार्यरत अंशकालीन मदतनीसानी मानधन वाढ आणि इतर मागण्यांसाठी काम बंद आंदोलन केले होते. फक्त या आंदोलनात सहभागी मदतनीसाचे मानधन देण्यात आलेले नाही. मानधन वाढ करण्याबाबत आरोग्य विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.**
> **– डॉ. संतोष चौधरी, जिल्हा आरोग्य अधिकारी, पालघर**

> **पालघर जिल्हा परिषद अंतर्गत आरोग्य उपकेंद्रांमध्ये कार्यरत २६५ अंशकालीन मदतनीसांना जून महिन्यापासून मानधन मिळालेले नाही. याप्रकरणी संबंधित विभाग आणि लोकप्रतिनिधींकडे दाद मागून देखील प्रश्न सुटलेला नाही.**
> **– कविता पाटील, विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद महिला परिचर महासंघ**

## शंभर टक्के बालके शिक्षणाच्या प्रवाहात

**। पालघर । प्रतिनिधी ।**

शिक्षणापासून वंचित असलेल्या प्रत्येक बालकाला प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या पालघर शिक्षण विभागाने ६ ते १४ वयोगटातील शाळाबाह्य मुलांची संख्या कमी करण्यात मोठी प्रगती साधली आहे. शिक्षण विभागाने २०२३ ते २०२५ या कालावधीत ६ ते १४ वयोगटातील २०३ शाळाबाह्य बालकांचा शोध लावून, त्यांना यशस्वीरित्या शाळेत दाखल केले आहे. यामुळे १४ वर्षांखालील १०० टक्के बालके शिक्षणाच्या प्रवाहात आली असून, शिक्षण विभागाचे 'शून्य शाळाबाह्य' मुले करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या प्रयत्नांना मोठे बळ मिळाले आहे.

पालघर जिल्ह्यातील एकही विद्यार्थी मूलभूत शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी शिक्षण विभागाने दरवर्षी शोधमोहीम राबवली आहे. या मोहिमेअंतर्गत ६ ते १८ वयोगटातील शाळाबाह्य, अनियमित आणि स्थलांतरित मुलांचा शोध घेण्यात येतो. विशेषतः पालघर जिल्ह्याच्या पूर्वपट्ट्यातील विक्रमगड, जव्हार, मोखाडा, तलासरी, वाडा या आदिवासीबहुल भागातून होणारे स्थलांतर रोखून, शाळाबाह्य मुलांना पुन्हा शाळेत दाखल करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

## महामार्गाचे काम रखडल्याने धुळीचे साम्राज्य

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्गाच्या लांजा शहरातील रखडलेल्या कामामुळे सध्या शहरात मोठ्या प्रमाणात धुळीचा त्रास वाढला आहे. परिणामी शहरातील व्यापारी, नागरिक, वाहन चालक, प्रवाशी आणि विद्यार्थी यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागते आहे. प्रचंड धुळीने श्वसनाचे आजारही होण्याची शक्यता आहे. लांजा शहरातील मुंबई-गोवा महामार्गाचे काम गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या स्थितीत आहे.



लांजा शहरामध्ये महामार्गाची बिकट अवस्था झाली शहरातील कुंभारवाडा, बसवेश्वर चौक, बाजारपेठ, साठवली फाटा या ठिकाणी महामार्गाचे काम रखडलेले असल्याने सर्वत्र धुळीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. महामार्गावरून समोरून वाहन गेल्यास पाठीमागील वाहन चालकांना व पादचारी नागरिकांना दिसत नाही. महामार्गावरील धुरळ्यामुळे महामार्गाच्या दुतर्फा असलेले व्यापारीवर्ग तसेच रिक्षा व टेम्पो व्यावसायिक धुळीने त्रस्त होत आहे. दुकाने, टपऱ्या शेजारील हॉटेलवर प्रचंड धुळीचे लोट बसत आहेत. लांजा शहरातील अर्धवट ठप्प पडलेल्या महामार्गाच्या कामामुळे शहरवासीय, प्रवाशी, वाहन चालक, शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थी या सर्वांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. धुळीच्या या त्रासामुळे श्वसनाचे विकार होऊ शकतात.

## भागडावासीयांची पाण्यासाठी वणवण

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

पावसाळा संपला तरी जव्हार तालुक्यातील भागडावासीयांच्या नशिबी अजूनही खड्ड्यातील पाणी असल्याची धक्कादायक बाब निदर्शनास आली आहे. या गावात ग्रामपंचायतीने बांधलेली विहीर तीन वेळा दुरुस्त करण्यात आली. तरीदेखील या विहिरीला थेंबभरदेखील पाणी आले नाही. त्यामुळे येथील माता, भगिनींना पाण्यासाठी वणवण फिरावे लागते. तसेच नाईलाजाने खड्ड्यातील पाणीदेखील वापरण्याची वेळ ग्रामस्थांवर आली आहे.



जव्हारपासून २० किलोमीटर अंतरावर भागडा गाव असून दरवर्षी पाण्याचा प्रश्न स्थानिकांना भेडसावतो. काही वर्षांपूर्वी ग्रामपंचायतीने विहीर बांधली. पण निकृष्ट दर्जाचे काम केल्यामुळे विहिरीची दैन्यावस्था झाली. त्यामुळे एकदा, दोनदा नव्हे तर तब्बल तीन वेळा त्याची दुरुस्ती करावी लागली. या दुरुस्तीवरसुद्धा मोठ्या प्रमाणावर पैसे खर्च करण्यात आला. पण तरीही या विहिरीला पाणी लागले नाही. त्यामुळे या गावातील लहान मुले व महिला खड्ड्यातीलच पाणी रोज घरी आणत आहेत.

## रत्नागिरीत नाकाबंदी

**रत्नागिरी :** दिल्लीत झालेल्या बॉम्बस्फोटाच्या पार्श्वभूमीवर रत्नागिरी जिल्ह्यात विविध ठिकाणी पोलिसांनी कडक बंदोबस्त ठेवला आहे. पर्यटन स्थळे, धार्मिक स्थळे, बाजारपेठ, बंदरे आणि रेल्वे स्थानकांवर पोलीस गस्त घालत आहेत. सर्व चेकपोस्टवर नाकाबंदी करण्यात आली आहे. जिल्ह्यातील समुद्र किनाऱ्यावर असणाऱ्या कंपन्या, सागर रक्षक दल आणि ग्रामस्थांच्या बैठका घेण्यात आल्या आहेत. नागरिकांना संशयित व्यक्ती, वस्तू किंवा हालचाली दिसल्यास तात्काळ कोस्टल हेल्पलाईनवर संपर्क करावा.

## विज्ञान, रांगोळी, हस्तकला प्रदर्शन

**। दापोली । प्रतिनिधी ।**

दापोली एज्युकेशन सोसायटी संचालित ए. जी. हायस्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त विज्ञान, पुष्परचना, रांगोळी, हस्तकला आणि भूगोल या विभागांचे प्रदर्शन आयोजित केले होते. या विज्ञान प्रदर्शनात पर्यावरण संरक्षण, सौर ऊर्जा आणि जलसंवर्धन या विषयांवरील मॉडेल्स मांडण्यात आली होती. भूगोल प्रदर्शनात भारताचा भूगोल, हवामान बदल, ज्वालामुखी आणि चांद्रयान मोहीम या विषयांवरील माहितीपूर्ण सादरीकरण झाले. पुष्परचना विभागात विद्यार्थ्यांनी नैसर्गिक फुलांपासून सुंदर नमुने साकारले. रांगोळी प्रदर्शनात पारंपरिक आणि आधुनिक रांगोळ्यांद्वारे स्वच्छ भारत, बेटी बचाओ, निसर्ग संवर्धन यासारखे सामाजिक संदेश देण्यात आले. हस्तकला विभागात विविध कलात्मक वस्तूंचे प्रदर्शन करून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचे दर्शन घडवले.या कार्यक्रमाला श्रीराम माजलेकर, रवींद्र कालेकर, श्रीकांत निजामपूरकर, स्मिता सुर्वे, प्रकाश रेळकर, शरद कांबळे, अर्जुन घुले, ए.एस. पेठकर, मगदूम एस.आय., मोहिते पी. इ., दाबके आर.व्ही., शिर्के एस. एस., अनिल शेठ, आर. आर. टोपरे आदी उपस्थित होते.

## शाळेत शिक्षकांची कमतरता

**। पालघर । प्रतिनिधी ।**

वसईच्या पूर्वेच्या भागात कामण जिल्हा परिषद प्राथमिक आणि माध्यमिक शाळा आहे. कामण हा आदिवासीबहुल भाग असल्यामुळे परिसरातील बहुतांश विद्यार्थी या शाळेत शिकण्यासाठी येतात. मात्र, नुकत्याच पार पडलेल्या बदली प्रक्रियेमुळे जिल्हापरिषद शाळेतील पाच वर्गांना शिक्षकच नसल्याची बाब समोर आली आहे. या शाळेत सद्यस्थित १ हजार ४६ विद्यार्थी शिक्षण घेत असून शाळेत १९ शिक्षक असणे आवश्यक आहे. मात्र, शाळेत फक्त ९ शिक्षक कार्यरत असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर याचा परिणाम होऊ लागला आहे. त्यामुळे शाळेत तात्काळ नव्या शिक्षकांची भरती करावी, अशी मागणी पालकांकडून केली जात आहे. तसेच यासंबंधी तालुका शिक्षण विभागाने कारवाई न केल्यास पालक आणि ग्रामस्थांकडून जनआंदोलन उभारले जाईल. तसेच जिल्हापरिषदेच्या शाळेला टाळे ठोकण्यात येईल, असे पत्र गटविकास अधिकाऱ्यांना दिले असल्याचे सामाजिक दिनेश म्हात्रेंनी सांगितले.

## गावठी दारुच्या हातभट्टीवर धाड

**चिपळूण :** वालोपे गणेशवाडी येथील वाशिष्ठी नदीकिनारी सुरु असलेल्या गावठी दारुच्या हातभट्टीवर पोलिसांनी बुधवारी (दि.१२) सायंकाळी धाड टाकली. यावेळी एक जण दारु गाळत असताना पोलिसांना सापडला. या कारवाईत ९९,२५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी मंगेश मधुकर दिवेकर (वय २८, रा. पेढे, चिपळूण) याच्यावर गुन्हा दाखल केला असून अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## बेकायदा पार्किंगविरोधात विशेष मोहीम

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

दिल्लीत झालेल्या बॉम्बस्फोटानंतर देशभरातील सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. मुंबईतही पोलिसांकडून ठिकठिकाणी बंदोबस्त वाढवला असून, शहरातील विविध ठिकाणी असलेल्या अनधिकृत पार्किंगची तपासणी सुरू केली आहे. मुंबईत साडेतीन हजारांहून अधिक वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे. सर्वाधिक ३२० वाहनांवर कारवाई आझाद मैदान परिसर वाहतूक पोलिसांनी केली. मुंबईत



अनेक ठिकाणी रस्त्यांच्या दुतर्फा, पदपथावर, चिंचोळ्या गल्ल्यांमध्ये कुठेही अनधिकृत पार्किंग केली जाते. त्यामुळे वाहतूक कोंडीसह पदपथावरून जाणाऱ्या पादचाऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागतो. याच बेकायदा पार्किंगवरील कारवाईतून संभाव्य धोका टाळण्यासाठी वाहतूक पोलीस उपाययोजना करीत आहेत.

### वाहतूक कोंडीपासून मिळणार दिलासा

### सरकता जिना, उद्वाहनाची सोय असणार

# वाशी-कोपरखैरणे मार्गावर उभारणार पादचारी पूल

**नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

नवी मुंबईतील सर्वात वर्दळीचा मार्ग असणाऱ्या वाशी-कोपरखैरणे मार्गावर गुलाबचंद डेअरी परिसरात नवा पादचारी पूल उभारणीचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. कोपरखैरणे येथील डी-मार्ट चौक ते तीन टाकीपर्यंत असलेल्या मार्गावर रस्ता ओलांडणाऱ्यांची संख्या मोठी असल्याने सातत्याने कोंडी होते. आता अनेक वर्षानंतर या स्कायवॉकचा प्रस्ताव मार्गी लागल्याने या कोंडीमुक्तीची आशा आहे.

वाशी कोपरखैरणे मार्गावरील कोपरखैरणे सेक्टर १५ येथे उभारण्यात येणार असलेल्या या पुलासाठी एकूण ६ कोटी ५९ लाख ३ हजार १९२ रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. सरकता जिना आणि उद्वाहनाची सोय असणार आहे. सुमारे दोन दशकांपासून या ठिकाणी स्कायवॉकची मागणी होत होती.

नवी मुंबई शहरांतर्गत सर्वाधिक रहदारीचा मार्ग म्हणून वाशी कोपरखैरणे ओळखला जातो. या मार्गावर वाशी सेक्टर ९-१०, १५-१६, जुहू गाव, रा. फ. नाईक चौक आणि कोपरखैरणे सेक्टर १५चा नाका (गुलाबसन्स डेअरी) या ठिकाणी रोज सकाळी साडेनऊ ते दुपारी एक ते दीड आणि संध्याकाळी पाच साडेपाच ते रात्री



साडेदहापर्यंत हमखास वाहतूक कोंडी होते.

जुहू गावव्यतिरिक्त सर्व ठिकाणी होणारी वाहतूक कोंडी ही केवळ रस्ता ओलांडणाऱ्या पादचाऱ्यांमुळे होत असते. त्यात वाशी सेक्टर ९-१० च्या मध्यावर बाजारपेठेजवळ स्कायवॉकचे निर्माण केल्यानंतर वाहतूक कोंडीपासून काहीसा दिलासा मिळाला. मात्र त्यापेक्षा कित्येक पटीने कोपरखैरणे सेक्टर १५ च्या नाक्यावर वाहतूक कोंडी होत असूनही त्याकडे प्रशासन फारसे गांभीर्याने पाहिले जात नव्हते. माजी नगरसेवक रवींद्र म्हात्रे यांनी दोन वेळा ज्या विविध मागण्यांसाठी बेमुदत उपोषण केले होते, त्यात या स्कायवॉकच्या मागणीचा अंतर्भाव होता. या ठिकाणी दाट लोकवस्ती असून रस्त्याच्या दोन्ही बाजूने असणारे सेक्टर ५ ते ८ आणि दुसऱ्या बाजूला १५ ते १८ हा भाग आहे. या परिसरात शाळा, महाविद्यालय, बस थांबे आणि बाजार आहे. त्यामुळे कायम वर्दळ असते. त्यात रेल्वे स्थानकापासून सेक्टर १५ ते १८ मध्ये राहणारे रहिवासी चालत येत असल्याने संध्याकाळच्या वेळी लोकलच्या वेळेनुसार नागरिकांचा लोंढा रस्ता ओलांडण्यासाठी येत असतो. पूर्वी या दोन्ही रस्त्यांमधून गाड्यांना ये-जा करण्यासाठी दुभाजकात जागा (कट) होती. मात्र वाहतूक पोलिसांनी अनेक विनंती अर्ज केल्यावर ही जागा गाड्यांसाठी बंद करण्यात आली.

> **महापालिका सुमारे साडे सहा कोटी खर्च करून कोपरखैरणे सेक्टर १५ च्या नाक्यावर स्कायवॉकचे निर्माण करणार आहे. त्यासाठी ६ कोटी ५९ लाख ३ हजार १९२ रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. याची निविदा प्रक्रिया लवकरच होणार आहे. सरकता जिना असल्याने आजारी व्यक्ती, जेष्ठ नागरिकांना, गर्भवती महिलांना या स्कायवॉकचा सहज वापर करता येणार आहे.**
> **– शिरीष आरदवाड, शहर अभियंता**

## निवडक

## शुल्लक कारणावरून तरुणाची हत्या

**ठाणे :** धक्का लागल्याच्या कारणावरून धारदार शस्त्राने हत्या करून फरार असलेल्या सहा आरोपींच्या मानपाडा पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहेत. अमर महाजन, अक्षयकुमार वागळे, अतुल कांबळे, नीलेश ठोसर, प्रतीकसिंग चौहान आणि लोकेश चौधरी अशी अटक केलेल्या हल्लेखोरांची नावे आहेत. मानपाडा पोलिसांनी कोणतेही पुरावे नसताना शिताफीने तपास करत ४८ तासांत नाशिक, मालेगाव आणि चाळीसगाव येथून त्यांना बेड्या ठोकल्या. आकाश सिंग हा तरुण डोंबिवली पूर्वेतील मालवण किनारा हॉटेलमध्ये जेवण करण्यासाठी गेला होता. रात्री उशिरा जेवण करून बाहेर निघताना त्याचा तरुणाला धक्का लागला होता. या किरकोळ कारणाचा राग मनात धरून हल्लेखोरांनी धारदार शस्त्राने वार करून त्याची हत्या केली. या घटनेनंतर हल्लेखोरांनी पोबारा केला होता. याप्रकरणी मानपाडा पोलिसांनी गुन्हा दाखल करत सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक यंत्रणा व गुप्त बातमीदारांच्या मदतीने तपास करत फरार असलेल्या सहा आरोपींना अटक केली.



## विनातिकीट रेल्वे प्रवाशांवर कारवाई

**मुंबई :** मध्य रेल्वेने २०२५-२६ मध्ये विनातिकिट प्रवास करणाऱ्या २३.७६ लाख प्रवाशांकडून १४१ कोटी रुपये दंड वसूल केला. प्रवाशांना सुरक्षित आणि आरामदायी प्रवास घडावा यासाठी मध्य रेल्वे प्रशासन प्रयत्नशील आहे. मध्य रेल्वेच्या मुंबई, पुणे, सोलापूर, भुसावळ, नागपूर या विभागात अनधिकृत आणि विनातिकिट प्रवास करणाऱ्या प्रवाशांना रोखण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलली आहेत. यासाठी सातत्याने आणि सखोल तिकीट तपासणी मोहीम सुरू केली. मध्य रेल्वेने २०२५-२६ मध्ये (एप्रिल-ऑक्टोबर) विनातिकीट प्रवाशांच्या मुसक्या आवळण्यात यश मिळवले. मध्य रेल्वेच्या तिकीट तपासणी पथकांनी २०२५-२६ मध्ये विनातिकिट, वैध तिकीटविना प्रवास करणाऱ्या २३.७६ लाख प्रवाशांना पकडले. ही संख्या २०२४-२५ मध्ये २२.०९ लाख इतकी होती. त्यात सुमारे ८ टक्क्यांची वाढ झाल्याचे निदर्शनास आले. प्रशासनाला २०२५-२६ मध्ये दंडाच्या रुपात १४१.२७ कोटी रुपये विक्रमी रक्कम वसूल करण्यात यश आले. तर, २०२४-२५ मध्ये विनातिकीट प्रवाशांकडून १२४.३६ कोटी रुपये दंड वसूल करण्यात आला होता. यामध्ये सुमारे १४ टक्क्यांची वाढ झाली आहे.



## ११४ वाड्या सौरदीपांनी उजळणार

**रत्नागिरी :** चिपळूण आणि संगमेश्वर तालुक्यांतील ग्रामीण भागात विकासाचा नवा उजेड पसरला आहे. ३१० सौर पथदिव्याद्वारे १२ गावांतील ११४ वाड्यांचे शाश्वत विद्युतीकरण यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आले आहे. या अभिनव उपक्रमामुळे हजारो ग्रामीण नागरिकांच्या जीवनात सुरक्षितता, प्रकाश आणि आत्मविश्वास निर्माण झाला आहे. डॉ. सचिन शिगवण यांनी स्वखर्चातून हा प्रकल्प उभारून देशाच्या विकासाला हातभार लावला आहे. हा प्रकल्प निर्मिती फाउंडेशन आणि ग्रीन इंडिया इनिशिएटिव्ह प्रा. लि. व टीयुव्ही-एसयुडी यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आला आहे. संपूर्ण भारतात द सोलार मॅन ऑफ इंडिया म्हणून ओळखले जाणारे डॉ. सचिन शिगवण यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाखाली हा उपक्रम ३ नोव्हेंबर रोजी सुरू होऊन १५ नोव्हेंबर रोजी यशस्वीरित्या पूर्ण करणार आहेत. या प्रकल्पांतर्गत चिपळूण तालुक्यातील मांडकी खुर्द, पालवण, आगवे, वीर, देवपाट, तोंडली, नायशी, वडेरु आणि पेढांबे ही गावे तसेच संगमेश्वर तालुक्यातील आंबव, नारडुवे आणि शिरंबे ही गावे सहभागी होती. ग्रीन इंडिया इनिशिएटिव्हच्या तांत्रिक टीमने प्रत्येक गावाचे सर्वेक्षण करून आवश्यक ठिकाणी सौरपथदिव्यांची उभारणी केली आहे. प्रकल्प यशस्वितेसाठी सर्व गावांतील सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, ग्रामस्थांनी उत्साहाने सहभाग घेतला.

## सार्वजनिक ग्रंथालये अडचणीत

### जिल्हा संघाचे सरकारकडे निवेदन

**सिंधुदुर्ग :** सार्वजनिक ग्रंथालयांचे विविध प्रश्न अद्यापही प्रलंबित असून, ते तातडीने मार्गी लावावेत, अशी मागणी सिंधुदुर्ग जिल्हा ग्रंथालय संघाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या अनुदानवाढीपासून ते नव्या ग्रंथालयांना मान्यता देण्यापर्यंत अनेक विषयांवर अद्याप ठोस निर्णय झालेला नाही. याकडे जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष मंगेश मस्के, कार्यवाह राजन पांचाळ, तसेच अनंत वैद्य, संजय शिंदे, प्रवीण भोगटे, नंदन वेंगुर्लेकर आदी पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांचे लक्ष वेधले. संघाने दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, महाराष्ट्र विधान परिषदेत ४ जुलै २०२४ ला झालेल्या चर्चेनुसार सार्वजनिक ग्रंथालयांना देय असलेली ४० टक्के अनुदानवाढ मार्च २०२५ पूर्वी मिळणे अपेक्षित होते; मात्र, ती अद्याप मिळालेली नाही. तसेच सार्वजनिक ग्रंथालय अधिनियम १९६७ नुसार दर पाच वर्षांनी अनुदानवाढ होणे आवश्यक असतानाही मागील बारा वर्षांत कोणतीही वाढ झालेली नाही. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीचा विचार करून किमान तिपटीने अनुदानवाढ करावी. तसेच, 'गाव तेथे ग्रंथालय' ही योजना प्रभावीपणे राबवावी, नव्या ग्रंथालयांना मान्यता द्यावी आणि ग्रंथालयांच्या वाढीसाठी आवश्यक जागा उपलब्ध करून द्यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. ग्रंथालयांचे वर्ग किंवा दर्जा बदल, तसेच साधनसामुग्री अनुदान पुन्हा सुरू करण्यात यावे. याशिवाय ग्रंथालय कर्मचाऱ्यांचे १०० टक्के वेतन अनुदान शासनाकडून देण्यात यावे आणि ते थेट संबंधित कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये जमा करण्यात यावे, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये कार्यरत प्रशिक्षित कर्मचाऱ्यांना शासकीय नोकरभरतीत २० टक्के आरक्षण देण्यात यावे, असेही संघाचे मत आहे. सार्वजनिक ग्रंथालयांचे प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याचे संघाच्या पदाधिकाऱ्यांनी निदर्शनास आणून दिले.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे बोपेले, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत त्या मिळकतीचे मालक १) सौ. स्मिता कमलाकांत शिरोडकर, २ श्री. गौरव कमलाकांत शिरोडकर, यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नं./ हिस्सा.नं./ प्लॉट नं. | क्षेत्रफळ चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| १७/४/३ | १५७-०० | १५-७० |

व वर वर्णन केलेल्या मिळकतीवरील घर ग्रुप ग्रामपंचायत कोल्हारे मिळकत नं. १४८९ त्याचे बांधीव क्षेत्र ५९४ चौ. फुट.

सबब सदरबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, लिज, लिन, बक्षीस, करार, ताबेकब्जा, वहिवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतेही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दि. १५/११/२०२५.

**ॲड. सतीश धर्मा डायरे,**
पत्ता-००२, शिवतीर्थ,सहयोग
को.ऑ.हौ.सो.ब्राम्हण आळी,
नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.
मो.९८५०४०२६५७.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, श्री विजय सावळाराम रेवंडकर रा. अनमोल अर्पाटमेंट सखाराम कीर रोड, परशुराम निवास जवळ माहिम मुंबई ४०००१६ हे येथील रहिवासी असून यांच्या मालकीची जमिनी गागोदे बुद्रुक ता.पेण, जि.रायगड येथे असून मी. स्वतः शिरीष वासुदेव मानकवळे विकत घेण्याचे ठरविले आहे, त्याचे वर्णन खालीलप्रमाणे....

| गाव | मालक | सर्व्हे नं. | एकूण क्षेत्र हे.आर. | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| गागोदे बुद्रुक | विजय सावळाराम रेवंडकर व इतर तीन | १२९ | ०.३६.०० | ०.३७ |

तरी वर वर्णन केलेली जमिन मिळकत मी स्वता: कायमस्वरूपी विकत घेत आहे. तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ, वहीवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, गहाणखत, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रातील दान, जप्ती, लीज अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाच्या आत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास मी स्वत: जमिन मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीखत करेन व मागाहुन येणारी कोणतीही हरकत माझ्यावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

पेण
दिनांक :१५/११/२०२५

**शिरीष वासुदेव मानकवळे**
मु.गणपतीवाडी, ता.पेण, जि.रायगड
फोन नंबर ८६९८४१४०४०

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.शुभम संतोष भाटकर रा. रेवदंडा बंदर, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी मौजे रेवदंडा, ता.अलिबाग येथील खालील नमूद मिळकत सदर मिळकतींचे मालक संदिप कृष्णा म्हात्रे, रा.चौल, ता.अलिबाग, जि.रायगड व असद महमुद गोंडेकर रा. रेवंदडा बाजारपेठ, ता.अलिबाग, जि. रायगड यांजकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

संदर्भित जमीन मिळकत पूर्णत: निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ७ दिवसांचे अवधीत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल त्यांचा संदर्भित मिळकतींचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतींचे वर्णन**

मौजे रेवदंडा, तालुका अलिबाग येथील भूमापन क्रमांक व उपविभाग ५०/१/१अ, एकूण क्षेत्र ०-२३-५० हे.आर. आकार रु.१४-०५ पै. या बागायत मिळकतींपैकी श्री. संदिप कृष्णा म्हात्रे यांच्या मालकी हिश्यात असलेली ०-१२-० हे.आर क्षेत्रापैकी ०-०६-० हे.आर. बागायत क्षेत्र रस्त्यासहीत व असद महमुद गोंडेकर यांच्या मालकी हिश्यात असलेले ०-०५-५० हे. आर बागायत क्षेत्र

अलिबाग,
दिनांक : १४.११.२०२५

**(ॲड.श्री.प्रसाद विजय वर्तक)**
**जिल्हा न्यायालय**
**अलिबाग-रायगड.**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे चाफेवाडी, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| १६/२ | एकूण क्षेत्र २-५८-८० हे.आर. | २.१३ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही
दिनांक :- १५/११/२०२५

**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाउस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो.कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **नागावमधील हॉटेलमध्ये** कामासाठी रिसेप्शनिस्ट आणि हाउसकिपर इत्यादी माणसांची आवश्यक्ता आहे. मो. ९९२१९७८०८०
- **Design Metrics is Hiring.** Need a civil draftsman/ Site Supervisor at our Studio in Alibag. Skills required - Basic Autocad Kindly share your CV on design-metricsoffice@gmail.com Contact No - 9970051876
- **श्री इलेक्ट्रीकल अँड प्लंबिंग वर्क्स,** चेंढरे मारुती मंदिराशेजारी कामासाठी ड्रायव्हर, इलेक्ट्रिशन, वायरमन व प्लंबर या कामाचा अनुभव असलेली मुले पाहिजेत. प्रत्यक्ष भेटा पगार रु. १५०००/- संपर्क- ९४२२६९०८५३,७८७५६८३७७३
- **समुद्रापासून पाच मिनिट** अंतरावर फुल फर्निश ब्लॉक विकणे आहे. मो. ८८०५५४०४६४.
- **कंपनी अधिकाऱ्यांच्या गृपकरीता भाडेतत्त्वावर १२०० स्वे.फुट** दोन बेडरूम किचन व हाप बेडरूम ३०० फुट गॅलरीसह अधिकाऱ्यांच्या गाड्यांच्या पार्किंगसह कॉटेज सर्व सोयीयुक्त भाडेतत्त्वावर देणे आहे. संपर्क - ८०१०६३४३५७

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, बाजुबंद. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो.. माणगाव यांचे न्यायालयात**

अर्ज क्र.२४४/२०२५

प्रकाश मारूती खरवलीकर — अर्जदार
खरवली ता.माणगांव जि रायगड

**विरुद्ध**

१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
खरवली ग्रामपंचायत खरवली — सामनेवाले
ता. माणगाव, जि. रायगड
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव
जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री/श्रीमती/सौ. प्रभावती मारुती खरवलीकर यांचा जन्म/ मृत्यू मौजे.खरवली ता. माणगाव, जि. रायगड या ठिकाणी दि.१८/११/१९७२ रोजी झाला आहे. त्यांची जन्मांची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांना दि. १०/१०/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वतःचे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचे जन्म/मृत्यु खरवली येथे दि.१८/११/१९७२ रोजी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम कलम १९६९ चे कलम १३(३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरिता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे. व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे स्वतःचे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचा जन्म/ मृत्यू दि. रोजी खरवली ता. माणगांव जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण: माणगाव,
**दिनांक : १४/११/२०२५**

**(दशरथ काळे)**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**माणगाव, जि. रायगड**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे चेवणे, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ३/९ | एकूण क्षेत्र ०-२०-०० हे.आर. | ०.१९ |

**मौजे आंबिवली त. कोतळखलाटी, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ९/५/ब | एकूण क्षेत्र ०-४०-०० हे.आर. | ४.०० |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही
दिनांक :- १५/११/२०२५

**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाउस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

## पनवेल महानगरपालिका
### जाहिर सुचना
### महिला व बालकल्याण विभाग

महिला व बालकल्याण विभागामार्फत पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये वास्तव्य असणाऱ्या महिला/मुली व १८ वर्षाखालील असणाऱ्या बालकांसाठी खाली नमुद केलेल्या योजना राबविण्यात येत आहेत त्या योजनांची माहिती पुढील प्रमाणे.

१. पनवेल महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागातर्फे प्रभाग निहाय मुलींना/महिलांना चार चाकी वाहन (शिकाऊ परवान्यासह) चालविणेचे व्यवसायिक प्रशिक्षण देणे.
२. पनवेल महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागातर्फे कॅन्सर या दुर्धर आजाराने ग्रस्त असलेल्या महिलांना व मुलांना/मुलींना अर्थसहाय्य देणे. (रक्कम रुपये ५०,०००/-फक्त एकदाच )
३. पनवेल महानगरपालिका महिला व बालकल्याण अंतर्गत राज्य व राष्ट्रीय क्रिडा क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या खेळासाठी (वैयक्तिक व सांधिक) मुलींना अर्थिक मदत करणे.
४. पनवेल महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागा अंतर्गत वैद्यकिय शिक्षण (एम.बी.बी.एस/बी.ए.एम.एस/बी.एच.एम.एस./बी.डी.एस.) घेणाऱ्या मुलींना प्रोत्साहानात्मक शिष्यवृत्ती देणे.
५. महिला व बालकल्याण विभागाअंतर्गत अनाथ निराश्रीत मुलींना दत्तक घेतलेल्या पालकांसाठी प्रोत्साहानात्मक अनुदान देणे.
६. महिला व बालकल्याण विभागातर्फे १ किंवा २ मुलींवर (कुटुंबनियोजन) शस्त्रक्रिया करणाऱ्या जोडप्यांना प्रोत्साहनपर अनुदान देणे. (फक्त एकदाच )
७. महिला व बालकल्याण विभागाअंतर्गत मुली व महिलांना स्पर्धा परीक्षा (UPSC/MPSC/Staff Selection/Banking) या सारख्या विविध स्पर्धा परीक्षाकरीता अर्थसहाय्य देणे करीता (०१/०४/२०२५ नंतर Prelim उत्तीर्ण झालेल्या व Main Exam ची तयारी करत असलेल्या विद्यार्थिनींसाठी)

तरी सदर योजनेचा लाभ जास्तीत जास्त महिलांनी घ्यावा. हया योजनांच्या अटी शर्ती पनवेल महानगरपालिकेच्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत तसेच सदर योजनेचे फॉर्म महिला व बालकल्याण विभागात उपलब्ध आहेत.

Signed by
Meghmale Maheshkumar Vaijanathrao
**महेशकुमार मेघमाळे**
**अतिरिक्त आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र.पमपा/मबाक/१३३/२०२५
दिनांक :१४/११/२०२५

## जाहीर नोटीस

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

अर्ज क्र.५५७/२०२५

तनवीर युसूफ दाखवे — अर्जदार
वडवली ता.माणगाव जि.रायगड

**विरुद्ध**

१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
वडवली, ग्रामपंचायत वडवली
ता.माणगाव, जि.रायगड
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव — सामनेवाले
जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

श्री/श्रीमती/सौ. तनवीर युसूफ दाखवे यांचा जन्म/मृत्यू मौजे वडवली ता.माणगाव,जि. रायगड या ठिकाणी दि ०३/११/१९७६ रोजी झाला आहे. त्यांची जन्माची/मृत्यूची नोंद सामनेवाला यांचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाला यांनी तसा दाखला अर्जदार यांना दि.१४/१०/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे स्वतःचे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचे जन्म/मृत्यू वडवली येथे दि ०३/११/१९७६ रोजी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरिता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम, कलम १९६९ चे कलम १३(३) व सुधारित अधिनियम, २०२३ प्रमाणे व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरिता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता एक महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे. व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे स्वतःचे/आईचे/वडिलांचे/भावाचे/बहिणीचे/पत्नीचे/पतीचे/मुलाचे/मुलीचा जन्म/मृत्यू दि. रोजी वडवली ता.माणगाव जि.रायगड येथे झाला असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण: माणगाव
दिनांक: १४/११/२०२५

**(दशरथ काळे)**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**माणगाव, जि. रायगड**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांची खालील वर्णनाच्या मिळकती, मिळकतीचे विद्यमान मालक श्रेयस के दोशी यांच्याशी सर्व हक्कांगासह विकत घेण्याबाबत बोलणी सुरू आहेत.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर) एकुण |
|---|---|---|
| खारपेढांबे, ता.अलिबाग, जि. रायगड. | १५ | ०-१३-९० |
| खारपेढांबे, ता.अलिबाग, जि. रायगड. | १९ | ०-३२-१० |

सदरहू मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकती निर्वेध आहेत, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १४/११/२०२५

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो., ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-कावीर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील १) गट नं. ११०/१, एकूण क्षेत्र ०-४६-८० हे. आर. आकार २.५० रु. पै. या मिळकतीपैकी क्षेत्र ०-३०-८० हे. आर. व २) गट नं. ११०/२, एकूण क्षेत्र ०-०८-३० हे.आर. आकार १.०० रु. पै. या भातशेती मिळकती, या मिळकतीचे विद्यमान मालक प्रेरणा प्रविण कदम, यशराज प्रविण कदम, पार्थ प्रविण कदम रा. गरूडपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड व संदीप दामोदर घरत, रा. मु. देवघर, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याच्या ठरविलेल्या आहेत. सदरहू मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकती निर्वेध आहेत, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १४/११/२०२५

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो., ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री. रोहीत अनंत पाटील यांनी मौजे सालपे ता. कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत विद्यमान मालक श्री. गणेश सुरेश मोरे व इतर यांचेकडून खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे :-

**मिळकत वर्णन**
**मौजे सालपे, ता. कर्जत, जि. रायगड**

| अ.क्र | सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ हे.आर.प्रति | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| १ | ५३/१ | ०.६८.२० <br> पो.ख ०.०४.१० <br> एकुण ०.७२.३० | १०.०१ |
| २ | ५३/२ | ०.१९.५० <br> पो.ख ०.०४.०० <br> एकुण ०.२३.५० | १.०६ |

सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे लेखी पुराव्यासह दाखल करावी. वरील प्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन वरील मिळकतीचा व्यवहार पुर्ण केला जाईल. मागाहुन येणाऱ्या तक्रारीस आमचे आशिल जबाबदार राहाणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि. १५/११/२०२५

**ॲड. प्रेमनाथ पुंडलिक लोभी**
बी.ए.एल.एल.बी.
पत्ता : मु. पो. बीड बुद्रुक,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं.८४४६२९१८१९

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांची खालील वर्णनाच्या मिळकती, मिळकतीचे विद्यमान मालक गिता श्रेयस दोशी यांच्याशी सर्व हक्कांगासह विकत घेण्याबाबत बोलणी सुरू आहेत.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर) एकुण |
|---|---|---|
| खारपेढांबे, ता.अलिबाग, जि. रायगड. | ३८ | ०-४५-८० |
| खारपेढांबे, ता.अलिबाग, जि. रायगड. | ४३ | ०-४१-१० |
| खारपेढांबे, ता.अलिबाग, जि. रायगड. | ७९ | ०-०९-४० |
| खारपेढांबे, ता.अलिबाग, जि.रायगड. | ८१ | ०-४४-८० |
| खारपेढांबे, ता.अलिबाग, जि. रायगड. | १०५ | ०-३७-७० |
| खारपेढांबे, ता.अलिबाग, जि. रायगड. | ४ | ०-५७-४० |
| खारपेढांबे, ता.अलिबाग, जि.रायगड. | ४५ | ०-३६-१० |
| खारपेढांबे, ता.अलिबाग, जि.रायगड. | ९१ | ०-८२-५० |
| खारपेढांबे, ता.अलिबाग, जि.रायगड. | २३० | ०-०७-६० |
| खारपेढांबे, ता.अलिबाग, जि.रायगड. | ३५ | ०-३१-९० |
| खारपेढांबे, ता.अलिबाग, जि.रायगड. | ३६ | ०-३५-४० |
| खारपेढांबे, ता.अलिबाग, जि.रायगड. | १६ | ०-१४-८० |
| खारपेढांबे, ता.अलिबाग, जि.रायगड. | १७ | ०-३४-२० |
| खारपेढांबे, ता.अलिबाग, जि.रायगड. | ३७ | ०-३३-९० |
| खारपेढांबे, ता.अलिबाग, जि.रायगड. | ९९ | ०-४७-०० |
| खारपेढांबे, ता.अलिबाग, जि.रायगड. | ४७ | ०-४६-५० |

सदरहू मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकती निर्वेध आहेत, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १४/११/२०२५

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो., ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड.

## ग्रुप ग्रामपंचायत पळस
**ता. रोहा, जि.रायगड**
**निविदा सुचना**

ग्रुप ग्रामपंचायत पळस हद्दीतील खालील विकास कामे आणि साहित्य खरेदी ग्रामपंचायत स्तर १५ वित्त आयोग सन२०२३/२४,२०२४/२५,२०२५/२६या निधीतून हाती घेतले आहे. सदर कामास ग्रामपंचायत मासिक सभा व ग्रामसभेने प्रशासकीय मान्यता दिली असुन अंदाजपत्रकास मा.उपअभियंता (बांधकाम) उपविभाग रोहा व मा. उपअभियंता ग्रा.पा.पु. उपविभाग रोहा यांनी तांत्रिक मजुरी दिली असुन सदर काम करण्यासाठी शासनाकडे नोंदणीकृत ठेकेदाराकडून मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहे.

| क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | ठेकेदाराचा वर्ग | काम पुर्ण करण्याचा कालावधी | निविदा सादर करण्याची वेळ: अंतिम तारीख | वेळ | ठिकाण | कोरे निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वाघळी येथील विहीर दुरुस्ती करणे. | ५००००/- | अधिकृत | १ वर्ष | २४/११/२०२५ | दु ४/०० वा. | ग्रा.पं. कार्यालय पळस | १००/- |
| २ | बाहेरशिव येथील विहीर दुरुस्ती करणे. | ५००००/ | अधिकृत | १ वर्ष | २४/११/२०२५ | दु ४/०० वा. | ग्रा.पं. कार्यालय पळस | १००/- |
| ३ | किसन बोरकर यांच्या पोल्ट्रीच्या बाजूची साठवण टाकी दुरुस्ती करणे | ५००००/- | अधिकृत | १ वर्ष | २४/११/२०२५ | दु ४/०० वा. | ग्रा.पं. कार्यालय पळस | १००/- |
| ४ | पळसगावची विहीर दुरुस्ती करणे | ६९०००/- | अधिकृत | १ वर्ष | २४/११/२०२५ | दु ४/०० वा. | ग्रा.पं. कार्यालय पळस | १००/- |
| ५ | बाहेरशिव खांबेलीची विहीर दुरुस्ती करणे | ६९५००/- | अधिकृत | १ वर्ष | २४/११/२०२५ | दु ४/०० वा. | ग्रा.पं. कार्यालय पळस | १००/ |
| ६ | रा.जि.प.शाळा पळस येथील मुली आणि मुलांसाठी स्वच्छता गृहाची देखभाल दुरुस्ती करणे. | ५००००/- | अधिकृत | १ वर्ष | २४/११/२०२५ | दु ४/०० वा. | ग्रा.पं. कार्यालय पळस | १००/ |
| ७ | वाघळी अंगणवाडी ग्रील बसविणे, | २५०००/- | अधिकृत | १ वर्ष | २४/११/२०२५ | दु ४/०० वा. | ग्रा.पं. कार्यालय पळस | १००/ |
| ८ | पळवाडी स्मशानभूमी दुरुस्ती | ६०९४५/- | अधिकृत | १ वर्ष | २४/११/२०२५ | दु ४/०० वा. | ग्रा.पं. कार्यालय पळस | १००/ |
| ९ | रोहिदास वाडी अंतर्गत रस्ता करणे. | ८००००/- | अधिकृत | १ वर्ष | २४/११/२०२५ | दु ४/०० वा. | ग्रा.पं. कार्यालय पळस | १००/ |
| १० | पळस अंतर्गत रस्ता करणे. | १३४०००/- | अधिकृत | १ वर्ष | २४/११/२०२५ | दु ४/०० वा. | ग्रा.पं. कार्यालय पळस | १००/ |
| ११ | बाहेरशिव विहीर दुरुस्ती करणे. | ५५०००/- | अधिकृत | १ वर्ष | २४/११/२०२५ | दु ४/०० वा. | ग्रा.पं. कार्यालय पळस | १००/ |
| १२ | शेतपळस विहीर दुरूस्ती करणे | ५५०००/- | अधिकृत | १ वर्ष | २४/११/२०२५ | दु ४/०० वा. | ग्रा.पं. कार्यालय पळस | १००/ |
| १३ | वाघळी विहीर दुरुस्ती करणे. | ५५०००/- | अधिकृत | १ वर्ष | २४/११/२०२५ | दु ४/०० वा. | ग्रा.पं. कार्यालय पळस | १००/ |
| १४ | महिलांना कौशल्य विकास प्रशिक्षण देणे. | ५००००/- | अधिकृत | १ वर्ष | २४/११/२०२५ | दु ४/०० वा. | ग्रा.पं. कार्यालय पळस | १००/ |
| १५ | शेतपळस हरिजन वाडी येथील विहीर दुरुस्ती | ४९०००/- | अधिकृत | १ वर्ष | २४/११/२०२५ | दु ४/०० वा. | ग्रा.पं. कार्यालय पळस | १००/ |
| १६ | रा.जि.पं.शाळा शेतपळस येथे शौचालय बांधणे | ७२०००/- | अधिकृत | १ वर्ष | २४/११/२०२५ | दु ४/०० वा. | ग्रा.पं. कार्यालय पळस | १००/ |
| १७ | पळस येथे सार्वजनिक शोषखड्डे व घाकाचारा व्यवस्थापन करणे. | ५०४००/- | अधिकृत | १ वर्ष | २४/११/२०२५ | दु ४/०० वा. | ग्रा.पं. कार्यालय पळस | १००/ |
| १८ | शेतपळस येथे वैयक्तिक नळ कनेक्शन देणे. | ८०३२०/- | अधिकृत | १ वर्ष | २४/११/२०२५ | दु ४/०० वा. | ग्रा.पं. कार्यालय पळस | १००/ |
| १९ | पळस येथील विहीर दुरुस्ती करणे. | ५५०००/- | अधिकृत | १ वर्ष | २४/११/२०२५ | दु ४/०० वा. | ग्रा.पं. कार्यालय पळस | १००/ |
| २० | शेतपळस सार्वजनिक शौचालयाला पाणीपुरवठा करणे. | ५०१०९/- | अधिकृत | १ वर्ष | २४/११/२०२५ | दु ४/०० वा. | ग्रा.पं. कार्यालय पळस | १००/ |
| २१ | शेतपळस स्मशानभूमी दुरुस्ती | ५००००/- | अधिकृत | १ वर्ष | २४/११/२०२५ | दु ४/०० वा. | ग्रा.पं. कार्यालय पळस | १००/ |
| २२ | वाघळी न.पा.पु. योजना करणे. | १५००००/- | अधिकृत | १ वर्ष | २४/११/२०२५ | दु ४/०० वा. | ग्रा.पं. कार्यालय पळस | १००/ |
| २३ | पळस घनकचरा व्यवस्थापन करणे. | १४०१३०/- | अधिकृत | १ वर्ष | २४/११/२०२५ | दु ४/०० वा. | ग्रा.पं. कार्यालय पळस | १००/ |

**अटी व शर्ती :-**

१). कामाचे अंदाजपत्रक व आराखडे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळकती आवश्यक असल्याने फी भरून त्याची प्रत उपलब्ध केले जातील.
२) प्राप्त निविदा दि.२५/११/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात येथे उपस्थितांचे समक्ष मा. सरपंच यांच्या हस्ते उघडण्यात येतील.
३) निविदा भरणाऱ्या ठेकेदाराने आपले रजिस्टेशनचे दाखले हे सत्य प्रत केलेले असावेत.
४) कोणतीही एक अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार सरपंच यांनी राखून ठेवला आहे.
५) देयकातून शासन नियमाप्रमाणे आयकर व उपकरीची कपात केली जाईल पंचायत समिती रोहा यांच्याकडील तांत्रिक अधिकारी व ग्रामपंचायतीचे पदाधिकारी / सदस्य यांचे मार्गदर्शन व देखरेखी खालील सदर काम करण्याचे असुन काम समाधान कारक नसेल तर ते त्याच स्थितीत थांबवून कार्यारंभ आदेश रद्द करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
६) काम अंतिमरीत्या पुर्ण झाल्यानंतर सहा महिन्या नंतर देखभाल दुरुस्ती संबंधित ठेकेदार यांनी करण्याचे असून त्या नंतर सुरक्षा अनामत परत केली जाईल.
७) उपलब्ध निधी प्रमाणे रक्कम अदा केली जाईल.
८) निविदा पोस्टाने पाठविली जाणार नाही व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेली निविदा स्विकारली जाणार नाही
९) निविदा किंमत ना परतावा समजावी.
१०) निविदा मंजूर केल्यास १००/- रु. स्टंप पेपर वर करारनामा करून द्यावा लागेल.
११) सदरील कामासाठी नोंदणीकृत ठेकेदारास प्राधान्य दिले जाईल.
१२) ठेकेदाराने जिल्हा परिषद नोंदणी व जी.एस.टी. प्रमाणपत्र ग्रा.पं.मध्ये जमा केल्यानंतरच निविदा फॉर्म दिला जाईल ग्रामपंचायत कामांचा अनुभव असलेल्या ठेकेदारास प्राधान्य दिले जाईल.
१३) ठेकेदार यांचे बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत असावे व PFMS प्रणालीशी संलग्न आहे.

सही/-
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत पळस**

सही/-
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत पळस**




## राशीभविष्य

- **मेष :** लाभदायी कालावधी आहे. महत्त्वाची कामं पूर्ण होण्याबाबत काळजी घ्यावी. प्रकृती अस्वास्थ राहील.
- **वृषभ :** इच्छित फळं मिळण्यासाठी अनुकूलता राहील. नव्या विचारांना चालना मिळेल. समाधानी रहाल.
- **मिथुन :** जुनी येणी पुन्हा रखडतील. अनावश्यक खर्च टाळायला हवा. शिक्षण क्षेत्रात प्रगती करू शकाल.
- **कर्क :** व्यवसायात मनाजोगी उलाढाल होईल. विद्यार्थ्यांची विद्याभ्यासात प्रगती होईल. बाकी चिंता नसावी.
- **सिंह :** अर्थार्जनाच्या नव्या संधी लाभतील. उपजत कला-गुणांचा विकास होईल. डोळ्यांची काळजी घ्या.
- **कन्या :** कामाचा ताण वाढेल. नोकरीत नव्या जबाबदाऱ्या येतील. अनुभवींचं मार्गदर्शन लाभदायी राहील.
- **तूळ :** आर्थिक बाबतीत फसवणूक संभवते. विवाहाच्या प्रयत्नात अडचणी येतील. विचाराने रहायला हवं.
- **वृश्चिक :** दिलासादायक घटना घडतील. जुन्या स्मृतींना उजाळा मिळेल. महत्त्वाच्या भेटीतून लाभ होईल.
- **धनु :** मुलांची चिंता सतावेल. उधार-उसनवार व्यवहार टाळावेत. प्रवासात मौल्यवान वस्तुची काळजी घ्या.
- **मकर :** साऱ्या गोष्टी मनाप्रमापणे घडतील. मोठ्या खरेदीचे व्यवहार होतील. जोडीदाराशी वाद घालू नये.
- **कुंभ :** दिवसाची सुरूवात उत्तम होईल. व्यवसायात नव्या संधी लाभतील. आत्मविश्वासानं कार्यरत रहाल.
- **मीन :** मनाविरूध्द घटना संभवतात. शिक्षण, कला क्षेत्रात अनुकूलता राहील. मानसिक स्वास्थ्य लाभेल.

## ब्युटी मंत्रा — अंडरटोननुसार प्रसाधनं निवडा

सौंदर्यप्रसाधनांची काळजीपूर्वक निवड करावी लागते. आरोग्यरक्षण आणि परिणाम या दोहोंचा विचार करता अत्यंत सावधपणे प्रसाधनं पारखून घ्यावी लागतात. या धर्तीवर त्वचेच्या अंडरटोननुसार प्रसाधनं निवडण्याचा सल्ला तज्ज्ञ दिला जातो. अंडरटोन म्हणजे त्वचेचा रंग असा अनेकींचा गैरसमज असतो. पण अंडरटोन म्हणजे त्वचेचा आतला स्तर हे सर्वप्रथम समजून घ्यायला हवं. या स्तराचे तीन प्रकार असतात. कूल, वॉर्म आणि न्यूट्रल. अंडरटोनच्या या प्रकारांमधला फरक आपण समजून घेऊ या. यामुळे मेक अप प्रोडक्ट्स खरेदी करणं सोपं जाईल.

* त्वचेच्या आत नसा असतात ज्या स्पष्ट दिसतात. व्यक्तीगणिक नसांचा रंग बदलतो. निळ्या किंवा जांभळट रंगाच्या नसा असतील तर तुमचा अंडरटोन कूल आहे असं समजावं. सोन्यापेक्षा चांदीचे दागिने खुलून दिसणाऱ्या महिलांचा अंडरटोन कूल असतो. उन्हात गेल्यावर राप जाणवत असेल आणि त्वचेवर निळसर छटा दिसत असेल तर ते कूल अंडरटोनचं लक्षण असतं. (क्रमश:)

## दिनविशेष — १५ नोव्हेंबर

- **१९४९ :** महात्मा गांधींचे मारेकरी नथुराम गोडसे आणि नारायण आपटे यांना गांधींची हत्या आणि खुनाचा कट रचल्याबद्दल अंबाला तुरुंगात फाशीची शिक्षा देण्यात आली.
- **१९८२ :** आचार्य विनोबा भावे यांनी पवनार येथील पराधाम आश्रमात उपोषण करून देहत्याग केला.
- **१९८९ :** सचिन तेंडुलकरचे भारताकडून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण.
- **२००० :** लुआंडाहून निघालेले ए. एन २४ प्रकारचे विमान कोसळले.

## व्हॉट्स न्यू? — मेंदू होणार टीव्हीचा रिमोट

'सॅमसंग' ही कंपनी अनोखा टीव्ही तयार करत आहे. हा टीव्ही मानवी मेंदूने दिलेल्या सूचनांनुसार काम करेल. 'प्रोजेक्ट पॉईंट्स' असं या प्रकल्पाचं नाव आहे. या टीव्हीची चाचणी देखील झाली आहे. डोक्यातल्या विचारानुरुप या टीव्हीवरची वाहिनी बदलेल. टीव्हीचा आवाज कमी किंवा जास्त करण्याचं कामही फक्त विचाराद्वारेच पार पाडता येईल. या टीव्हीमध्ये ब्रेन कॉम्प्युटर इंटरफेस नामक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. हे तंत्रज्ञान प्रेक्षकाला टीव्हीशी जोडेल. यात ६४ सेंसर्स आणि एक आय मोशन ट्रॅकर असेल. ब्रेन कॉम्प्युटर इंटरफेस म्हणजे हेडसेट आहे. हा हेडसेट माणसाच्या डोक्यातल्या लहरींच्या माध्यमातून सूचना समजून घेईल आणि डोळ्यांच्या हालचाली टिपून त्याची खात्री करून घेईल. याच माध्यमातून टीव्हीवर नियंत्रण ठेवता येईल. हे तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी शास्त्रज्ञ प्रचंड मेहनत घेत आहेत. टीव्ही बघताना माणसाच्या मेंदूत कोणते विचार येतात, मेंदूचं वागणं नेमकं कसं असतं हे समजून घेण्याचा शास्त्रज्ञांचा प्रयत्न आहे. पुढच्या काळात टीव्हीशी संवाद साधण्याचं तंत्रज्ञानही विकसित होणार आहे. जगभरातल्या कंपन्या यावर काम करत आहेत.

## पंचांग

**शनिवार, १५ नोव्हेंबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, कार्तिक कृ. ११, चंद्रराशी : कन्या, नक्षत्र : उ. फाल्गुनी, योग : विष्कंभ, सूर्योदय ६.४८, सूर्यास्त ५.५८


## फॉरवर्डस

**वादा था.. मुक़र ग़या.. नशा था.. उतर ग़या...**

**दिल था.. भर ग़या.. इन्सान था.. बदल ग़या...!**

## आरोग्यमंत्र — घाण्याचं तेल का खावं ?

लाकडी घाण्याचं शुद्ध तेल कोणत्याही प्रकारचे केमिकल्स न वापरता पूर्णपणे नैसर्गिक आणि शास्त्रोक्त पद्धतीने तयार केलं जातं. तेलाची शुद्धता ओळखण्यासाठी त्याचा सुगंध आणि चिकटपणा पाहावा. शुद्ध तेलात चार-पाच प्रकारचे प्रोटिन्स असतात त्यामुळे शुद्ध तेलाचा एक वेगळा सुगंध येतो. आपल्या शरीराला आवश्यक असणारे फॅटी ॲसिडस, व्हिटॅमिन इ आणि मिनरल्समुळे शुद्ध तेलात चिकटपणा खूप असतो. हे तेल काढताना शेंगदाण्यावर जास्त दाब दिला जात नाही. हा घाणा एका मिनिटात फक्त १४ वेळाच फिरतो आणि तेलाचं तापमान ४० ते ४५ सेल्सिअसपेक्षा जास्त नसतं त्यामुळे लाकडी घाण्यातून तेल काढताना एकही नैसर्गिक घटक नष्ट होत नाही. शरीराला अत्यंत आवश्यक असलेला घटक हायडेन्सिटी लिपोप्रोटीन म्हणजे एचडीएल आपल्या शरीरात शुद्ध तेल खाल्ल्यामुळे तयार होतो. शुद्ध तेलामुळे वात दोष संतुलित राहतो आणि वाताच्या प्रकोपाने होणारे आजार होत नाहीत. हार्ट अटॅक, किडनीचे आजार, कॅन्सर, डायबेटिज, सांधेदुखी, पॅरालिसिस, ब्रेन डॅमेज यांसारख्या गंभीर आजारांवर शुद्ध तेल गुणकारी आहे. शेंगदाण्याच्या तेलाने कोलेस्ट्रॉल वाढतं हा एक मोठा गैरसमज आपल्याकडे पसरला आहे. पण शेंगदाण्याच्या तेलामुळे आवश्यक ते एचडीएल वाढतं. भारतात शेकडो वर्षांपासून लाकडी घाण्याचे तेल आहारात असल्याने आपले पूर्वज दीर्घायुषी होते. चांगल्या आरोग्यासाठी आवश्यक असणारं, आपल्याला अनेक आजारांपासून दूर ठेवणारं असं लाकडी घाण्याचं शुद्ध तेल खाण्यात असावं.



## भटकंती

* सिक्किममध्ये गोएचा ला ट्रेक आहे. या ट्रेकमध्ये तुम्ही कांचनजंगा पर्वतरांगा जवळून पाहू शकता. इथे तुम्हाला निसर्गातलं वैविध्य अनुभवता येईल. हिमालयाचं बदलतं रूप तुम्हाला थक्क करून टाकेल. अर्थात हा अत्यंत कठिण आणि आव्हानात्मक ट्रेक आहे. मार्च ते जून आणि सप्टेंबर ते नोव्हेंबर या काळात हा ट्रेक करता येईल. यासाठी तुम्हाला १२ दिवस लागतील. * रूपकुंड ट्रेकचा अनुभवही भन्नाट असेल. हिमालयाची शिखरं आणि डोंगरावर असलेली हिरवीगार वनराई तुम्हाला साद घालेल. मे ते जून आणि सप्टेंबर ते ऑक्टोबर या काळात तुम्ही इथे जाऊ शकता. या ट्रेकसाठी आठ दिवस लागतील. (क्रमश:)

## करिअरवाटा — कॅम्पस इंटरव्ह्यूतील यशासाठी...

आजकाल मनाजोगी नोकरी मिळवण्यासाठी वा आवडत्या क्षेत्रात प्रवेश मिळवण्यासाठी पूर्वीपासून प्रचलित असलेले प्रयत्न गरजेचे ठरत नाहीत. त्यासाठी काही नव्या गोष्टी जाणून घेणं गरजेचं आहे. विशेषत: आजकाल कॅम्पस इंटरव्ह्यू या नावानं परिचीत असणाऱ्या या संकल्पनेला विद्यार्थी वर्गाचा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत असल्याचं दिसून येतं. दुसरीकडे जाऊन अर्ज देणं, मुलाखतीसाठी जाणं यात पैसा तसंच वेळ वाया जातो. त्याऐवजी कॉलेजच्या आवारातच नोकरीच्या संधी उपलब्ध होणं महत्त्वाचं ठरतं. मात्र, या मुलाखतीसाठी आवश्यक तयारी गरजेची ठरते. आत्मविश्वास, उत्तम संवादकौशल्य तसंच देहबोली आणि सकारात्मकता या बळावर मुलाखतीत यश मिळणं शक्य होतं. शिवाय कारकिर्द करण्याची इच्छा असणाऱ्या क्षेत्राची नीट माहिती असावी. कारण कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये त्या क्षेत्राशी संबंधित प्रश्न आवर्जून विचारले जातात. अशा मुलाखतींमध्ये तुमच्या वीक पॉईंट्सबद्दल विचारलं जाण्याची शक्यता असते. त्याविषयी संकोच न करता मोकळेपणाने बोलणं हितावह ठरतं. या मुलाखतींमध्ये अभ्यासक्रमावर आधारीत प्रश्न विचारले जातात. शिवाय तुम्ही कोणत्या विषयात कमी पडता हे पाहिलं जातं. अशा वेळी उत्तरं देताना आत्मविश्वास कामी येतो. या साऱ्या बाबी लक्षात घेतल्यास कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये यश सोपं जाईल.



## खेचाखेची — शिल्लक

लोकांच्या खात्यातून लाखो रुपये गायब होतात हे वाचून मी माझ्या बाईकनं बँकेत गेलो. माझ्या खात्यातली शिल्लक तपासली. माझ्या खात्यातले साडेसातशे रुपये अजूनही माझ्या खात्यातच पडून होते. मी सुटकेचा निश्वास टाकला.
मात्र मी एटीएम मधून बाहेर पडलो तेव्हा मी हबकूनच गेलो. माझे साडेसातशे रुपये माझ्या खात्यात शिल्लक असले तरी माझी बाईक मात्र आता जागेवर नव्हती.

## वेगळं काही

काही काळापूर्वी फ्रान्समधल्या नांटेस शहरात या देशातलं पहिलं थ्रीडी प्रिंटेड घर साकारण्यात आलं होतं. आता रामदानिश कुटुंब या चार बेडरूमच्या घरात राहणार आहे. नांटेस विद्यापीठातल्या संशोधकांच्या चमूने हे घर तयार करण्यासाठी बरीच मेहनत घेतली होती. बिटीप्रिंट थ्रीडीचा वापर करून हे घर बनवण्यात आलं आहे. बिटीप्रिंट थ्रीडी हा प्रिंटर आहे. यात घराचा साचा बनवण्यासाठी विशिष्ट प्रकारच्या पॉलिमरचा वापर केला जातो. नंतर घराच्या भिंतींना बळकटी देण्यासाठी त्यात सिमेंट आणि मातीचं घट्ट मिश्रण वापरलं जातं. यामुळे हे घर १०० वर्षांपर्यंत सुरक्षित राहू शकतं. थ्रीडी प्रिंटरचा वापर करून खूप कमी वेळात हे घर बनवण्यात आलं आहे.

## सौंदर्यसाधना — लिपस्टिकची परफेक्ट निवड

हल्ली महिलावर्गात सौंदर्यप्रसाधनांचा वापर बराच वाढला आहे. ब्युटी पार्लरमध्ये महिलांची गर्दी वाढतानाच घरच्या घरी मेकअप करणाऱ्या महिलांची संख्याही अधिक आहे. यात लिपस्टिकशिवाय मेक अप पूर्ण होत नाही. बाजारात लिपस्टिकचे अनेकविध प्रकार मिळतात. मॅट, ग्लॉसी, शायनी, लिक्विड आदींमधून परफेक्ट शेड निवडताना गोंधळ उडतो. आपल्या चेहऱ्याला, रंगाला साजेशी लिपस्टिक हवी. यासाठीचा हा कानमंत्र लक्षात घ्यावा.



* बाजारात क्रीम, मॅट, फ्रॉस्ट फिनिश, शिमर असे प्रकार मिळतात. यापैकी कोणती लिपस्टिक निवडवी हे ठरवा.

* लिपस्टिक निवडताना ओठांची रचना आणि त्वचेचा रंग या महत्त्वाच्या बाबी लक्षात घ्या. लिपस्टिकचा रंग ओठांवर प्रभाव टाकतो. डीप शेडमुळे ओठ मोठे दिसतात तर ब्राईट शेडमुळे लहान वाटतात.

* आपल्याला प्रत्येक शेड शोभून दिसतेच असं नाही. त्यामुळे खरेदी करण्याआधी लिपस्टिक ट्राय करून बघा. तुम्हाला टेस्टर्स दाखवले जातात. ते ओठांवर लावू नका. यामुळे जंतूसंसर्ग होऊ शकतो. न्यूड शेड्च्या लिपस्टिक्स ऑनलाईन खरेदी करू नका. त्यातले घटक तपासून घ्या. पेराबेन्सयुक्त उत्पादन घेऊ नका.

## सुडोकू २८


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ८ | ६ | ७ | | २ | | | |
| २ | | | | ५ | ८ | | | |
| ३ | १ | ५ | ९ | | | | | |
| ७ | | | ५ | | ९ | २ | १ | ६ |
| | | | | ३ | | | | |
| ६ | ९ | १ | २ | | ४ | | ९ | ८ |
| | | | | | ३ | १ | ८ | ७ |
| | | ४ | १ | | | | | ३ |
| | | | ८ | | ६ | ५ | ४ | ९ |

**टीप -**
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू २७ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ५ | ४ | २ | ९ | १ | ८ | ७ | ३ |
| ३ | ९ | १ | ६ | ८ | ७ | २ | ५ | ४ |
| २ | ८ | ७ | ५ | ३ | ४ | ६ | १ | ९ |
| ४ | ६ | २ | ७ | १ | ८ | ९ | ३ | ५ |
| ९ | ७ | ८ | ४ | ५ | ३ | १ | ६ | २ |
| १ | ३ | ५ | ९ | ६ | २ | ७ | ४ | ८ |
| ८ | ४ | ९ | ३ | ७ | ६ | ५ | २ | १ |
| ७ | १ | ३ | ८ | २ | ५ | ४ | ९ | ६ |
| ५ | २ | ६ | १ | ४ | ९ | ३ | ८ | ७ |

## शब्दकोडे क्रमांक २८



**आडवे शब्द :-**
१) गपणतीला आवडणारा पदार्थ
४) पायापासून डोक्यापर्यंत
१०) हिरव्या विषारी सापाची एक जात
१२) कच्चे रेशीम धुताना निघणारा गाळसाळ
१३) पदार्थाच्या आवरणावरील निघालेला छोटा तुकडा
१५) कपाटातील कप्पा
१६) लुगडे
१७) दुसऱ्यांची सोंगे हुबेहुब घडविणारा
१९)अष्टविनायकातील मयुरेश्वराचे गाव
२१) आंब्याची बी
२२) सोन्याचा कस
२३) ऋण
२४) चांदणी
२५) कणीदार (तूप)
२८) अधाशी, अतिशय खाणारा
२९) छताच्या भोकातून जमिनीवर पडणारे प्रकार किरण
३१) सर्वात खालचे पाताळ
३४) मन, मनातील विचार
३५) निरुपयोगी, नोकरी नसलेला
३७) तपस्या
४०) लहान
४१) पती
४३) संतोष
४५) चुणचुणीत, हुशार
४६) सरस्वतीचे एक नाव
४७) पशू
४९) ठराविक रक्कम
५१) तृष्णा
५३) व्यवस्थित
५४) वल्लरी
५५) मूल
५७) श्रीरामाची चरित्रगाथा
५९) सोन्या-चांदीच्या वस्तू तयार करणारा
६१) सरिता
६२) सोने-चांदी विकणारा व्यापारी
६४) टेका, आश्रय, प्रमाण
६५) हावरटपणा
६८) गुंतून जाड झालेची केसांची बट
६९) संध्याकाळ
७०) स्तुती करणारा
७१) युवराज.

**उभे शब्द :-**
१) श्रीकृष्णाचे एक नाव
२) किंमत
३) भक्कम, मजबूत
४) आरोप
५) पूर्वीच्या रेल्वेत वापरला जाणारे खाणीतील काळे ज्वालाग्रही खनिज
६) स्तुती स्तोत्र
७) बडबड
८) जुगाराचा एक प्रकार
९) नरमांजर
११) हल्या, रेडा
१४) इतर, बाकीचे
१८) लाच खाणारा
१९) साखरेचा पाक व आवळा यांचा औषधी पदार्थ
२०) नवरदेव
२४) दही घुसळून केलेला पातळ पदार्थ
२६) उत्तराधिकारी
२७) वजनाला कमी असलेला
३०) माल, वस्तू
३२) घोड्याचे घर
३३) विविध
३६) जिव्हा
३७) पुराव्यासह, आधारासह
३८) द्रव्य, संपती
३९) पुस्तके वाचावयास मिळण्याचे ठिकाण
४०) शर्करा
४२) चणचण, वानवा, उणीव
४४) आत्या (ग्रा.)
४६) उत्तम घोडा
४७) लोकांचे मत, विचार इ.
४८) किरकोळ सामान
५०) प्रेत
५२) मोठी टोपली
५६) व्यत्यय (हिं.)
५८) यद्यपी, कलाबूतीचे
५९) अमृत
६०) द्रवपदार्थ, उसाचे पेय
६३) एक कडधान्य
६४) सांप्रत दिवस
६६) बारा महिन्याचा काळ
६७) गवंडी.

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सु | ट | का | | स | सा | का | स | व | | आ | ड | का | ठी |
| ळ | | न | ळ | का | ठी | | दा | | ध्व | ज | | सा | |
| का | क | डा | | ळ | | क | शि | दा | | ता | त्पु | र | ता |
| | लि | | मो | | पा | ट | व | | पा | गा | | | रां |
| वा | यु | भा | र | मा | प | क | | अ | व | य | व | | ग |
| | ग | रा | | द | | ट | क | म | की | त | | प | ण |
| भू | | भ | यं | क | र | | सा | रा | | | | रो | |
| | शा | र | दा | | मा | सा | | व | र्त | मा | न | प | त्र |
| ग | ळा | | | क | | लो | | ती | | ग | | का | |
| ज | | सा | त | सा | या | सा | ने | | अं | | भा | र | त |
| गा | ढ | व | | ई | | ल | ह | र | ब | ह | र | | रु |
| मि | | ध | व | | नो | | मी | | र | | वा | र | ण |
| नी | र | | र | स | क | स | | स | खा | | ह | वा | |
| | जा | र | ण | मा | र | ण | | | ना | ह | क | | वा |

# कलासक्त

शोले चित्रपटात काम केल्यानंतर घराघरात पोहोचलेले 'गब्बरसिंग' म्हणजे अमजद खान. चित्रपट अभिनेते, दिग्दर्शक, खलनायक म्हणून प्रसिद्ध असलेल्या अमजद खान यांचा जन्म पश्तून कुटुंबात पेशावरमध्ये १२ नोव्हेंबर १९४० रोजी झाला. त्यांचे वडील जयंत हेही चित्रपट व नाट्यअभिनेते होते. चित्रपट कारकीर्द सुरू करण्यापूर्वी जयंत राजस्थानात अलवर येथे पोलीस अधिकारी होते. त्यांचे मूळ नाव झकारिया खान असे होते. दिग्दर्शक आणि निर्माता विजय भट्ट यांनी त्यांना जयंत हे नाव दिले होते.

## पडदा व्यापून टाकणारा खलनायक अमजद खान

श्रीराम शेटये



जयंत यांना तीन मुले होती. त्यातील मोठे अमजद खान. अमजद खान यांचे बालपण मुंबईतच गेले. त्यांना त्यांच्या वडिलांकडून अभिनयाचे धडे मिळाले होते. खान यांनी वांद्र्याच्या सेंट ॲन्ड्र्यू हायस्कूलमध्ये शिक्षण घेतले.तसेच पुढचे शिक्षण त्यांनी आर. डी. नॅशनल कॉलेजमध्ये घेतले, जिथे ते बहुमताने निवडून आलेले विद्यार्थी गटाचे सरचिटणीस होते.

शालेय शिक्षणानंतर त्यांना नाट्यक्षेत्राची आवड निर्माण झाली. नाटकामधून त्यांना आत्मविश्वास निर्माण झाला. सुरुवातीस त्यांनी काही नाटकांतून अभिनय केला. अमजद आपल्या वैयक्तिक आयुष्यात खूप उदार आणि शांतताप्रिय व्यक्ती होते. फावल्या वेळेत विनोद करणे हा त्यांचा स्थायीभाव होता. या बाबतीत अभिताभ बच्चन यांनी एका मुलाखतीत सांगितले होते, की अमजद अत्यंत दयाळू होते. त्यांनी 'शोले' व्यतिरिक्त बुद्धिबळपटू, दादा, कुर्बानी, लव्ह स्टोरी, याराना यांसह काही चित्रपटांमध्ये चरित्र आणि विनोदी भूमिका केल्या आहेत. दिग्दर्शक म्हणूनही त्यांनी चोर-पोलीस, आणि अमीर आदमी गरीब आदमी असे दोन चित्रपट केले, परंतु त्यांच्या अपयशानंतर त्यांनी पुन्हा कधीही चित्रपटांचे दिग्दर्शन केले नाही. बिस्किट बनविणाऱ्या एका कंपनीने पहिल्यांदाच जाहिरातीसाठी खलनायक अमजद यांची निवड केली. १९७२ मध्ये त्यांचा शेहला खान यांच्याशी विवाह झाला. त्यांना दोन मुले व एक मुलगी आहे.

अमजद खान यांनी बाल कलाकार म्हणून १९५१ साली चित्रपट 'नाजनीन' आणि १७ वर्षांच्या वयात 'अब दिल्ली दूर नही' या चित्रपटांमध्ये काम केलं होतं. अमजद खान यांनी १९७३ साली 'हिंदुस्तान की कसम' या चित्रपटाद्वारे बॉलिवूडमध्ये डेब्यू केला होता. मात्र त्यांना खरी ओळख मिळवून दिली ती १९७५ साली आलेल्या चित्रपट शोलेने.१५ ऑगस्ट १९७५ रोजी शोले प्रदर्शित झाला आणि गब्बरसिंग अर्थात अमजद खान एकदम प्रसिद्धीच्या झोतामध्ये आले. गब्बर सिंगच्या भूमिकेसाठी अजमद खान दिग्दर्शकाची पहिली पसंत नव्हते. सर्वात पहिले अभिनेता डॅनी डेन्झोपा यांना गब्बरच्या भूमिकेची ऑफर मिळाली होती. मात्र डॅनी तेव्हा अफगाणिस्तानमध्ये फिरोज खानच्या धर्मात्मा चित्रपटाचं शूटिंग करत होते. त्यामुळे त्यांना शोले चित्रपट सोडावा लागला. त्यानंतर गब्बरची भूमिका अमजद खान यांना मिळाली. सलीम खान यांनी जावेद अख्तर यांना अमजद खान यांचं नाव सुचवलं होतं. जावेद अख्तर यांनी अमजद खान यांना अनेक वर्षांपूर्वी दिल्लीतील एका नाटकात बघितलं होतं. हिंदी सिनेमात कित्येक व वर्षांपासून डाकूच्या भूमिकेत एक पारंपरिक चेहरा प्रचलित होता. डोळे नेहमी रागाने लाल, कपाळावर तिलक, कमरेवर काडतुसपट्टा, खांद्यावर बंदूक आणि हातात घोड्यांची लगाम; पण हा चेहरा अमजद यांनी पुसून टाकला. शोले या चित्रपटाच्या गब्बरसिंग या डाकूची प्रतिमा ग्लोबल स्टाइलमध्ये रूपांतरित केली. खांद्यावर काडतुसाचा पट्टा, तंबाखू मळणे, तोबरा भरणे आणि तुच्छतादर्शक थुंकणे व डायलॉगबाजी करणे असे त्याचे वेगळे स्वरूप त्यांनी उभे गेले. मराठी कामगार तंबाखू कशी मळतात, तसेच तळव्यावर घेऊन तोंडात कशी टाकतात याचा सराव त्यांनी गिरणगावामधे जाऊन केला होता. शोले हा हिंदी चित्रपटांच्या इतिहासातील सर्वाधिक यशस्वी सिनेमा मानला जातो. सुरुवातीस गर्दी कमी खेचत असल्याने हा चित्रपट अपयशी ठरतोय, की काय असे निर्मात्याला वाटू लागले. परंतु प्रेक्षकांनी सिनेमा डोक्यावर घेतला. संवादांवर चित्रपट यशस्वी होवू शकतो, हे शोले या चित्रपटाने दाखवून दिले. इतिहासात या सिनेमाच्या संवादांच्या कॅसेट प्रथमच विकल्या गेल्या. मुंबईच्या मिनर्व्हा चित्रपटगृहात शोले हा चित्रपट तब्बल २८६ आठवडे म्हणजे पाच वर्षे सहा महिने चालला. उत्पन्नाचे त्या काळातील सर्व विक्रम या चित्रपटाने मोडले होते. अमजदची चित्रपट कारकीर्द तशी छोटीच. अवघ्या पंधरा वर्षांची! वयाच्या अवघ्या ५१ व्या वर्षी १९९२ साली त्याचे निधन झाले. पाकिस्तानच्या जवळपास सर्वच थिएटरमध्ये शोले रिलीज करण्यात आला होता. ॲक्शन आणि ड्रामाने परिपूर्ण शोले चित्रपटाने त्याकाळी पाकिस्तानमध्ये लाखो रुपयांची कमाई केली होती. या काळात त्याने तब्बल सव्वाशेहून अधिक चित्रपटातून भूमिका केल्या. ज्येष्ठ सिने-दिग्दर्शक सत्यजित रे यांनी त्यांच्या 'शतरंज के खिलाडी (१९७७)' या चित्रपटात त्याला मोठी भूमिका दिली होती. वैयक्तिक जीवनात अमजद खान यांनी शेहलाशी विवाह केला. मात्र त्यांच्या या प्रेमविवाहाची कथा एखाद्या चित्रपटाच्या कथेपेक्षा कमी नाही. शेहला व अमजद खान मुंबईत एकमेकांचे शेजारी होते. त्यावेळी अमजद बीएला होते आणि शेहला केवळ १४ वर्षांची शाळेत जाणारी मुलगी होती. याचदम्यान अमजद शेहलाच्या प्रेमात पडले होते. शेहला व अमजद खान एकमेकांसोबत बॅडमिंटन खेळत. एका खेळता खेळता शेहलाने अमजद यांना भाई म्हटले. यावर मुझे भाई मत बोलो, असे अमजद शेहलाला म्हणाले होते. त्यानंतर काहीच दिवसांनी अमजद यांनी शेहलाला थेट लग्नासाठी प्रपोज केले होते. एकदिवस शेहला शाळेतून परतत असताना अमजद यांनी तिला मध्येच गाठले. तुला शेहलाचा अर्थ ठाऊक आहे, असे त्यांनी तिला विचारले. शेहला म्हणजे, जिच्या डोळ्यांचा रंग गडद आहे. लवकर मोठी हो. कारण मी तुझ्यासोबत लग्न करणार आहे, असे ते तिला म्हणाले. अमजद शेहलाच्या प्रेमात इतके वेडे झाले होते की, यानंतर काहीच महिन्यांत त्यांनी शेहलाच्या घरी लग्नाचा प्रस्ताव पाठवला. मात्र शेहला सध्या खूप लहान आहे, असे म्हणत तिच्या वडिलांनी हा प्रस्ताव नाकारला. यामुळे अमजद प्रचंड संतापले होते. यानंतर शेहलाच्या वडिलांनी तिला पुढच्या शिक्षणासाठी अलीगडला पाठवून दिले. आता शेहला व अमजद खान एकमेकांपासून दुरावले होते. आता केवळ पत्र हेच त्यांच्यातील संवादाचे माध्यम होते. दोघेही एकमेकांना पत्र लिहित. बराच काळ हा सिलसिला सुरू राहिला. अनेक वर्षे दोघेही रिलेशनशिपमध्ये राहिले आणि योग्यवेळ येताच दोघांनी लग्नाचा निर्णय घेतला. अमजद खान यांचे आईवडिल पुन्हा एकदा मुलाचे स्थळ घेऊन शेहलाच्या घरी गेले. यावेळी शेहलाचे वडिल लग्नासाठी तयार झाले आणि १९७२ साली हे कपल लग्नबंधनात अडकले. लग्नानंतर वर्षभरात या जोडप्याच्या घरी शादाब हा मुलगा जन्मला. एकीकडे मुलाचा जन्म आणि दुसरीकडे 'शोले'ची भूमिका असा दुहेरी आनंद अमजद यांच्या वाट्याला आला. 'शोले' रिलीज झाल्यानंतर अमजद यांचे अखखे आयुष्यच बदलले. शोले एक ऐतिहासिक चित्रपट ठरला.

••

## माना तेरी नजर मे तेरा प्यार हम नही...



**गुरुवारी ६ नोव्हेंबरला हिंदी चित्रपटसृष्टीतली प्रख्यात पार्श्वगायिका आणि अभिनेत्री सुलक्षणा पंडित यांनी जगाचा निरोप घेतला. मंगेशकर भगिनींच्या साम्राज्यात ज्या काही गायिकांना आपली कला दाखवण्याची थोडी फार संधी मिळाली त्यातलं हे एक नाव. त्यांनी गायलेल्या गाण्यांपैकी काही गाणी अविस्मरणीय म्हणता येतील अशीच आहेत. वर्ष १९७१ मध्ये प्रदर्शित झालेल्या दूर का राही या सबकुछ किशोरकुमार (निर्माता-दिग्दर्शक-अभिनेता-गायक-संगीतकार) असलेल्या चित्रपटात त्यांनी किशोरकुमार सोबत गायलेलं बेकरार दिल तू गाए जा... अतिशय भावपूर्ण आणि प्रेरणादायी आहे. गीतकार ए. इर्शाद यांनी लिहिलेल्या ह्या गाण्याचे शब्द अर्थपूर्ण आहेत.**

दर्द मे डूबी धून हो, सीने में इक सुलगन हो
सांसो में हलकी चुभन हो, सहमी हुई धडकन हो
दोहराते रहे बस गीत ये आ, दुनिया से रहे बेगाने
बेकरार दिल तू गाए जा ख

गुलजारसाहेबांच्या लेखणीतून उतरलेलं आणि संगीतकार कनू रॉय यांनी संगीतबद्ध केलेलं एक नितांत श्रवणीय गीत १९७९ साली आलेल्या गृहप्रवेशमध्ये गायक भूपेंद्रसिंह सोबत त्यांनी गायलंय-

रात में घोले चांद की मिसरी
दिन के गम नमकीन लगते है
नमकीन आंखो की नशीली बोलिया
बोलिए सुरीली बोलिया ख

सन १९७५ मधल्या ङ्गसंकल्पफ या चित्रपटात त्यांनी एक अतिशय अर्थवाही प्रार्थना गायली आहे-

पाप क्या पुण्य क्या ये भूला दे
कर्म कर फल की चिंता मिटा दे
यह परीक्षा न होगी दोबारा
धुंडता है तू किसका सहारा
तू ही सागर तू ही किनारा

हे गाणं गीतकार कैफी आझमी यांनी लिहिलं असून संगीतकार खय्याम यांनी स्वरसाज चढवला आहे.

त्यांचं १९८१ मध्ये आलेल्या आहिस्ता आहिस्ता या चित्रपटातलं माना तेरी नजर में तेरा प्यार हम नही, कैसे कहे के तेरे तलबगार हम नही ... हे दर्दभरं गाणं (गीतकार- नक्श लायलपुरी, संगीतकार- खय्याम) खासच आहे.

सुलक्षणा यांना संगीताचा कुटुंबातूनच वारसा लाभला होता. सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक पंडित जसराज त्यांचे काका होते. तर वडील प्रताप नारायण पंडीत हे देखील शास्त्रीय गायक होते. सुलक्षणा यांना सात बहीण-भाऊ होते. विख्यात संगीतकार जोडी जतीन-ललित, मंधीर हे भाऊ तर माया, संध्या आणि अभिनेत्री विजयता ह्या बहिणी. सुलक्षणा यांचा जन्म १२ जुलै १९५४ रोजी झाला. वयाच्या नवव्या वर्षापासून त्यांनी गायला सुरुवात केली. पुढे त्यांनी मोहम्मद रफी आणि किशोरकुमार यांच्या अनेक जाहीर कार्यक्रमांम धून गाणी गायलीत. १९७५ मधल्या उलझन या चित्रपटातून त्यांनी अभिनेत्री म्हणून पदार्पण केलं. संजीवकुमार यात त्यांचा नायक होता. नंतर त्यांनी तत्कालीन आघाडीच्या सर्वच अभिनेत्यांसमवेत काम केलं. उदा. शशी कपूर, राजेश खन्ना, विनोद खन्ना, जितेंद्र, ऋषी कपूर, शत्रुघ्न सिन्हा, फिरोज खान इत्यादी. जितेंद्र सोबत त्यांनी सर्वाधिक सिनेमे केले. त्या आयुष्यभर अविवाहित राहिल्या. अभिनेता संजीवकुमार याच्यावर त्यांचं जीवापाड प्रेम होतं. त्यांना त्याच्याशी लग्न करायचं होतं. पण संजीवकुमारने त्यांच्याशी लग्न केलं नाही. सुलक्षणा आणि संजीवकुमार विवाह बंधनात अडकले नाहीत मात्र त्यांच्यात अदृश्य असा प्रेमाचा धागा होता. संजीवकुमारला दारूचे भयंकर व्यसन होतं. त्यामुळे त्याचा अकाली मृत्यू झाला. सुलक्षणा यांनी हयात असे पर्यंत त्याची खूप काळजी घेतली. १९८५ मध्ये ६ नोव्हेंबरला संजीवकुमारचं निधन झालं. त्याच्या निधनाने सुलक्षणा यांना मोठा धक्का बसला आणि त्या अवसादग्रस्त झाल्या. योगायोग असा की संजीवकुमारच्या स्मृती दिनीच सुलक्षणा यांनीही अखेरचा श्वास घेतला !

१९६७ मधल्या तकदीर या चित्रपटात सुलक्षणा यांना पहिल्यांदा पार्श्वगायन करण्याची संधी मिळाली. ती सुद्धा लता मंगेशकर सोबत ! सात समुंदर पार से, गुडिया के बाजार से...हे ते गाणं. (गीतकार- आनंद बक्षी, संगीतकार- लक्ष्मीकांत-प्यारेलाल) संकल्प या चित्रपटातल्या तू ही सागर है, तू ही किनारा या गाण्यासाठी त्यांना १९७६ चा उत्कृष्ट पार्श्वगायिकेचा फिल्म फेअर पुरस्कार मिळाला होता. आपल्या छोट्याशा कारकिर्दीत त्यांनी जवळपास ८० चित्रपटांसाठी पार्श्वगायन केलं. सख्खे बंधू लोकप्रिय आणि आघाडीचे संगीतकार (जतीन-ललित) असूनही त्यांनी सुलक्षणा यांना फारशी संधी दिली नाही! साधरणत: ३० चित्रपटांमधून त्यांनी आपल्या अभिनयाचं दर्शन घडवलं. अपनापन, हेराफेरी, खानदान, चेहरे पे चेहरा, धरम काटा, वक्त की दीवार ही काही उल्लेखनीय चित्रपटांची नावं सांगता येतील. १९८० च्या दो वक्त की रोटी या चित्रपटात त्यांनी साकारलेली गंगाची भमिका गाजली होती. वर्ष १९९६ च्या खामोशी-द-म्युझिकल या चित्रपटातलं उदित नारायण सोबत गायलेलं सागर किनारे दो दिल है प्यासे... हे युगल गीत त्यांचं शेवटचं पार्श्वगायन असावं.

जिसके लिए सबकुछ छोडा.... (सोबत -रफी/ साजन की सहेली), जब आती होगी याद मेरी... (रफी / फांसी ), सोमवार को हम मिले... (किशोरकुमार/ अपनापन), आंखो में तुम... ( बप्पी लाहिरी/ तेरे प्यार में), परदेसीया तेरे देश में... (रफी/ गरम खून ), जाना कहा... (बप्पी लाहिरी/ चलते-चलते), तुम से कहेना है के... ( चेहरे पे चेहरा), सपनो का राजा... (शैलेन्द्रसिंह/ चलते-चलते), आज बहुत सी बाते हमने दिल से की... ( जज्बात - गझल अल्बम), घडी मिलन की आई ... (रफी/ एक बाप छह बेटे), चल चल कही अकेले में... (हेमलता/ सलाखे ), मिल जाते है मिलनेवाले... (फांसी), क्या जाने यह दुनिया क्या जाने... (अमितकुमार/ टूटे खिलौने), आज सोचा है खयालो में बुला कर तुमको... (रफी/ चेहरे पे चेहरा), जब जब अपना मेल हुआ... (रफी/ महुआ ), प्यार के बदले प्यार चाहिये... (पांचवी मंझील), खाली प्याला धुंदला दर्पन... (स्पर्श), इक बार कहो मुझे प्यार करती हो... (बप्पी लाहिरी / इक बार कहो ), आज प्यारे-प्यारे से लगते है आप... (किशोरकुमार/ उलझन), देखो कान्हा नही मानत बतिया... (पायल की झंकार), आसमान से तोड के तारे... (किशोरकुमार/ वो दिन याद करो), ये दुनिया है नकली... (किशोरकुमार/ शंकर शंभू ), खिले ना कागज के फुल... (किशोरकुमार/ जमानत), अरे प्यार किया है करेंगे... ( किशोरकुमार/ हंसते-खेलते) यासारखी श्रवणीय गाणी श्रोत्यांना देणाऱ्या गायिका आणि अभिनेत्री सुलक्षणा पंडित यांना भावपूर्ण श्रद्धांजली !

प्रा. डॉ. प्रवीण घोडेस्वार

**(लेखक हिंदी चित्रपट संगिताचे अभ्यासक आहेत.)**

••

## हरवत चाललेल्या बालपणातील बालदिन



जगन घाणेकर

लहानपण देगा देवा । मुंगी साखरेचा रवा ।। ऐरावत रत्न थोर । त्यासी अंकुशाचा मार ।। ज्याचे अंगी मोठेपण । तया यातना कठीण ।। या एका अभंगात संत तुकाराम महाराजांनी लहानपणाची थोरवी वर्णिली आहे. अंगात मोठेपण आले कि त्याला अनेक समस्यांना सामोरे जावे यासाठी कोणतेही दायित्व नसलेले लहानपणच बरे हे त्याकाळी तुकाराम महाराजांनी सांगितले असले, तरी आजमितीला लहानपणच अधिक यातनादायी झाले आहे.

देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या जन्मदिनाप्रीत्यर्थ साजरा होणारा बालदिन देशभरातील शाळांमध्ये नुकताच उत्साहाने साजरा झाला. बालकांच्या हक्काचा वर्षातील हा एकमेव दिवस असला, तरी आजच्या लहान मुलांची स्थिती पाहिल्यास त्यांचे बालपण कुठेतरी हरवत चालल्याचे लक्षात येते. विज्ञानाने जग प्रगतशील झाले असे म्हणतात; मात्र याच विज्ञानाने लाभलेल्या मोबाईल, इंटरनेट, व्हिडीओ गेम, केबल टीव्ही यांसारख्या साधनांनी मुलांना वेगळ्याच जगात नेले. मित्र मैत्रिणींसोबत मैदानी खेळ खेळण्याच्या, पालकांशी गप्पा मारून आपले विचार प्रकट करण्याच्या वयात मुले मोबाईलच्या आभासी जगामध्ये रमताना दिसत आहेत. ज्यामुळे हल्ली बालवयातच मुलांना नेत्रविकार, मनोविकार जडू लागले आहेत.

देशासाठी प्राणाचे बलिदान करणारे क्रांतिकारक, समाजसुधारक, राष्ट्रपुरुष हे आजच्या मुलांचे आदर्श नसून कार्टून जगतातील खोटी पात्रे मुलांना आपले आदर्श वाटू लागले आहेत. मुलांचे भवितव्य घडवण्याच्या हेतूने नोकरी व्यवसायासाठी घराबाहेर पडणारे आई बाबा मुलांना उमलत्या वयातच वेळ देत नसल्याने मुलांमधील त्यांच्याविषयीची प्रेम आणि आपुलकी कुठेतरी उणावू लागली आहे. त्यामुळे हल्लीची मुले पालकांना किंवा मोठ्यांना उलट उत्तरे देताना जराही विचार करत नाहीत. सातत्याने हिंस्त्र व्हिडीओ गेम्स, रिल्स पाहून लहान मुलांमध्येही विविध शारीरिक आणि मानसिक दोष वाढू लागले आहेत.

मोबाईल, टीव्ही पहात जेवल्याने मुलांच्या आरोग्यावर परिणाम होऊ लागले आहेत. घरातील सात्विक आणि पौष्टिक आहारापेक्षा बाहेरील पिझ्झा-बर्गर खाण्यामध्ये मुलांची रुची वाढू लागली आहे. सध्याच्या स्पर्धात्मक जगात आपल्या पाल्याचा निभाव लागावा म्हणून पालक त्यांना शाळेसोबत कोचिंग क्लासेस, प्रायव्हेट ट्युशन्सना घालत आहेत. हे कमी म्हणून कि काय त्याच्या जोडीला जिम्नॅस्टिक, स्पोर्ट्स, सिंगिंग, डान्स क्लासेसनाही मुलांना जावे लागत आहे. या सर्वांच्या ओझ्याखाली बालवयातच मुले राब-राब राबत आहेत.

पालकांच्या अपेक्षांचे ओझे पेलताना मुलांचे बालपण मात्र हरवत चालले आहे. गेल्या काही वर्षांत लहान मुलांवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्येही कमालीची वाढ झाली आहे . या सर्वांचा परिणाम म्हणून बाल गुन्हेगारीचा आलेखही दिवसागणिक चढू लागला आहे. १०-१२ वर्षांची लहान मुले सुद्धा काही मनाविरुद्ध घडले, घरात कोणी उलट बोलले, अपमान केला किंवा परीक्षेत कमी गुण मिळाले म्हणून आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घेऊ लागले आहेत. बालमजूर प्रतिबंधक कायदा अस्तित्वात असला तरी आज कितीतरी किराणा मालाच्या दुकानांत, चहाच्या टपरीवर, उपहारगृहांमध्ये, छोट्या कारखान्यांमध्ये लहान मुले राबताना दिसतात. सिग्नलवर, रेल्वे आणि बसेसमध्ये लहान मुलांकडून भीक मागून घेणे हाही एक व्यवसाय झाला आहे. मुलांचे हरवत चाललेले बालपण त्यांना पुन्हा मिळवून देण्याचे दायित्व नक्की कोणाचे? पालकांचे, समाजाचे कि सरकारचे?

९६६४५५९७८०

••



# भावनांचे माध्यम, गिटार

गिटार हे जगातील सर्वांत लोकप्रिय वाद्यांपैकी एक आहे. गिटार पॉप, रॉक, जाझ, फोक, शास्त्रीय संगीत किंवा भजन, काव्यगायन या सर्व संगीतप्रकारात वापरले जाते. गिटारचे शरीर लाकडापासून बनवले जाते. त्याला सहा, सात किंवा बारा तारा असतात. या तारांवर बोटांनी दाब देऊन आणि दुसऱ्या हाताने त्या तारा वाजवून सूर तयार केले जातात.

गिटारचे दोन मुख्य प्रकार असतात. अकौस्टिक गिटार आणि इलेक्ट्रिक गिटार. अकौस्टिक गिटारचा आवाज नैसर्गिक असतो. त्यात एक मोठे पोकळ शरीर असते ज्यामध्ये तारांची कंपने घुमतात आणि आवाज तयार होतो. इलेक्ट्रिक गिटारमध्ये आवाज वाढवण्यासाठी ॲम्प्लिफायर वापरावा लागतो. त्याचा आवाज खूप दमदार असतो. तो विविध प्रकारे बदलता येतो. त्यामुळे तो रॉक किंवा मेटल संगीतामध्ये जास्त वापरला जातो.

**वाद्यांची ओळख**

गिटारमधील प्रत्येक सूर कॉर्ड नावाच्या जोडीतून तयार होतो. काही मूलभूत कॉर्ड्स् शिकल्या की जवळजवळ शेकडो गाणी वाजवता येतात. अलीकडे इंटरनेटवर गिटार शिकण्यासाठी खूप व्हिडिओ आणि ॲप्स उपलब्ध आहेत. त्यामुळे अगदी प्राथमिक स्वरूपाची गिटार वाजवणे सोपे झाले आहे. जगातील काही प्रसिद्ध गिटार वादकांमध्ये जिमी हेंड्रिक्स, एरिक क्लॅप्टन, कार्लोस सँटाना यांची नावे घेता येतात. भारतातही ए. आर. रहमान, इलया राजा, तसेच अनेक बँड्समधील गिटारवादकांनी गिटार लोकप्रिय बनवले आहे. गिटार हे केवळ वाद्य नव्हे, तर ते भावनांचे माध्यम आहे. कधी शांत सुरावटीने मन शांत करते, तर कधी जोरदार तालांनी अंगात ऊर्जा निर्माण करते. म्हणूनच गिटार प्रत्येक पिढीला आवडते आणि त्याचे आकर्षण कधीच कमी होत नाही.

# वाहतुकीची भन्नाट साधनं





मित्रमैत्रिणींनो, वाहतुकीची बरीच साधनं आहेत. एखाद्या ठिकाणी लवकर पोहोचायचं असेल तर तुम्ही विमानाने जाऊ शकता. ट्रेन, टॅक्सी, मेट्रो, बस अशा विविध माध्यमांद्वारे तुम्ही प्रवास करू शकता. जगभरातही अशी अनेक साधनं आहेत. प्रत्येक देशाचं एक वेगळेपण आहे. वाहतुकीच्या अशाच काही भन्नाट पर्यायांविषयी...

- क्युबामध्ये कोको टॅक्सी चालवली जाते. कोको टॅक्सी काळ्या आणि पिवळ्या रंगाची असते. पिवळ्या रंगाची टॅक्सी पर्यटकांसाठी तर काळ्या रंगाची टॅक्सी स्थानिकांसाठी असते. या टॅक्सीचा आकार नारळाच्या करवंटीसारखा असतो. त्यामुळे या टॅक्सीला कोको टॅक्सी हे नाव पडलं.
- व्हिएतनाममध्ये सायक्लो रिक्षा खूप लोकप्रिय आहे. भारतातल्या अनेक शहरांमध्ये सायकल रिक्षा पहायला मिळतात. सायक्लो हा तसाच एक प्रकार आहे. सायक्लो ही तीन पायांची सायकल आहे. ही सायकल खूपच अनोखी आहे. याच्या पुढच्या बाजूला प्रवाशांसाठी आसन असतं तर मागच्या बाजूला चालक बसतो. व्हिएतनाममध्ये भटकंतीसाठी या सायकल रिक्षाने फिरता येतं.

**फन टाईम**

- पोर्तुगालमध्ये मोंटे टोबोग्गन नावाचं एक साधन आहे. इथल्या मदिरा बेटांवर त्यांचा वापर होतो. मोंटे टोबोग्गन बनवण्यासाठी लाकूड आणि वेताचा वापर केला जातो. डोंगरावरून खाली येण्यासाठी मोंटे टोबोग्गनचा वापर केला जातो. इथल्या नागमोडी रस्त्यांवर प्रवास करण्यासाठी हे अत्यंत उपयुक्त साधन ठरतं.
- जर्मनीमधल्या वुपरटल शहरात जवळपास ३९ फूट उंचीवर सस्पेन्शन मोनोरेल तयार करण्यात आली आहे. ही मोनोरेल म्हणजे वाहतुकीचं अनोखं साधन आहे. या मोनारेलचे डबे आणि स्थानकं बनवण्यासाठी जवळपास १९,२०० टन स्टील वापरण्यात आलं आहे. ही मोनोरेल जर्मनीमध्ये १९०१ पासून सुरू आहे. संपूर्ण शहरात मोनोरेलची २० स्थानकं आहेत.
- कंबोडियामधली बांबू ट्रेन खूपच प्रसिद्ध आहे. ही ट्रेन ३.७ किलोमीटरचं अंतर कापते. यासाठी २० मिनिटं लागतात. या ट्रेनला डबे किंवा इंजिन नाही. ती बांबूपासून तयार करण्यात आली आहे. या ट्रेनमध्ये बसायची मजाच वेगळी!

# विमानाचा रंग पांढराच का?

मुलांनो, तुम्ही विमानात बसला आहात का? विमानात बसला नसाल तरी तुम्ही विमान तर बघितलंच असेल. प्रत्येक विमानाचा रंग हा पांढराच असतो. विमान कोणत्याही कंपनीचं असलं तरी त्याला दुसरा रंग दिला जात नाही. असं का बरं होत असावं? विमानाला पांढऱ्याशिवाय दुसरा रंग का बरं दिला जात नसावा? यामागे बरीच कारणं आहेत. पण विमान थंड रहावं म्हणून त्याला पांढरा रंग दिला जातो. विमान आकाशात उडतं. त्यावर सूर्याची किरणं पडत असतात. पांढरा रंग शीतल असतो. हा रंग सूर्याची उष्णता कमी प्रमाणात शोषून घेतो. म्हणूनच उन्हाळ्यात पांढरे किंवा फिकट रंगाचे कपडे घालण्याचा सल्ला दिला जातो. त्या धर्तीवर विमान थंड रहावं म्हणून पांढऱ्या रंगाचा वापर केला जातो.

**असं का?**





विमानाला पांढरा रंग देण्याचं अजून एक महत्त्वाचं कारण म्हणजे इतर रंग दिले तर विमान कंपन्यांना भरपूर पैसे द्यावे लागतात. त्या तुलनेत पांढरा रंग कमी खर्चात देता येतो. यामुळे कंपनीचे पैसेही वाचतात. तसंच पांढरा रंग द्यायला फार वेळही लागत नाही. इतर रंग द्यायला वेळही जास्त लागतो. या गोष्टींचा विचार करून विमानाला पांढरा रंग दिला जातो.

# बीएस म्हणजे काय?



दोस्तांनो, तुम्ही बी ६ इंजिनाबद्दल ऐकलं असेल. नव्या वाहनांमध्ये बी ६ इंजिन बसवलं जातं. प्रदूषणाचं प्रमाण कमी करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. मध्यंतरी बीएस ४ इंजिनाच्या बाबतीतही असाच निर्णय घेण्यात आला. ३१ मार्च २०20 नंतर बीएस ४ इंजिनवाल्या गाड्यांची विक्री करता येणार नाही, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला. म्हणूनच आता या इंजिनबाबत चर्चा सुरू झाली आहे. बीएस ४ इंजिन म्हणजे नेमकं काय हे जाणून घेऊ.

बीएस म्हणजे भारत स्टेज. हे एक परिमाण आहे. भारतात गाड्यांच्या माध्यमातून होणाऱ्या प्रदूषणाचं मोजमाप बीएस या परिमाणाने केलं जातं. हे मानक भारत सरकारनेच तयार केलं आहे. बीएस ३, बीएस ४, बीएस ५, बीएस ६ अशी मानकं निश्चित करण्यात आली आहेत. बीएस ६ इंजिनमधून कार्बनचं उत्सर्जन कमी प्रमाणात होतं. बीएसच्या पुढचा आकडा जेवढा मोठा तेवढं ते इंजिन सुरक्षित किंवा कमी प्रदूषण करणारं मानलं जातं. एक एप्रिलपासून बीएस ६ इंजिनं बंधनकारक करण्यात आली आहेत. त्यामुळे आता वाहन कंपन्या बीएस ६ इंजिनवाल्या वाहनांची निर्मिती करू लागली आहेत.

**जाणून घ्या**


# विशाल ब्रह्मपुत्र

ब्रह्मपुत्र ही भारतातील सर्वात मोठ्या आणि महत्त्वाच्या नद्यांपैकी एक आहे. तिचा जन्म तिबेटमधल्या हिमालयाजवळील तलावातून होतो. तिबेटमध्ये तिला ‘सांगपो’ असे नाव आहे. अरुणाचल प्रदेशातून भारतात प्रवेश करताना ती मोठ्या वेगाने दऱ्याखोऱ्यांमधून वाहत येते. पुढे ती आसाममध्ये पोहोचते. तिथल्या सपाट मैदानात आली की तिचा वेग कमी होतो. शेती, पिण्याचे पाणी, मासेमारी आणि वाहतूक यासाठी तिचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. या नदीचा प्रवाह खूप रुंद आहे. काही ठिकाणी तर ती १० ते १५ किलोमीटरपर्यंत पसरलेली दिसते. काही पुराणकथांनुसार ब्रह्मदेवांची कन्या म्हणून तिला ‘ब्रह्मपुत्रा’ म्हणतात. परंतु तिचे विशाल रूप पाहून ब्रह्मपुत्र असेही म्हटले जाते. पावसाळ्यात ब्रह्मपुत्र नदीला अनेकदा पूर येतो. पण याच पुरामुळे सुपीक



गाळ जमिनीवर साचतो. त्यामुळे शेती चांगली होते. ब्रह्मपुत्रेच्या काठावर अनेक प्रकारचे पक्षी, प्राणी, वनस्पती तसेच एकशिंगे गेंडे आणि अनेक दुर्मिळ मत्स्यप्रजाती आढळतात. ब्रह्मपुत्र नदी बांगलादेशात गेल्यावर गंगेला मिळते. दोन्ही नद्यांचा तिथे एक त्रिभुजाकार डेल्टा तयार होतो. हा जगातील सर्वात मोठा डेल्टा आहे. या नदीवर बोगीबील पूल हा भारतातील सर्वात लांब रेल्वे–रोड पूल आहे. गुवाहाटी, तिनसुकिया, यासारखी अनेक शहरे ब्रह्मपुत्रेच्या काठावर आहेत. गुवाहाटी येथे कामाख्या देवीचे प्रसिद्ध मंदिर आहे. तर बांगलादेशात ढाका आणि मैमनसिंहसारखी अनेक महत्त्वाची शहरे आहेत. भारतात अरुणाचल प्रदेशात दिबंग, सबनसिरी ही मोठी धरणे आहेत. काही धरणे अजून बांधली जात आहेत. ब्रह्मपुत्र नदी खरोखरीच आसामची जीवनरेखा आहे.

**ओळख नद्यांची**



**ठिपके जुळवा**



# असे आहेत गार्बेज कॅफे





आपण आपला देश स्वच्छ ठेवायला हवा. नागरिकशास्त्रात आपण आपली कर्तव्यं शिकतो. पण ही कर्तव्यं पार पाडतो का? रस्त्यावर कचरा न करणं हे आपलं कर्तव्यच आहे. प्लास्टिकमुळे पर्यावरणाचं बरंच नुकसान होत आहे. म्हणूनच या कचऱ्याचं प्रमाण कमी करण्यासाठी विविध शहरांमध्ये गार्बेज कॅफे ही संकल्पना राबवली जात आहे. चला तर मग, गार्बेज कॅफे म्हणजे नेमकं काय हे जाणून घेऊ.

- जुलै २०१९ मध्ये देशातला पहिला गार्बेज कॅफे सुरू करण्यात आला. हा कॅफे छत्तीसगडमध्ये सुरू झाला. या कॅफेमध्ये प्लास्टिकचा कचरा दिल्यानंतर गरीबांना अन्नदान केलं जातं. एक किलो प्लास्टिक आणणाऱ्यांना पोटभर जेवण दिलं जातं तर अर्धा किलो प्लास्टिक आणणाऱ्यांना नाश्ता दिला जातो. हे सर्व प्लास्टिक रस्ता तयार करण्याच्या कामासाठी वापरलं जात आहे.
- गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात दिल्लीमध्ये गार्बेज कॅफे सुरू झाला. इथेही प्लास्टिकचा कचरा दिल्यानंतर पोटभर जेवण दिलं जातं. द्वारका परिसरातल्या एका मॉलमध्ये हा गार्बेज कॅफे आहे. इथे प्लास्टिकचा कचरा दिल्यानंतर आवडत्या रेस्टॉरंटमध्ये जेवता येतं. प्लास्टिकच्या वजनानुसार लोकांना कूपन दिलं जातं.

**गंमत ग्यान**

- गुजरातमधल्या दाहोदमध्ये देशातला तिसरा गार्बेज कॅफे सुरू करण्यात आला. इथे अर्धा किलो प्लास्टिक देणाऱ्यांना चहा तर एक किलो प्लास्टिक देणाऱ्यांना नाश्ता दिला जातो.

या सगळ्या प्लास्टिकचा वापर रस्ते बांधण्यासाठी केला जाणार आहे. इंडियन ऑईल कॉर्पोरेशनने अशा प्लास्टिकचा वापर करून रस्ता बांधला आहे.

# इकारसचे पंख

प्राचीन काळची गोष्ट. ग्रीसमध्ये डेडालस नावाचा एक कुशल कारागीर होता. तो वेगवेगळ्या प्रकारच्या अनेक सुंदर वस्तु बनवत असे. एकदा एका दुष्ट जादूगाराने त्याच्या मुलाला, इकारसला पळवून नेले आणि एका बेटावर कैदेत ठेवले. डेडालस आपल्या मुलाला शोधत त्या बेटावर पोचला. खूप प्रयत्न करून त्याने




त्या जादूगाराच्या घरात प्रवेश केला. जादूगाराला ठार मारून डेडालस परत निघाला. परंतु त्याने आणलेली नाव समुद्राच्या लाटांबरोबर वाहून गेली होती. पण डेडालस हुशार होता. त्याने काही वेळ विचार केला आणि पक्ष्यांची पिसे आणि मेण वापरून दोन मोठे पंख बनवले. एक स्वतःसाठी आणि एक मुलासाठी.

आता या पंखांनी आपण आकाशात उडणार आहोत आणि समुद्र ओलांडून घरी जाणार आहोत. पण एक गोष्ट लक्षात ठेव. खूप वर उडू नकोस. सूर्य जवळ आला तर मेण वितळेल. आणि खूप खाली पण उडू नकोस. समुद्राच्या लाटा पंख ओले करतील. मध्यम उंचीने शांतपणे उड. उडण्यापूर्वी डेडालसने इकारसला समजावलं.

सुरुवातीला इकारस नीट उडत होता. पण आकाशात त्याला खूप आनंद आणि उत्साह वाटला. मी तर पक्ष्यांपेक्षा जास्त शक्तिशाली आहे! मी अजून वर उडणार! तो वडिलांच्या सूचना विसरला आणि सूर्याकडे वरवर उडू लागला.

सूर्याच्या उष्णतेने त्याच्या पंखांतील मेण वितळायला लागले. पिसे खाली पडू लागली. इकारसने घाबरून वडिलांना हाका मारल्या. पण तो पंख मोडून गेल्यामुळे हळूहळू समुद्रात कोसळला. डेडालस दुःखी झाला. त्याने इकारसचे नाव त्या समुद्राला दिले. आजही ग्रीक लोक त्या समुद्राला इकारियन समुद्र म्हणूनच ओळखतात.

**ग्रीक लोककथा**





**दोस्त हे मस्त**

## दणकट याक



दोस्तांनो, वाळवंटात वाहतुकीसाठी उंटांचा वापर होतो. त्याचप्रमाणे बर्फाळ प्रदेशात याक हा प्राणी असतो. याक हा गाय, बैलांसारखाच दिसतो. मात्र त्याच्या अंगावर खूप केस असतात. याक शाकाहारी प्राणी आहे. तो गवत खातो तसंच भरपूर पाणी पितो. पाळीव याक शेतात राबतात. याकची शिंगं दणकट आणि टोकदार असतात. खूप थंडी पडल्यावर याक आपल्या शिंगाने बर्फ खणून गवत खातो. याक अत्यंत धिप्पाड असा प्राणी आहे. बर्फाळ प्रदेशातले लोक याकचं दूध पितात. याकच्या दुधापासून तयार करण्यात आलेलं पनीर आणि चीज लवकर खराब होत नाही.

**खादाडी**

## चमचमीत व्हेज टॅकोज



मुलामुलींनो, तुम्हाला छान चविष्ट पदार्थ खायला खूप आवडतात ना? तुम्ही मस्तपैकी व्हेज टॅकोज बनवून बघा. यासाठी चार टॅकोज, एक कप उकडलेला राजमा, दोन चमचे टोमॅटो प्युरी, मीठ, एक कांदा, दोन चमचे तेल, टोमॅटो आणि कोथिंबिर असं साहित्य घ्या. एका कढईत थोडं तेल गरम करा. यात कांदा, राजमा, मीठ, टोमॅटो प्युरी घालून मिक्स करा. मॅशरने हे मिश्रण मॅश करून घ्या. त्यानंतर त्यात थोडी साखर, हिरवी मिरची, चिली फ्लेक्स आणि कोथिंबिर घालून शिजवून घ्या. हे सगळं शिजवलेलं मिश्रण टॅकोजमध्ये घाला. वरून चिरलेला कांदा, टोमॅटो आणि कोथिंबिर घालून सजवा. मस्तपैकी खा.

**स्टडी टिप्स**

## नवे मित्रमैत्रिणी जोडा




मुलामुलींनो, तुम्ही वेगवेगळ्या शिकवणी वर्गांना जात असाल. शाळेत तुमचे मित्र–मैत्रिणी असतीलच. पण या क्लासमध्येही मुलामुलींशी बोला. त्यांच्याशी मैत्री करा. यामुळे एखादा मुद्दा समजला नाही तर तुम्ही त्यांच्याशी चर्चा करू शकता. काही कारणामुळे क्लास बुडवावा लागला तर तुम्ही त्यांच्याकडून नोट्स घेऊ शकता. परीक्षेच्या काळात एकत्र अभ्यास करू शकता. एकत्र अभ्यास केल्यामुळे विषय समजून घेणं सोपं होतं आणि हसत–खेळत छान अभ्यासही होतो.

**योगा टाईम**

## करा शलभासन

छोट्यांनो, आपलं शरीर लवचिक असायला हवं. शरीर लवचिक नसेल तर खेळताना, व्यायाम करताना त्रास होऊ शकतो. शरीर लवचिक बनवण्यासाठी तुम्ही शलभासन करू शकता. हे आसन खूप सोपं आहे. यामुळे शरीर लवचिक होतच शिवाय कंबरेचे स्नायू बळकट होतात. या आसनामुळे पचनशक्ती सुधारते. त्यामुळे हे आसन खूपच उपयुक्त ठरू शकतं.



## निवडक

### पाकवर आयसीसीची कारवाई

**नवी दिल्ली :** श्रीलंका आणि पाकिस्तान यांच्यातील तीन सामन्यांच्या वनडे मालिकेला ११ नोव्हेंबर रोजी सुरुवात झाली. पहिल्या वनडेत पाकिस्तानने दणदणीत विजय मिळवला असला, तरी या सामन्यानंतर त्याच्यावर मोठी कारवाई झाली. सामना जिंकूनही आयसीसीने पाकिस्तान संघावर कठोर कारवाई केली आहे. पहिल्या वनडेत झालेल्या गंभीर चुकांमुळे पाक संघाला मोठा दंड ठोठावण्यात आला. विशेष म्हणजे, कर्णधार शाहीन आफ्रिदीलाही आपली चूक मान्य केली आहे. श्रीलंकेविरुद्धच्या पहिल्या वनडेत पाकिस्तानचा ओव्हर-रेट ठराविक वेळेपेक्षा खूपच कमी होता. रावलपिंडीतील या सामन्यावर आयसीसीने स्टेटमेंट देत आरोपांची पुष्टी केली. मॅच रेफरी अली नक्वी यांनी पाकिस्तान संघावर दंड जाहीर केला, कारण ते निर्धारित वेळेपेक्षा तब्बल चार षटके मागे होते.

### टिम साउदी गोलंदाजी प्रशिक्षक

**नवी दिल्ली :** न्यूझीलंडचा माजी वेगवान गोलंदाज टिम साउदी आता नव्या भूमिकेत दिसणार आहे. आयपीएल २०२६ स्पर्धेसाठी कोलकाता नाईट राडयर्सने त्याच्यावर गोलंदाज प्रशिक्षकाची जबाबदारी टाकली आहे. आयपीएल २०२५ स्पर्धेत कोलकात्याची कामगिरी काही खास नव्हती. त्यामुळे फ्रेंचायझीने कोचिंग स्टाफमध्ये बदल केला आहे. आयपीएल २०२६ स्पर्धेत टिम साउदी आता गोलंदाज प्रशिक्षकाची जबाबदारी पार पाडणार आहे. टिम साउदीकडे आयपीएल स्पर्धेच्या दांडगा अनुभव आहे. आयपीएल स्पर्धेत चॅम्पियन संघांचा भाग राहिला आहे. मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्ससोबत विजयाची ट्रॉफी उचलली आहे. त्यामुळे त्याची क्षमता ओळखूनच कोलकाता नाईट रायडर्सने त्याच्यावर जबाबदारी टाकली आहे. आता त्याच्या कारकीर्दीत कोलकात्याचा संघ कशी कामगिरी करतो याकडे लक्ष असणार आहे. टिम साउदी कोलकाता नाईट रायडर्स संघासोबत खेळाडू म्हणूनही खेळला आहे. टीम साउदी २०२१, २०२११ आणि २०२३ रोजी संघाचा भाग होता.

### एसीपी पै. विजय चौधरी हिंदकेसरी'साठी पात्र

**पनवेल :** भारतीय शैली कुस्ती महासंघ व महाराष्ट्र राज्य भारतीय कुस्ती संघ यांच्या मान्यतेने राष्ट्रीय कुस्ती संकुल, वडकी (पुणे) येथे पार पडलेल्या हिंदकेसरी निवड चाचणी कुस्ती स्पर्धेत नवी मुंबई पोलीस दलातील सहायक पोलीस आयुक्त तसेच सलग तीन वेळा महाराष्ट्र केसरी विजेता व जागतिक पोलीस सुवर्णपदक विजेते पैलवान विजय चौधरी यांनी दमदार व ऐतिहासिक खेळी सादर करत हिंदकेसरी स्पर्धेसाठीची पात्रता मिळवली आहे.

### शार्दुल मुंबईच्या ताफ्यात

**मुंबई :** आयपीएल २०२५ स्पर्धेच्या लिलावापूर्वी खेळाडूंच्या ट्रेडची जोरदार चर्चा रंगली आहे. सर्व संघांना १५ नोव्हेंबरपर्यंत आपल्या रिटेन आणि रिलीज केलेल्या खेळाडूंची यादी जाहीर करावी लागणार आहे. त्याआधी ट्रेड डीलबाबत अनेक बातम्या समोर आल्या आहेत. संजू सॅमसन चेन्नई सुपर किंग्ज संघात जाणार आणि रवींद्र जडेजा राजस्थान रॉयल्समध्ये येणार असल्याची जोरदार चर्चा रंगली आहे. दरम्यान, ही चर्चा सुरू असताना ५ वेळचा चॅम्पियन संघ मुंबई इंडियन्सने शार्दुल ठाकूरला आपल्या ताफ्यात स्थान दिलं आहे. शार्दुल ठाकूर गेल्या हंगामात लखनौ सुपर जायंट्स संघाकडून खेळताना दिसून आला होता. आगामी हंगामापूर्वी मुंबई इंडियन्सने शार्दुलला २ कोटी रोख रक्कम मोजून आपल्या संघात स्थान दिलं आहे. मुंबई आणि लखनौने कुठल्याही खेळाडूंची अदलाबदल न करता रोख रक्कम देऊन शार्दुलला आपल्या संघात स्थान दिलं. यादरम्यान शार्दुल ठाकूरच्या नावे मोठ्या विक्रमाची नोंद झाली आहे. आयपीएल २०१७ स्पर्धेआधी रायझिंग पुणे सुपरजायंट्स संघाने शार्दुल ठाकूरची पहिल्यांदा ट्रेड डील केली होती. त्यावेळी तो पंजाब किंग्ज संघाकडून खेळायचा. त्यानंतर २०२३ मध्ये दिल्लीकडून खेळणाऱ्या शार्दुलला कोलकाता नाईट रायडर्सने आपल्या ताफ्यात स्थान दिलं. दोन वेळा ट्रेड डील झाल्यानंतर आता शार्दुल ठाकूर तिसऱ्यांदा आयपीएल लिलावाआधी होणाऱ्या ट्रेड डीलनुसार लखनौ सुपर जायंट्सकडून मुंबई इंडियन्स संघात गेला आहे. त्यामुळे आयपीएल स्पर्धेच्या इतिहासात ३ वेळा ट्रेड होणारा शार्दुल हा पहिलाच खेळाडू ठरला आहे.



### ऋतुराजच्या शतकी खेळीने भारत विजयी

**नवी दिल्ली :** ऋतुराज गायकवाडच्या शतकी खेळीच्या जोरावर भारतीय अ संघाने दक्षिण आफ्रिका अ विरुद्धचा पहिला वनडे सामना जिंकत मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. अनौपचारिक वनडे मालिकेतील पहिल्या सामन्यात पहिल्यांदा फलंदाजी करताना दक्षिण आफ्रिकेच्या संघाने टीम इंडियासमोर २८६ धावांचे आव्हान ठेवले होते. दक्षिण आफ्रिकेच्या संघाने ठेवलेल्या धावसंख्येचा पाठलाग करताना अभिषेक शर्माकडून मोठा धमाका पाहायला मिळेल, अशी अपेक्षा होती. पण तो ३१ धावा करून परतला. त्याच्यासोबत भारताच्या डावाची सुरुवात करणारा सलामीवीर आणि भारती अ संघाचा उपकर्णधार ऋतुराज गायकवाडनं सामन्याची सूत्रे आपल्या हाती घेतली. त्याने ११७ धावांची खेळी करत संघासाठी सामन्याला कलाटणी देणारा डाव खेळला. ऋतुराज गायकवाडनं पहिल्या अनौपचारिक वनडे सामन्यात १२९ चेंडूंत ११७ धावांची दमदार खेळी केली. त्याने या खेळीत १२ खणखणीत चौकार मारले. तिलक वर्मानं या सामन्यात ५८ चेंडूंत ३९ धावा केल्या. ही भारतीय संघाकडून दुसऱ्या क्रमांकाची खेळी ठरली. शेवटच्या षटकात निशांत संधू आणि हर्षित राणा जोडीनं भारतीय संघाला ४ विकेट्स आणि ३ विकेट्स राखून संघाचा विजय निश्चित केला.पहिल्यांदा फलंदाजी करताना दक्षिण आफ्रिका अ संघाने अवघ्या ५१ धावांत ५ विकेट्स गमावल्या होत्या. पण त्यानंतर डेलानो पोटगिएटर (९० धावा), डायन फॉरेस्टर (७७ धावा) आणि ब्योर्न फोर्टुइन (५८ धावा) यांच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर दक्षिण आफ्रिकेच्या संघाने २८५ धावांपर्यंत मजल मारली.

# बुमराहचा पंच, कुलदीपची जादू!

**|| कोलकाताच्या ईडन गार्डनवर चॅम्पियन्सचं वस्त्रहरण || पहिल्या डावात दक्षिण आफ्रिका १५९ धावांवर ऑलआऊट**

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील पहिल्या कसोटी सामन्याच्या पहिल्या डावात दक्षिण आफ्रिकेची फलंदाजी पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळली. कोलकात्याच्या ईडन गार्डन्सवर कर्णधार बावुमा याने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. पण, भारतीय संघाच्या वेगवान आणि फिरकी गोलंदाजांच्या भेदक माऱ्यासमोर दक्षिण आफ्रिकेचा पहिला डाव फक्त ५५ षटकांमध्ये १५९ धावांवर संपुष्टात आला.

दक्षिण आफ्रिकेची सुरूवात संथ झाली. एडन मार्करम याने सर्वाधिक ३१ धावा केल्या. याशिवाय रायन रिकलटन २३, विआन मल्डर २४ आणि टोनी डी झोर्झी २४ धावा काढून परतले. या चार फलंदाजांव्यतिरिक्त एकालाही २० धावांचा आकडा पार करता आला नाही. कर्णधार टेम्बा बावुमा फक्त तीन धावांवर आऊट झाला. ट्रिस्टन स्टब्स याने १५ धावा काढून एक बाजू सांभाळण्याचा प्रयत्न केला, पण त्याला दुसऱ्या बाजूने साथ मिळाली नाही. सलामीवीरांची विकेट गेल्यानंतरच साऊथ आफ्रिकेचा डाव ढेपाळण्यास सुरूवात झाली.



### जसप्रीत बुमराहचा पंच

जसप्रीत गोलंदाजीने रस्ता रिकलटन, महत्त्वाच्या मोहम्मद जानसेन या

बुमराहने आपल्या भेदक स्विंग आणि अचूक दक्षिण आफ्रिकेच्या पाच फलंदाजांना तंबूचा दाखवला. यामध्ये एडन मार्करम, रायन टोनी डी झोर्झी आणि केशव महाराज यांच्या विकेट्सचा समावेश आहे. तर सिराजने मार्को आणि काईल वेरेन्ने दोघांना त्रिफळाचित करत दोन गडी बाद केले. जसप्रीत बुमराहने केवळ १४ ओव्हर्समध्ये २७ धावा देऊन ५ विकेट्स घेतल्या. त्यातील ५ ओव्हर्स मेडन होत्या. त्याच्या करिअरमधील हे १६वे ५-विकेट हॉल ठरला. विशेष म्हणजे, ईशांत शर्मानंतर कसोटीच्या पहिल्याच दिवशी ५ विकेट घेण्याचा पराक्रम बुमराहने केला. ईशांतने हेच काम २०१९ मध्ये याच मैदानावर बांगलादेशविरुद्ध साध्य केले होते.



### कुलदीपने दाखवली फिरकीची जादू

भारताच्या फिरकीपटूनेदेखील कमाल केली. भारतीय संघाने खेळवलेल्या चार फिरकीपटूंपैकी कुलदीप यादव याने कर्णधार बावुमासह दोन महत्त्वाच्या विकेट्स घेतल्या, तर अक्षर पटेलला १ विकेट मिळाली. वॉशिंग्टन सुंदर याला विकेट मिळाली नसली तरी त्याने दुसऱ्या बाजूने दबाव कायम ठेवला. ईडन गार्डन्सच्या खेळपट्टीवर फिरकीपटूंना मदत मिळत असल्याचे दिसत आहे. दक्षिण आफ्रिकेचा डाव लवकर गुंडाळल्यामुळे टीम इंडिया आता पहिल्या डावामध्ये मोठी आघाडी घेण्याचा प्रयत्न करेल.

### ईडन गार्डन्सवरील सर्वात कमी धावसंख्या

ईडन गार्डन्सवरील परदेशी संघाने पहिल्या डावात केलेली ही तिसरी सर्वात कमी धावसंख्या आहे. याआधी पहिल्या डावातल्या सर्वात कमी धावसंख्या बांगलादेशच्या नावावर आहेत. २०१९ मध्ये बांगलादेशचा अवघ्या १०६ धावांवर ऑलआउट झाला होता. दुसरी सर्वात कमी धावसंख्या वेस्ट इंडिजची आहे. २०११ मध्ये १५३ धावांवर वेस्ट इंडिजचा संघ ऑलआउट झाला होता. आता, १५९ धावांसह दक्षिण आफ्रिका या यादीत तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे.

## कोकण विभागीय आंतरमहाविद्यालयीन खो-खो स्पर्धा

**मुलांमध्ये लांजा, तर मुलींमध्ये कुडाळ संघाची बाजी**

**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

मुंबई विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. मनोज रेड्डी यांच्या निर्देशानुसार मुंबई विद्यापीठातील मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे व कोकण विभागीय विविध स्पर्धा संपन्न होत आहेत. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ ची मुंबई विद्यापीठ अंतर्गत कोकण विभागीय आंतरमहाविद्यालयीन खो-खो मुले व मुली स्पर्धा दि. १० ते १२ नोव्हेंबरदरम्यानसुधागडएज्युकेशन सोसायटी पालीचे शेठ ज.नौ. पालीवाला महाविद्यालयातील जनरल अरुणकुमार वैद्य क्रीडांगण येथे संपन्न झाली. मुलांमध्ये लांजा, तर मुलींमध्ये कुडाळ महाविद्यालयाच्या संघाने बाजी मारली.

या स्पर्धेचे उद्घाटन पाली सुधागडचे तहसीलदार उत्तम कुंभार यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून सुएसोच्या अध्यक्षा गीता पालरेचा, उपाध्यक्ष रवींद्र लिमये, सचिव ग.रा. म्हात्रे, संचालिका तृप्ती मराठे, हर्षा चांदोरकर, बल्लाळेश्वर देवस्थानचे सरपंच जितेंद्र गद्रे, पाली नगरपंचायतीचे नगराध्यक्ष पराग मेहता, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुधाकर लहूपचांग, कोकण विभागीय क्रीडा समिती समन्वयक शशांक उपशेटे, सचिव चंद्रकांतनाईक, महाविद्यालयातील कार्यालयीन अधीक्षक चंद्रकांत चिले, महाविद्यालयातील क्रीडा विभाग प्रा. संतोष भोईर, जिमखाना प्रमुख संजय काटकर, महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे नामांकित पंच, विविध महाविद्यालयातील क्रीडा संचालक, पालीवाला महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



या स्पर्धेसाठी कोकण विभागातील मुलांचे १३ व मुलींच्या ९ संघांनी नाव नोंदवून एकूण १३९ मुले व ८६ मुलींनी प्रत्यक्ष सहभाग घेतला. मुंबई विद्यापीठ कोकण विभागीय आंतरमहाविद्यालयीन खो-खो मुले या स्पर्धेचा प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचा मानकरी क्रमशः ए एस सी कॉलेज- लांजा, ए एस पी कॉलेज- देवरुख व जे एस एम कॉलेज-अलिबाग ठरला. तसेच खो-खो मुली या स्पर्धेचा प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचा मानकरी अनुक्रमे एस आर एम कॉलेज-कुडाळ, जे एस एम कॉलेज- अलिबाग व एस पी के कॉलेज -सावंतवाडी ठरले.

ही क्रीडा स्पर्धा यशस्वी करण्यासाठी पालीवाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुधाकर लहूपपचांग यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा प्रमुख प्रा. संतोष भोईर, जिमखाना प्रमुख संजय काटकर, क्रीडा विभाग सदस्य प्रा. दिपाली बांगारे, प्रा. महेश राहीन्ज, प्रा. रुकसार महाडकर, क्रीडा शिक्षक चिंतामण शिंगवा तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक आणि प्राध्यापकेत्तर कर्मचारी, क्रीडा विभागातील विद्यार्थी यांनी मेहनत घेतली. या संपूर्ण क्रीडा स्पर्धेचे सूत्रसंचालन प्रा. संदेश गावडे व आभार प्रदर्शन वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. स्नेहल बेलवलकर यांनी केले.

### जिल्हा अजिंक्यपद खो-खो स्पर्धा

## दादर, माहीम संघ अजिंक्य

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई खो-खो संघटनेच्या मान्यतेने कै. दत्ताराम गायकवाड फाऊंडेशन पुरस्कृत व ओम साई ईश्वर सेवा मंडळ लालबाग आयोजित पुरुष आणि महिला मुंबई जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी खो खो स्पर्धा मनोरंजन मैदान, लालबाग येथे पार पडली. या स्पर्धेत पुरुष गटाचे विजेते ठरले श्री समर्थ व्यायाम मंदिर दादर, तर महिलांचे विजेते ठरले सरस्वती कन्या संघ माहीम.

दत्ताराम गायकवाड फाऊंडेशन आयोजित मुंबई पुरुष/महिला जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी खो खो स्पर्धा २०२५ चे पुरुष गटाचे विजेते ठरले श्री समर्थ व्यायाम मंदिर दादर, तर महिलांचे विजेते ठरले सरस्वती कन्या संघ माहीम.

ओम साईश्वर सेवा मंडळ च्या पेरू कंपाऊंड, लालबाग येथील मनोरंजन मैदानात रंगलेल्या अंतिम फेरीच्या पुरुष गटाच्या सामन्यात दादरचा श्री समर्थ व्यायाम मंदिर संघ सुमारे दहा वर्षांच्या प्रतीक्षेनंतर दिमाखात विजेता ठरला. अंतिम सामन्यात चुरशीच्या लढतीत श्री समर्थने विद्यार्थी क्रीडा केंद्र परेलच्या संघावर १६-१० (७-४-९-६) असा ६ गुणांच्या फरकाने विजेतेपद हासील केले.

महिलांच्या अंतिम फेरीच्या रंगलेल्या सामन्यात सलग तिसऱ्यांदा विजेतेपदाला गवसणी घातली ती सरस्वती कन्या संघ माहीमने. मध्यंतराला २-२ अशा रंगलेल्या या सामन्यात सरस्वती संघाने दुसऱ्या डावात आक्रमणाची धार वाढवत विजेतेपद हासील केले. माहीमच्या सरस्वती कन्या संघाने लालबागच्या यजमान ओम साईश्वर सेवा मंडळावर ७-४ (०२-०२-०५-०२) असा तीन गुणांनी पराभव केला. विजेत्या संघांतील खेळाडूंचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

## नागोठण्यात रंगणार महाराष्ट्र विरुद्ध ओडिशा सामना

**कूच बिहार ट्रॉफीचा सामना १६ ते १९ नोव्हेंबरला**

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

रायगडमधील क्रिकेट चाहत्यांसाठी आनंदाची बातमी आहे. देशातील अव्वल तरुण क्रिकेटपटूंना घडवणारी प्रतिष्ठेची कूच बिहार ट्रॉफी आता थेट नागोठणे येथील रिलायन्स निवासी संकुलातील मैदानावर रंगणार आहे. १६ ते १९ नोव्हेंबरदरम्यान रिलायन्स क्रिकेट स्टेडियमवर महाराष्ट्र विरुद्ध ओडिशा हा चार दिवसीय सामना रंगणार असून, रिलायन्स प्रशासनाने या लढतीसाठी संपूर्ण मैदान झळाळून तयार केलं आहे.

रिलायन्स नागोठणे विभागाचे अध्यक्ष शशांक गोयल, कॉर्पो रेट सर्व्हिसेस प्रमुख पुनीत मिश्रा, हॉर्टिकल्चर प्रमुख शरद पवार यांच्यासह जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे पदाधिकारी यांनी नुकतीच मैदानाची पाहणी केली. खेळपट्टीपासून पॅव्हेलियनपर्यंत आणि सुरक्षा व्यवस्थेपासून मैदानाच्या सौंदर्यपर्यंत, सर्वकाही बीसीसीआयच्या निकषांनुसार सज्ज केलं गेलं आहे की, नाही याची चाचपणी यावेळी करण्यात आली.

या स्पर्धेतून अनेक तरुण खेळाडू भारतीय संघापर्यंत पोहोचतात, त्यामुळे नागोठणेतील हा सामना केवळ एक क्रिकेट इव्हेंट नसून, रायगडच्या तरुण क्रिकेटपटूंना प्रेरणा देणारा क्षण ठरणार आहे. स्थानिक क्रिकेट अकॅडमीतील खेळाडूंसाठी हा सामने म्हणजे 'प्रत्यक्ष मैदानावर शिकण्याचे वर्ग' च ठरणार असल्याचे बोलले जात आहे.

### आयपीएलाचा लिलाव

## १६ डिसेंबरला

**नवी दिल्ली :** आयपीएल २०२६ स्पर्धेची आतापासूनच जोरदार चर्चा रंगली आहे. यंदा १६ डिसेंबरला अबूधाबीत मिनी लिलाव प्रक्रिया पार पडेल. सलग तिसऱ्या वर्षी आयपीएलची लिलाव प्रक्रिया विदेशात होणार आहे. आयपीएल २०२४ लिलाव पहिल्यांदा दुबईत झाला होता. त्यानंतर २०२५ मध्ये मेगा लिलाव प्रक्रिया सौदी अरबच्या जेद्दाहमध्ये पार पडली होती. आता दुबईमध्ये दुसऱ्यांदा लिलाव प्रक्रिया पार पडणार आहे. आयपीएल लिलाव झाल्यानंतर स्पर्धा सुरू होण्याच्या एक महिन्या आधीपर्यंत ट्रेड विंडोच्या माध्यमातून खेळाडूंची देवाणघेवाण करता येईल. पण, मिनी लिलाव २०२६ मध्ये घेतलेल्या खेळाडूंची ट्रेड करता येणार नाही.

## भारतीय तिरंदाजांकडून पदकांची लयलूट

**। ढाका । वृत्तसंस्था ।**

भारतीय तिरंदाजांनी गुरुवारी अचूक लक्ष्यभेद करताना पदकांची लयलूट केली. भारतीय खेळाडूंनी बांगलादेश येथील ढाका येथे सुरू असलेल्या आशियाई अजिंक्यपद तिरंदाजी स्पर्धेमध्ये तीन सुवर्ण व एक रौप्यपदक पटकावताना देदीप्यमान यश संपादन केले.

भारतीय खेळाडूंनी महिला एकेरी, महिला सांघिक, मिश्र सांघिक या प्रकारात सुवर्णपदकाला गवसणी घातली. पुरुषांच्या मिश्र प्रकारात मात्र भारताला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. ज्योती सुरेखा वेन्नम हिने महिला एकेरी व सांघिक प्रकारात सुवर्णपदक पटकावत दुहेरी धमाका केला. महिलांच्या कंपाउंड प्रकाराच्या अंतिम फेरीत दोन भारतीय खेळाडूंमध्ये झुंज रंगली. ज्योती वेन्नम आणि प्रीतिका



प्रदीप यांच्यामध्ये सुवर्णपदकासाठी लढाई झाली. या लढतीत ज्योती वेन्नम हिने १४७-१४५ अशी बाजी मारत सुवर्णपदक आपल्या नावावर केले. प्रीतिका प्रदीप हिने रौप्यपदक जिंकले. बांगलादेशच्या मोस्ट कुलसुम अक्तेर हिने ब्राँझपदक पटकावले..महिला सांघिक कंपाउंड प्रकारात भारत व दक्षिण कोरिया यांच्यामध्ये सुवर्णपदकाची लढत पाहायला मिळाली. या प्रकारात दीपशिखा, ज्योती सुरेखा वेन्नम व प्रीतिका प्रदीप या खेळाडूंनी भारतीय महिला संघाचे प्रतिनिधित्व केले. भारतीय महिला तिरंदाजांनी दक्षिण कोरियन संघाला २३६-२३४ असे पराभूत करताना सुवर्णपदकाची माळ आपल्या गळ्यात घातली.

अभिषेक वर्मा व दीपशिखा या भारतीय जोडीने मिश्र कंपाउंड प्रकारात बांगलादेशच्या जोडीला १५३-१५१ असे नमवत भारताला दिवसातील तिसरे सुवर्णपदक मिळवून दिले. दक्षिण कोरियाने ब्राँझपदकासाठीच्या लढतीत कझाकस्तानच्या जोडीवर १५६-१५५ असा एका गुणाने विजय मिळवला. पुरुषांच्या कंपाउंड सांघिक प्रकारात भारताचे सुवर्णपदक हुकले. या प्रकारात प्रथमेश फुगे, साहिल जाधव व अभिषेक वर्मा या खेळाडूंनी भारताचे प्रतिनिधित्व केले. कझाकस्तानच्या तिरंदाजांनी सुवर्णपदकासाठीच्या लढतीत भारतीय संघावर २३०-२२९ असा विजय साकारला.

**रायगड विभागीय शालेय क्रीडा स्पर्धा | पनवेलच्या महात्मा फुले महाविद्यालयाची गगनभरारी**

# ३५ सुवर्ण, ६ रौप्यसह २ कांस्यपदकांची कमाई

**। नवीन पनवेल । क्रीडा प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्यावतीने आयोजित रायगड डी.एस.ओ. शालेय क्रीडा स्पर्धेत पनवेल येथील रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा प्रकारात तालुका, जिल्हा व विभागीय स्तरावर ३५ सुवर्ण, ६ रौप्य आणि २ कांस्यपदकांची कमाई करीत महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.



यामध्ये अन्वी राठोड हिने रायफल शुटींग प्रकारात सुवर्णपदक, प्रथमा भगत हिने मॉडर्न पेंटॅथलॉन प्रकारात सुवर्णपदक, वैष्णवी घरत, सानिका म्हात्रे, सारा बैकर व तनुजा पाटील यांनी तायक्वांदो प्रकारात सुवर्णपदक, राज पाटील व अनिकेत घुगे यांनी बुद्धिबळ स्पर्धेत सुवर्णपदक, ओंकार पाटील व कौस्तुभ खुटले यांनी कॅरममध्ये सुवर्णपदक, मैदानी स्पर्धेत मुलांच्या संघाने ७ सुवर्णपदके, मैदानी स्पर्धेत मुलींच्या संघाने १० सुवर्णपदके, यश औटी, प्रीती मिसाळ व साक्षी एरंडे यांनी कराटे प्रकारात सुवर्णपदक, विश्वजीत धोदे याने कुस्तीमध्ये सुवर्णपदक, मुलींच्या संघाने कबड्डी व खो-खो स्पर्धेत सुवर्णपदक, मुलांच्या संघाने खो-खो स्पर्धेत सुवर्णपदक, मैदानी स्पर्धेत मुलींच्या संघाने ४ रौप्यपदके, मुलींच्या संघाने डॉजबॉल स्पर्धेत रौप्यपदक, रोनक जितेकर याने वेटलिफ्टिंग स्पर्धेत रौप्यपदक तर मुलांच्या संघाने डॉजबॉल व क्रिकेट स्पर्धेत कांस्यपदकाची कमाई केली.

या गुणवंत खेळाडूंपैकी अन्वी राठोड हिची भोपाळ येथे होणाऱ्या ६९ व्या राष्ट्रीय रायफल शुटींग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तसेच प्रथमा भगत हिची मॉडर्न पेंटॅथलॉनसाठी, वैष्णवी घरत व सानिका म्हात्रे यांची तायक्वांदोसाठी व प्रणव कटेकर याची तिहेरी उडी या स्पर्धेसाठी राज्यस्तरीय निवड झाली आहे. प्रीती मिसाळ व साक्षी एरंडे यांचीही कराटे स्पर्धेच्या विभागीय स्तरावर निवड झाली आहे.

विद्यार्थ्यांच्या या देदीप्यमान कामगिरीबद्दल प्रतिक्रिया देताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर म्हणाले की, महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील ही अविस्मरणीय कामगिरी आहे. या सर्व खेळाडूंनी महाविद्यालयाचा झेंडा अभिमानाने फडकवला याचा मला विशेष आनंद वाटतो. एवढ्या मोठ्या संख्येने पदकांची लयलूट करीत महाविद्यालाच्या गुणवत्तेवर शिक्कामोर्तब केल्याबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले व पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छाही दिल्या.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)